
जळगाव
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६
आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६
पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६
शुक्रवार, दि. १५ नोव्हेंबर २०२४। युगाब्द ५१२५ ।वर्ष : ३०। अंक : ९८। मूल्य ४ रुपये। पृष्ठे ८+४ = १२ । जळगाव, धुळे, नंदुरबार येथे उपलब्ध



# जिल्ह्यात १,५७४ मतदारांनी केले घरबसल्या मतदान



## अकरा विधानसभा मतदारसंघात ज्येष्ठ नागरिक, दिव्यांगांनी बजावला हक्क

**जळगाव :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता जळगाव जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघात २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. त्या पार्श्वभूमीवर मतदान केंद्रापर्यंत पोहोचू न शकणारे, वयाची ८५ वर्षांपेक्षा अधिक वय असलेले मतदार, दिव्यांग मतदार, दीर्घ आजाराने ग्रस्त असलेल्या मतदारांचे गृह भेटीद्वारे मतदान करून घेण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत. जळगाव जिल्ह्यात गृहमतदानाला शुक्रवार, ८ नोव्हेंबरपासून सुरुवात झाली असून जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदारसंघात १,६९४ मतदारांपैकी आतापर्यंत १,५७४ मतदारांनी घरबसल्या मतदान केले आहे.

भारत निवडणूक आयोगाने ८५ वर्षांपेक्षा अधिक वय असलेले मतदार, दिव्यांग मतदार, कोविड किंवा दीर्घ आजाराने बाधित असलेले रुग्ण यांचे गृहभेटीद्वारे मतदान करून घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार जळगाव जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदारसंघात एकूण १,६३२ मतदारांना घरबसल्या मतदानासाठी पात्र ठरविण्यात आले आहे. यासाठी १०० पेक्षा अधिक अधिकारी व कर्मचारी यांची फौज जिल्हाभरात तैनात करण्यात आली आहे. जिल्ह्यात ८ नोव्हेंबर ते १८ नोव्हेंबर दरम्यान ही प्रक्रिया पार पडणार आहे. आतापर्यंत भुसावळ विधानसभा मतदारसंघात १९१ मतदारांनी घरी बसून मतदान केले आहे. एरंडोल विधानसभा मतदारसंघात आतापर्यंत १६२ मतदारांनी घरून मतदान केले आहे. रावेर विधानसभा मतदारसंघात १९५ मतदारांनी घरून मतदान केले आहे.. जळगाव ग्रामीण विधानसभा मतदारसंघात १०२ मतदारांनी घरी बसल्या मतदानाचा हक्क बजावला आहे. पाचोरा मतदारसंघात आज गुरुवार, १४ नोव्हेंबरपर्यन्त २११ मतदारांनी घरून मतदानाचा हक्क बजावला आहे. चाळीसगाव विधानसभा मतदारसंघात आतापर्यंत १०६ मतदारांनी घरून आपला मतदानाचा हक्क बजावला आहे. अमळनेर विधानसभा मतदारसंघात आतापर्यंत १७९ मतदारांनी गृहमतदान केले. जामनेर मतदारसंघात आतापर्यंत १३२ मतदारांनी गृहमतदान केले. मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघात आतापर्यंत १६९ मतदारांनी गृह मतदानाचा हक्क बजावला आहे. चोपडा विधानसभा मतदारसंघात ६७, तर जळगाव शहर मतदारसंघात ६० मतदारांनी गृहमतदान केले आहे.

# मध्य प्रदेशातील तरुण गावठी पिस्टल, चार जिवंत काडतुसांसह जाळ्यात

## धुळे स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई : नरडाणा पोलिसात संशयिताविरोधात गुन्हा

**भुसावळ / धुळे :** धुळे स्थानिक गुन्हे शाखेने गोपनीय माहितीच्या आधारे मध्य प्रदेशातील संशयिताला गावठी पिस्टल व चार जिवंत काडतुसांसह अटक केली आहे. अशोक मिला बैसाणे (३४, रा. सकराली बुजुर्ग, ता.पानसेमल, जि.बडवाणी, मध्य प्रदेश) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. त्याच्याविरोधात नरडाणा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला.

**गोपनीय माहितीवरून कारवाई**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुन्हे शाखेचे वरिष्ठ निरीक्षक श्रीराम पवार यांना संशयित गावठी पिस्टलासह दुचाकीवरून येणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी पथकासह नरडाणा पोलिसांना निर्देश दिले. बेटावद चौफुलीवर सापळा रचल्यानंतर शिरपूर-नरडाणा रस्त्यावर विनाक्रमांकाची हिरो कंपनीची एच.एफ. डिलक्स दुचाकीवरून आलेल्या संशयिताला अडवल्यानंतर त्याच्या बॅगेची झडती घेतली असता त्यात गावठी पिस्टल, चार जिवंत काडतुसे आढळल्याने जप्त करण्यात आली. १२ रोजी रात्री ही कारवाई संयुक्तरीत्या करण्यात आली. २० हजार रुपये किमतीच्या दुचाकीसह २५ हजारांचा कट्टा व चार हजारांची जिवंत काडतुसे मिळून ४९ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. धुळे स्थानिक गुन्हे शाखेचे हवालदार पवन गवळी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार गुन्ह्याची नोंद करण्यात आली. तपास विजय आहेर करीत आहेत.



**यांनी केली कारवाई**

ही कारवाई धुळे पोलीस अधीक्षक श्रीकांत धीवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, शिरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार, एपीआय श्रीकृष्ण गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली नरडाणा पोलीस ठाण्याचे एपीआय नीलेश मोरे, पोलीस उपनिरीक्षक प्रकाश पाटील, मनोज कुवर, विजय आहरे, आरीफ पठाण, पवन गवळी, संदीप पाटील, ललित पाटील, मयूर पाटील, गजेंद्र पावरा आदींच्या पथकाने केली.



# विद्यापीठाच्या आंबेडकर विचारधारा विभागात प्रा. रामटेके यांचे व्याख्यान

**जळगाव :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे प्रशाळेतील डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाच्या वतीने १४ नोव्हेंबर रोजी सुभेदार रामजी सकपाळ यांच्या जयंतीनिमित्त प्रा. राकेश रामटेके यांचे विशेष व्याख्यान झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वडील सुभेदार रामजी सकपाळ हे भारतीय लष्करात सुभेदार होते. त्यामुळे इंग्रजी शिक्षण आणि शिक्षणाचे महत्त्व ते जाणून होते. त्यामुळे त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना उच्च शिक्षणाचा आग्रह धरला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांना शिकवण्याचे काम सुभेदार रामजी सकपाळ यांनी केले. सुभेदार रामजी सकपाळ हे महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीमध्ये कार्य करीत असल्यामुळे त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटले होते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना घडविण्यात सुभेदार रामजी सकपाळ यांचे फार मोठे योगदान आहे. एक आदर्श पिता म्हणून सकपाळ यांच्याकडे पाहिले जाते, असे प्रतिपादन प्रा. राकेश रामटेके यांनी केले. या वेळी प्रमुख अतिथी म्हणून राज्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. उमेश गोघाडिया, अर्थशास्त्र विभागातील डॉ. अभय मनसरे, विनेश पावरा, रोशन मावळे, प्रा. मोईन शेख, महाले, तथागत सुरवाडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन डॉ. विजय घोरपडे यांनी केले तर विद्यार्थिनी सुकन्या जाधव हिने आभार मानले.

# चालकाने गाडीतून उतरविले अन् पुढे पळताच झाला स्फोट

**जळगाव :** अचानक चालकाने रुग्णवाहिका थांबविली. आम्हाला पटकन गाडीतून खाली उतरविले... आणि लवकर पळा आम्हीही पळतो, असे चालक म्हणाला. आम्ही पळालो. त्यानंतर गाडीत मोठा स्फोट होऊन आगीचा भडका झाला, अशी आपबिती मनीषा रवींद्र सोनवणे (वय २५, रा.बामणे, ता.एरंडोल) यांनी गुरुवार, १४ रोजी शासकीय रुग्णालयात सांगितली. माझ्या सोबत माझी आई अलकाबाई, पती रवींद्र सोनवणे, तसेच डॉक्टर होते. चालक राहुल पाटील यांना गाडीत काहीतरी झाले, असे लक्षात येताच त्यांनी तत्काळ गाडी थांबविली. आम्हाला पटकन गाडीतून खाली उतरविले व लवकर पळा, असे सांगितले. आम्ही काही अंतर पळाल्यानंतर गाडीने पेट घेतला व भयंकर स्फोट झाला. जळगावकडून येणाऱ्या एरंडोल येथील रुग्णवाहिकेतून आम्हाला सुखरूप रुग्णालयात हलविण्यात आले, असेही या महिलेने सांगितले. या दुर्घटनेत कोणालाही दुखापत झाली नाही परंतु आम्ही चालकाच्या सतर्कतेने बचावलो, अशी कृतज्ञता भावना सोनवणे कुटुंबीयांनी व्यक्त केली.

# जिल्ह्यात विविध तालुकास्तरावर मतदान जनजागृती मॅरेथॉन स्पर्धा




**जळगाव :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी २० नोव्हेंबर रोजी मतदान पार पडणार आहे. निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार जळगाव मतदार-संघासाठी होणाऱ्या मतदानासाठी आणि मतदान जनजागृती स्वीप कार्यक्रमाअंतर्गत अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यानुसार जिल्ह्यात विविध तालुकास्तरावर मतदार मतदान जनजागृतीसाठी मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात पार पडल्या.

> या स्पर्धेत १५ तालुक्यातून सुमारे ८ हजार ४७० स्पर्धकांनी सहभाग नोंदवत मतदारांना मतदानाचे महत्त्व पटवून देत जनजागृती केली. याप्रसंगी ठिकठिकाणी सेल्फी पॉइंटची व सिग्नेचर पॉइंटची व्यवस्था, पिण्याचे पाणी व वैद्यकीय पथकाची व्यवस्था करण्यात आली होती.

अमळनेर तहसील कार्यालय आणि मंगरूळ, भडगाव येथे डॉ. पूनम पवार माध्यमिक विद्यालय, वाय. एम. खान हायस्कूल, सौ. सु. गी. पाटील विद्यालय, लाडकुबाई विद्यालय, अँग्लो उर्दू हायस्कूल, आदर्श कन्या विद्यालय, भुसावळ तालुक्यात डी. एस. हायस्कूल ग्राउंड, गं. सां. चौधरी विद्यालय वरणगाव, सु. ग. टेमानी हायस्कूल, डी. एल. हिंदी हायस्कूल आणि बोदवड पंचायत समिती, चाळीसगाव तालुक्यात पिंपरखेड, उंबरखेड, मेहुणबारे, शासकीय अधिकारी, चोपडा पंचायत समिती छत्रपती शिवाजी महाराज चौक, ग्रामीण पो. स्टे. ते थाळनेर दरवाजा, अंगलवाडी रोड ते गुजराथी गल्ली, गोल मंदिर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, धरणगाव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, एरंडोल डी.डी.एस.पी. कॉलेज, जळगाव येथील न्यू इंग्लिश स्कूल नशिराबाद, थेपडे विद्यालय म्हसावद, जामनेर जि.प. मराठी शाळा ते वाकी, हिवरखेडा नाका, सोनबर्डी ते महाराणा प्रताप चौक, मुक्ताईनगर येथे एन.एच. राका हायस्कूल, पाचोरा ग्राम विकास विद्यालय पिंपळगाव हरे., गांधी विद्यालय सामनेर, एस.के.पवार विद्यालय, नगरदेवळा, डॉ.जे.जे पाटील विद्यालय लोहारा, जि. प. प्राथमिक शाळा नांद्रा, पारोळा येथे डॉ.व्ही.एम. जैन विद्यालय, करोडपती विद्यालय, रावेर पंचायत समिती, आंबेडकर चौक, सरदार वल्लभभाई पटेल, विद्यालय ऐनपूर, द. सो. पाटील विद्यालय केऱ्हाळा, यावल येथील दहिगाव येथे मोठ्या उत्साहात मॅरेथॉन पार पडली.

# कामगारांना मतदानाच्या दिवशी पगारी सुट्टी द्यावी

## जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांचे आवाहन



**नंदुरबार :** विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. या अनुषंगाने उद्योग विभागांतर्गत आस्थापना, कारखाने, दुकानांतील कामगारांना हक्क बजावण्यासाठी मतदानाच्या दिवशी भरपगारी सुट्टी किंवा काही ठिकाणी कामाच्या तासांत योग्य सवलत द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. मिताली सेठी यांनी केले आहे.

लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ चे कलम १३५ (ब)नुसार मतदानाच्या दिवशी मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात येते किंवा काही ठिकाणी कामाच्या तासांत योग्य ती सवलत देण्यात येते. शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या ७ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या परिपत्रकानुसार यासंदर्भात आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. मतदानाच्या दिवशी देण्यात येणारी सुट्टी उद्योग विभागांतर्गत येणारे आस्थापना, कारखाने, दुकाने आदींना लागू राहील. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचाऱ्यांना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल, तर मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टीऐवजी कमीत कमी दोन तासांची सवलत देता येईल. मात्र, त्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन ते तीन तासांची भरपगारी सवलत मिळेल, याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांना घेणे आवश्यक आहे. मतदारांना मतदानासाठी योग्य ती सुट्टी किंवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता न येणे शक्य झाले नाही, अशी तक्रार आल्यास संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यात येईल, असेही डॉ. मिताली सेठी यांनी नमूद केले.

# जळगाव जिल्हा नागरी सहकारी बँकेतर्फे सांस्कृतिक, कौटुंबिक कार्यक्रम उत्साहात




**जळगाव :** जळगाव जिल्हा नागरी सहकारी बँक कर्मचारी सहकारी पतपुरवठा संस्थेचा दरवर्षाप्रमाणे या वर्षीही संस्थेच्या सभासदांसाठी नुकताच ओक मल्टीपर्पज हॉल येथे सांस्कृतिक आणि कौटुंबिक एकत्रीकरणाचा कार्यक्रम पार पडला. जळगाव जनता सहकारी बँकेचे कर्मचारी, पाचोरा पीपल्स, अमळनेर अर्बन, धरणगाव अर्बन, श्री व्यास धनवर्षा यावल संस्थेचे संचालक शरद भालेराव प्रस्तुत स्वरयात्रा या जुन्या-नव्या हिंदी-मराठी गाण्यांचा संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात श्री गणेश वंदनाने करण्यात आली. जळगाव जनता बँक कर्मचारी प्रसाद कोपरकर यांनी गायलेल्या गाण्यालाही रसिकांनी दाद दिली. संजय सूर्यवंशी, रजनी भारसके, शरद भालेराव यांनी गायलेल्या गाण्याने रसिक मंत्रमुग्ध झाले. चंद्रकांत महिला गिरे की बोर्ड, नितीन शिरसाठ ॲक्टो पॅड, किशोर शिरसाठ ढोलक यांनी साथसंगत केली. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे कामगार कल्याण अधिकारी भानुदास जोशी, गीतांजली ठाकरे, संस्था अध्यक्ष कैलास दोरकर, उपाध्यक्ष संजय सूर्यवंशी, संचालक लखीचंद सूर्यवंशी, प्रमोद पाटील, ऋषिकेश डावरे, अरुण पाटील, वंदना सूर्यवंशी, तज्ज्ञ संचालक अरुण सोनवणे उपस्थित होते. या वेळी मान्यवरांच्या हस्ते कलाकारांचा सत्कार करण्यात आला.

# नंदुरबार जिल्ह्यात गृहमतदानाला प्रारंभ, ज्येष्ठांसह दिव्यांग बांधवांनी बजावला हक्क; १७ नोव्हेंबरपर्यंत संधी

**नंदुरबार :** जिल्ह्यातील विधानसभेच्या चारही मतदारसंघात गुरुवारपासून (१४ नोव्हेंबर) गृहमतदानाला प्रारंभ झाला. जिल्ह्यातील ८५ वर्षांवरील नागरिकांसह दिव्यांग बांधवांनी मतदानाचा हक्क बजावला. विशेष म्हणजे नंदुरबार विधानसभा क्षेत्रातील रजाळे येथील १०१ वर्षीय उमता गिरासे यांनी उत्साहात मतदानाचा हक्क बजावला.

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ८५ वर्षांवरील नागरिक आणि दिव्यांग बांधवांना गृहमतदानाची सुविधा देण्यात आली आहे. जिल्ह्यातील अक्कलकुवा, शहादा, नंदुरबार, नवापूर या चार मतदारसंघांत जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. मिताली सेठी यांच्या मार्गदर्शनात गुरुवारी (१४ नोव्हेंबर) गृहमतदानाला उत्साहात सुरुवात झाली.

जिल्ह्यातील विधानसभा क्षेत्रनिहाय निवडणूक निर्णय अधिकारी अनय नावंदर (अक्कलकुवा), सुभाष दळवी (शहादा), अंजली शर्मा (नंदुरबार), महेश चौधरी (नवापूर) यांच्या नेतृत्वात नियुक्त ४८ पथकांमार्फत गृहमतदान सलग चार दिवस दोन फेऱ्यांमध्ये रविवारपर्यंत (१७ नोव्हेंबर) होणार आहे.

> गृहमतदानाच्या पहिल्या फेरीची भेट १४ व १५ नोव्हेंबर रोजी होत आहे. पहिल्या फेरीत मतदार न भेटल्यास द्वितीय भेटीची फेरी १६ व १७ नोव्हेंबर रोजी होईल. त्यासाठी ८५ वर्षांवरील नागरिक व दिव्यांग बांधव यांचा केंद्रस्तरीय मतदान अधिकाऱ्यांमार्फत अर्ज भरून घेतला आहे. अर्जाची तपासणी केल्यानंतर जिल्ह्यातील एक हजार १६४ मतदार गृहमतदानासाठी पात्र ठरले आहेत.

जिल्ह्यातील अक्कलकुवा येथील २२१, शहादा- २५७, नंदुरबार- ३८३, नवापूर- २८५ असे एक हजार १६४, ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग बांधव मतदान करणार आहेत. विधानसभा क्षेत्रात नियुक्त ४८ पथके गृहमतदानाची नोंदणी केलेल्या मतदारांच्या घरी जाऊन पोस्टल बॅलेटद्वारे मतदान करून घेत आहेत. गृहमतदानाची प्रक्रिया पारदर्शी पद्धतीने करण्यात येत आहे. मतदारांनी लेखी मागणी केल्यास त्यांना मदतनिसाची मदत घेता येईल. मात्र, एका मदतनिसाला केवळ एका मतदाराला मदत करता येणार आहे. गृहमतदानाच्या प्रक्रियेचे निरीक्षक करावयाचे असल्यास राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना या वेळी उपस्थित राहता येणार आहे.



# जळगाव स्फोटातील पुणे येथील पाचव्या जखमीचा उपचारात मृत्यू

**जळगाव :** येथील इच्छादेवी पोलीस चौकीजवळ अवैध रिफिलिंग सेंटरवर वाहनात गॅस भरताना स्फोट झाला होता. या दुर्घटनेतील जखमी संजय गणेश तेरवडिया यांचा बुधवार, १३ रोजी रात्री ११.३० वाजेच्या सुमारास उपचारादरम्यान मृत्यू झाला.

त्यामुळे स्फोटातील मृतांची संख्या पाच झाली आहे. या स्फोटात दहा जण भाजून जखमी झाले होते. उपचारादरम्यान गॅस सेंटर चालक दानिश, भरत दालवाले, व्हॅनचालक संदीप शेजवळ, सूरज दालवाले (वय २४) यांचा मृत्यू झाला. बुधवारी जखमी संजय तेरवडिया यांचा मृत्यू झाला. ते येथील दालवाले कुटुंबीयांचे नातेवाईक होते.

## निधन वार्ता



### प्रल्हाद बडगुजर

**बोदवड :** जळगाव येथील रहिवासी प्रल्हाद श्यामराव बडगुजर (वय ७८) (सेवानिवृत्त शिक्षक, जिल्हा परिषद शाळा, बोदवड) यांचे १४ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंड असा परिवार आहे. ते मनोज बडगुजर व सूरज बडगुजर यांचे वडील होत.



### शैला कुलकर्णी

**बोदवड :** शहरातील सरस्वती नगरातील रहिवासी शैला यशवंत कुलकर्णी (७०, विजूमाई) यांचे गुरुवारी पहाटे ३.१५ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, दोन मुली असा परिवार आहे. राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अनंत कुळकर्णी यांच्या त्या भगिनी तर न. हं. रांका हायस्कूलचे शिक्षकेतर कर्मचारी योगेश यशवंत कुलकर्णी यांच्या आई होत.



### कुसुम पवार

**भुसावळ :** कस्तुरी नगरातील रहिवासी कुसुम सीताराम पवार (६५) यांचे बुधवार, १३ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्या फळ विक्रेता एजंट सीताराम पवार यांच्या पत्नी होत.

# मतदानाचे राष्ट्रीय कर्तव्य पार पाडा - आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे

## मॅरेथॉन रॅलीद्वारे मतदान जनजागृती, विविध महाविद्यालयांचा सहभाग



**जळगाव :** प्रत्येक मतदाराने विधानसभा निवडणुकीत मतदानाचे राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन जळगाव शहर महापालिकेचे आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांनी केले.

विधानसभा निवडणूक मतदान जनजागृतीसाठी महापालिका, बाहेती महाविद्यालय, रोजलँड विद्यालय, अँग्लो उर्दू विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मॅरेथॉन रॅली काढण्यात आली. त्या वेळी आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे बोलत होते.

सकाळी अकरा वाजता ही मॅरेथॉन रॅली काढण्यात आली. बाहेती महाविद्यालय ते स्टेडियम या मार्गावरून सुमारे दोनशे विद्यार्थी यात सहभागी झाले.

मनपा आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांनी विद्यार्थी व उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, मतदान करणे राष्ट्रीय कर्तव्य बजावण्यासारखे आहे. ते बजावावे असे आवाहन केले. तर अतिरिक्त आयुक्त निर्मला गायकवाड यांनी रॅलीला हिरवा झेंडा दाखवला. याप्रसंगी मनपा आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे, अतिरिक्त आयुक्त निर्मला गायकवाड, साहाय्यक आयुक्त धनश्री शिंदे, साहाय्यक आयुक्त अश्विनी गायकवाड, उपायुक्त गणेश चाटे, ॲड. सीताराम बाहेती महाविद्यालयाचे सचिव रोहन बाहेती, शिक्षण विस्तार अधिकारी विजय पवार, प्राचार्य डॉ. अनिल लोहार, उपप्राचार्य मनोज सोनवणे, महापालिकेचे अभियंता प्रकाश पाटील, मनपा पाणीपुरवठा उपअभियंता योगेश बोरोले, गायत्री महाले यांची उपस्थिती होती. अमेरिकेच्या शिक्षिका अलिसा यांनीही विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व सांगत मार्गदर्शन केले. प्रास्ताविक शिक्षण विस्तार अधिकारी विजय पवार यांनी केले. सूत्रसंचालन गौतम भालेराव यांनी केले. आभार प्रदर्शन विजय ठोसर यांनी केले. सर्वांनी मतदान प्रतिज्ञा घेतली. मतदान जनजागृतीपर घोषणा देण्यात आल्या. कार्यक्रम यशस्वितेसाठी मुख्याध्यापक बाबू शेख, वंदना सोले, रोजमीन खिमानी, जिभाऊ गर्दे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

घर असो वा शेत झेनिथ पाईप सेवेत...
भारतात प्रथम क्रमांकावर असलेले
बिर्लांचे एक उत्पादन
झेनिथ
स्टील पाईप
जी.आय.पाईप
एम.एस.पाईप
ZENITH-BIRLA LIGHT
ZENITH-BIRLA MEDIUM
ZENITH-BIRLA HEAVY
• अधिकृत विक्रेता •
संघवी पाईप
'केसर-कस्तुरी' २६,२७ नवीपेठ, जुन्या बस स्टँडसमोर गल्लीत जळगाव
2232641 TO 2232645

नमुना क्र. ७५

जा.क्र./डीवायसीसी/४४६३/२०२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
जळगांव विभाग, जळगांव.
दि. १४/११/२०२४

## चौकशी जाहीर नोटीस

**फेरफार अर्ज क्र. ९६०/२०२४**
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्र. :-
**केशवस्मृती प्रतिष्ठान, जळगांव जि.जळगांव**
**नोंदणी क्र. एफ/१४०२/जळगांव**
**श्री. दिलीप हस्तीमलजी चोपडा - अर्जदार**

सर्व संबंधीत लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, धर्मदाय उपायुक्त जळगांव विभाग जळगांव हे वर नमूद केलेल्या फेरफार अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१) उपरोक्त न्यासाच्या दि.१२/०७/२०२४ रोजीच्या कार्यकारी मंडळाच्या सभेत न्यासाच्या परिशिष्ट १ वर खालीलप्रमाणे स्थावर मिळकत नोंदविण्या संबंधी ठराव पारित केला आहे.

खालील स्थावर मालमत्ता रेकॉर्ड वरून कमी करण्यात यावी. स्थावर मिळकत : जळगाव शहर म.न.पा. हद्दीतील सि.स. नं. २११८/२४ यासी क्षेत्रफळ ३३४.४० चौ.मी. चतु:सिमा **पूर्वेस** : सि.स.नं. २११८/२५ मधील १५ फुटाचा बोळ व त्यापलिकडे सि.स.नं. २११८/२५/१, **पश्चिमेस** : सार्वजनिक रस्ता व वापर, **उत्तरेस** : सि.स.नं. २११८/२३, **दक्षिणेस** : म्यू. रस्ता येणे प्रमाणे वर्णनाची बांधीव व खुल्या जागेसह मिळकत रेकॉर्ड वरून कमी करण्यात यावी.

**खालील मिळकत रेकॉर्ड वर घेण्यात यावी**

स्थावर मिळकत : जळगांव शहर मनपा हद्दीतील शेतसर्व्हे नं. २५१/अ/१ यात म. जिल्हाधिकारी, जळगांव यांचेकडील बिनशेती आदेश क्र. एल.एन.ए./एसआर/५/५३ दि.१३/४/१९५३ अन्वये व त्यांनी मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे बिनशेती बखळ प्लॉट्स पाडलेले आहेत त्या प्लॉटपैकी बखळ प्लॉट नं.७९ जळगांव शहर भूमापन क्र. २६८३अ/१/७४ त्याचे एकूण प्लॉट क्षेत्र ४९९.१० चौ.मी. यासी चतु:सिमा- पुर्वेस-प्लॉट नं.८०, पश्चिमेस- रोड रस्ता, उत्तरेस- रोड रस्ता, दक्षिणेस- प्लॉट नं. ९०

तरी सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल, अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही, तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मदाय उपायुक्त जळगांव विभाग जळगांव यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १४/११/२०२४ रोजी दिली.

शिक्का


सही/-
अधिक्षक (न्याय)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
जळगांव विभाग, जळगांव,

हे वृत्तपत्र सर्जना मीडिया सोल्युशन्स प्रा.लि. जळगावसाठी * निवासी संपादक : चंद्रशेखर दिगंबर जोशी यांनी पी.एम.उद्योग, डी–८९, एम.आय.डी.सी., जळगाव, जि.जळगाव येथे छापून गाळा क्रमांक ४, गोलाणी मार्केट, जळगाव येथे प्रकाशित केले आहे. पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी * निवासी संपादक यांची आहे. ■आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६, ■पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४–२०२६.
■फोन : ०२५७ – २२४२०३१, २२४२०३२, फॅक्स : २२४२०३३. ■E-mail - editor.tarunbharat.jalgaon@gmail.com, ■E-paper : epaper.tarunbharatlive.com

जळगाव
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६
आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६
पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएल/८८/२०२४-२०२६
शुक्रवार, दि. १५ नोव्हेंबर २०२४।

आमदार चव्हाणांच्या प्रचारात सर्वच घटक सक्रिय
वाचा पान ६ वर

विनम्र अभिवादन


शीख पंथाचे संस्थापक गुरू नानकदेव यांची आज जयंती


भूदान चळवळीचे प्रणेते भौमर्षी विनोबा भावे यांची आज पुण्यतिथी


थोर स्वतंत्र्य सेनानी बिरसा मुंडा यांची आज जयंती

# घुसखोरांची आरती करणाऱ्या काँग्रेसला संधी देऊ नका

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जोरदार हल्ला

◆ **मुंबई, १४ नोव्हेंबर**
घुसखोरांची आरती करणाऱ्या काँग्रेसला देशात कुठेही संधी देऊ नका, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. झारखंडमधील काँग्रेस नेत्याने सत्ता मिळाली, तर घुसखोरांना स्वस्त गॅस सिलेंडर देणार, अशी घोषणा केली. त्यांचा एक नेता खुलेआम सांगतो की, घुसखोर, रोहिंग्या आणि बांगलादेशींना स्वस्त सिलेंडर देत आहे. मत मिळवण्यासाठी तुमच्या मुलाच्या भविष्यासाठी हे लोक काय करतील, याचे हे उदाहरण असल्याचे पंतप्रधान म्हणाले.

महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी मोदी यांच्या मुंबई, नवी मुंबई आणि छ. संभाजीनगर येथे तीन सभा झाल्या. या सभांमधून त्यांनी विरोधकांवर हल्ला चढविला.

**काँग्रेसे गरिबांना लुटले**

आपल्याला विकसित भारताच्या निर्मितीसाठी स्वराजसह सुराज्यचा संकल्प पुढे न्यायचा आहे. गरिबांची प्रगती झाली तरच सुराज्यचा संकल्प पुढे नेता येईल. हे फक्त भाजपा आणि महायुती सरकारच करू शकते.


छ. संभाजीनगरमधील जाहीर सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा गुरुवारी छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला

### राहुल गांधींकडून हिंदुहृदयसम्राट शब्द वदवून दाखवा

काँग्रेसच्या शहजाद्याकडून हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हा शब्द एकदा वदवून दाखवा, त्यांच्याकडून बाळासाहेब ठाकरेंची प्रशंसा करून दाखवा किंवा त्यांच्या तोंडून स्वातंत्र्यवीर सावरकरांचा गौरव करून दाखवा, असे थेट आव्हान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उबाठा गटाचे नेते उद्धव ठाकरे यांना दिले. गुरुवारी रात्री मुंबईतील शिवतीर्थावर झालेल्या जाहीर सभेत ते बोलत होते.

काँग्रेसकडून प्रत्येक पिढीत गरिबी हटावची खोटी घोषणा दिली जाते. ही घोषणा देत काँग्रेसने गरिबांनाच लुटले, असा आरोप पंतप्रधानांनी नवी मुंबईतील सभेत केला.

**संभाजी महाराज विरुद्ध औरंगजेब**

एकीकडं संभाजी महाराजांना मानणारे देशभक्त आहेत आणि दुसरिकडे औरंगजेबाजे गुणगाण करणारे. छत्रपती संभाजीनगर हे नाव देण्याची मागणी बाळासाहेब ठाकरे यांनी केली होती. आघाडी सरकारच्या अडीच वर्षांत ते काँग्रेसच्या दबावात पूर्ण झाले नाही. आम्ही बाळासाहेब ठाकरे यांची इच्छा पूर्ण केली, असे मोदींनी सुरुवातीलाच सांगितले.

### एक राहा, काँग्रेस आरक्षण संपवेल

काँग्रेस पक्षाची पूर्वीपासूनच आरक्षण विरोधी मानसिकता आहे. त्यांच्या वृत्तपत्रातील जुन्या जाहिराती सध्या इंटरनेटवर व्हायरल होत आहेत, त्या पाहा. काँग्रेसने उघडपणे आरक्षणाला विरोध केला आहे. आजही काँग्रेसचा अजेंडा आहे, असा आरोप पंतप्रधान मोदी यांनी छत्रपती संभाजीनगरमधील सभेत केला. सर्वांनी एक राहा, अन्यथा काँग्रेस आरक्षण संपवेल, असा गंभीर इशाराही त्यांनी दिला.

# महाराष्ट्र-गुजरातमध्ये ईडीची छापेमारी

### कॅश फॉर व्होट प्रकरण

◆ **मुंबई, १४ नोव्हेंबर**
१०० कोटी रुपयांचा व्यवहार करण्यासाठी विविध लोकांच्या खात्यांचा गैरवापरातील 'मनी लाँड्रिंग' प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने महाराष्ट्र आणि गुजरातमधील काही ठिकाणांवर गुरुवारी छापेमारी केली.

बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत महाराष्ट्रातील मालेगाव, नाशिक आणि मुंबई तसेच गुजरातमधील अहमदाबाद आणि सुरतमधील २३ ठिकाणांवर ईडीने छापेमारी केली.

राज्या महाराष्ट्र विधानसभेसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होत आहेत. मालेगावमधील सिराज अहमद हारून मेमन हा व्यापारी चहा आणि शीतपेयांच्या व्यवसाय आपल्या भागीदारांसोबत करतो. त्याच्याविरोधात मालेगाव पोलिसांनी दाखल केलेल्या एफआयआरच्या आधारे ईडीने 'मनी लाँड्रिंग'चे गुन्हे दाखल केले आहेत.

तक्रारदार व्यक्तीच्या बँक खात्याचा गैरवापर करून बेकायदेशीर हस्तांतरण करण्यात आले. निवडणूक निधी फिरवण्यासाठी या खात्याचा गैरवापर झाल्याचा अंदाज आहे. आपल्याला व्यवसाय सुरू करायचा असून, त्यासाठी शेतकऱ्यांकडून पैसे घेण्याची गरज आहे, असे कारण देत त्याने अनेक जणांकडून केवायसीची तपशीलवार माहिती घेऊन त्या दस्तावेजांच्या आधारे नाशिक मर्चंट सहकारी बँकेत खाती उघडली.

प्रत्येक खात्यातून १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमांचा व्यवहार झाल्याच्या नोंदी ईडीला आढळल्या असून, तपास यंत्रणा या प्रकरणी अधिक पुरावे गोळा करीत आहे तसेच हवाला व्यावसायिकांची यातील भूमिका तपासत आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

**१७० खात्यांतून २,५०० पेक्षा जास्त व्यवहार**

महाराष्ट्र, गुजरात, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, हरयाणा, ओडिशा आणि प. बंगाल यासारख्या राज्यांमध्ये पसरलेल्या २,५०० पेक्षा जास्त व्यवहारांची मालिका सुमारे १७० बँक खात्यांतून झाली. या खात्यांतून एक तर रक्कम टाकण्यात आली किंवा काढण्यात आली.

# तुलसी गबार्ड नॅशनल इंटेलिजन्सच्या संचालक

### डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा

◆ **वॉशिंग्टन, १४ नोव्हेंबर**
माजी डेमॉक्रॅट आणि अमेरिकी काँग्रेसमध्ये निवडून आलेल्या पहिल्या हिंदू तुलसी गबार्ड अमेरिकी नॅशनल इंटेलिजन्सच्या संचालक म्हणून काम पाहतील, अशी घोषणा अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली.

चार वेळा अमेरिकी काँग्रेसमध्ये राहिलेल्या, २०२० मधील राष्ट्राध्यक्षपदाच्या उमेदवार तुलसी गबार्ड या माजी सैनिक आहेत आणि त्यांना मध्यपूर्व तसेच आफ्रिकेतील युद्ध क्षेत्रांत तीन तैनातींचा अनुभव आहे. अलिकडेच त्यांनी डेमॉक्रॅटिक पक्ष सोडून रिपब्लिकन पक्षात प्रवेश केला होता.


महत्त्वाच्या पदावर नियुक्ती झाल्यावर उपस्थितांशी संवाद साधताना तुलसी गबार्ड

काँग्रेसच्या माजी सदस्य आणि लेफ्टनंट कर्नल तुलसी गबार्ड नॅशनल इंटेलिजन्सच्या संचालक म्हणून काम पाहतील, ही घोषणा करताना मला आनंद होत आहे. मागील दोन दशकांपासून तुलसी देश आणि अमेरिकींच्या स्वातंत्र्यासाठी लढल्या आहेत, असे डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले.

तुलसी गबार्ड राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीतील माजी डेमॉक्रॅट उमेदवार होत्या. त्यामुळे त्यांना दोन्ही पक्षांचे समर्थन मिळेल. आता त्या रिपब्लिकन असल्याचे अभिमानाने सांगावे लागले. आपल्याला अभिमान वाटेल, अशी कामगिरी त्या करतील, असे ट्रम्प यांनी म्हटले.

# मोदींना डॉमिनिकाचा सर्वोच्च पुरस्कार

◆ **नवी दिल्ली, १४ नोव्हेंबर**
उत्तर अमेरिका खंडातील डॉमिनिकाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सर्वोच्च पुरस्काराची घोषणा केली. डॉमिनिकातील सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार, 'डॉमिनिका अवॉर्ड ऑफ ऑनर'ने नरेंद्र मोदी यांचा सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती पंतप्रधान कार्यालयाने गुरुवारी दिली.

नरेंद्र मोदी यांच्या आफ्रिका दौऱ्यापूर्वी या पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे. कोरोना महामारीच्या काळात डॉमिनिकामध्ये मोदी यांनी केलेल्या योगदानाबद्दल आणि भारत आणि डॉमिनिका यांच्यातील भागीदारी मजबूत करण्याच्या त्यांच्या समर्पणाला हा पुरस्कार देण्यात येणार आहे. कोरोना काळात मोदी यांनी या देशाला ७० हजार कोरोना प्रतिबंधक लसींचा पुरवठा केला होता. यामुळे तेथील मोठ्या प्रमाणात नागरिकांचे जीव वाचविणे शक्य झाले होते. डॉमिनिका गयाना येथील इंडिया-कॅरिकॉम शिखर परिषदेत नरेंद्र मोदी यांना सर्वोच्च राष्ट्रीय सन्मान प्रदान करण्यात येणार असल्याचे पंतप्रधान कार्यालयाने सांगितले.


### आतापर्यंत मिळालेले सन्मान

- पापुआ न्यू गिनीकडून मे २०२३ मध्ये **'ग्रॅण्ड कंपेनियन ऑफ द ऑर्डर ऑफ लोगोहू'**
- फ्रान्सतर्फे १३ जुलै २०२३ रोजी **'ग्रॅण्ड क्रॉस ऑफ द लीजन ऑफ ऑनर'**
- ग्रीसकडून २५ ऑगस्ट २०२३ रोजी **'द ग्रॅण्ड क्रॉस ऑफ द ऑर्डर ऑफ ऑनर'**
- बहरीनच्या राजाकडून २०१९ मध्ये **'किंग हमाद ऑर्डर ऑफ द रेनेसान्स'**

## महत्त्वाचे

### तिसऱ्या सत्रातही घसरण कायम

**मुंबई** : सकारात्मक सुरुवात करूनही शेअर बाजारांना गुरुवारी विक्रीच्या दबावाचा सामना करावा लागला. यामुळे सेन्सेक्स-निफ्टीत घसरण झाली. निफ्टीची ही सलग सहावी आणि सेन्सेक्सची तिसरी घसरण ठरली.



सेन्सेक्स आज ११० अंकांनी घसरून ७७,५८० वर बंद झाला. निफ्टी २६ अंकांच्या किरकोळ घसरणीसह २३,५३२ या पातळीवर स्थिरावला. एफएमसीजी आणि एनर्जी शेअर्स घसरणीचा बाजाराला काही प्रमाणात फटका बसला. परदेशी गुंतवणूकदारांकडून होत असलेल्या सततच्या विक्रीचा बाजारात दबाव कायम आहे. क्षेत्रीय निर्देशांक निफ्टी एफएमसीजी आणि निफ्टी मेटल यांची सर्वांत खराब कामगिरी राहिली. आज सेन्सेक्स आणि निफ्टीने तेजीत सुरुवात केली होती. सुरुवातीच्या व्यवहारात सेन्सेक्स सुमारे १०० पेक्षा अधिक अंकांनी वाढून ७७,८०० वर पोहोचला. निफ्टी ५० पेक्षा अधिक अंकांनी वाढला होता.

# श्रीकृष्ण जन्मभूमी प्रकरणातील मुख्य याचिकाकर्त्यांना पाकिस्तानमधून धमकी

◆ **लखनौ, १४ नोव्हेंबर**
अलाहाबाद उच्च न्यायालय बॉम्बने उडवून देऊ, अशी धमकी पाकिस्तानमधून श्रीकृष्ण जन्मभूमी प्रकरणातील मुख्य याचिकाकर्ते आणि श्रीकृष्ण जन्मभूमी मुक्ती निर्माण ट्रस्टचे अध्यक्ष आशुतोष पांडे यांना मिळाली आहे.

आशुतोष पांडे हे शामलीतील येथील कांधला येथील रहिवासी आहेत. अलाहाबाद उच्च न्यायालयाने बॉम्बने उडवून देऊ, अशी धमकी आल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे. १३ नोव्हेंबर रोजी रात्री उशिरा हा धमकीचा फोन आला होता. पांडे यांनी स्थानिक पोलिसांना या धमक्यांची माहिती दिली आणि रेकॉर्डिंग तपासासाठी सादर करण्यात आली आहे.

मथुरा येथील श्रीकृष्णजन्मभूमी स्थळाशी संबंधित अनेक कायदेशीर खटल्यांमध्ये सक्रिय सहभाग असल्याने पांडे यांना या प्रकरणात यापूर्वीही अनेक धमक्या आल्या आहेत.


थंडी वाढल्याने काश्मीर खोऱ्यातील वातावरण सध्या आल्हाददायक झाले आहे. श्रीनगरमधील मुघल गार्डनमध्ये चिनारची झाडे बहरलेली असल्याने तिथे पर्यटकांची गर्दी वाढत आहे

# मणिपुरातील सहा पोलिस ठाणे हद्दीत पुन्हा आफ्स्पा

◆ **नवी दिल्ली, १४ नोव्हेंबर**
हिंसाचारग्रस्त जिरिबामसह मणिपुरातील सहा पोलिस ठाण्यांच्या हद्दीत केंद्र सरकारने पुन्हा सशस्त्र दल विशेष अधिकार कायदा अर्थात् आफ्स्पा लागू केला. सुरक्षा दलांना या परिसरात सुविधा मिळावी, यासाठी हे क्षेत्र अशांत घोषित करण्यात आले.

मणिपुरात सुरू असलेला हिंसाचार आणि तेथील अस्थिर परिस्थिती लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला. ज्या पोलिस ठाण्यांत आफ्स्पा पुन्हा लागू करण्यात आला, त्यात पश्चिम इम्फाळ जिल्ह्यातील सेकमाई, आणि लमसांग, पूर्व इम्फाळ जिल्ह्यातील जिरिबाम, कांगपोक्पीमधील लिमाखाँग आणि बिष्णुपूरमधील मोइरांगटा समावेश आहे.

मणिपूर सरकारचा हा आदेश उपरोक्त सहा पोलिस ठाणे वगळता संपूर्ण राज्यात आफ्स्पा लागू केल्यानंतर आला. १ ऑक्टोबर रोजी आफ्स्पा लादण्याच्या आदेशातून इम्फाळ, लम्फळ, सिटी, सिंगजामेई, सेकमाई, लामसांग, पटसोई, वांगोई, पोरोम्पट, हीनगांग, लमलाईष इरिलबुंगला वगळण्यात आले होते.

# दिशादर्शक पिनाका शस्त्र प्रणालीची यशस्वी चाचणी



◆ **नवी दिल्ली, १४ नोव्हेंबर**
प्रमाणीकरण चाचण्यांचा एक भाग म्हणून भारताने दिशादर्शक पिनाका शस्त्र प्रणालीच्या उड्डाण चाचण्या यशस्वीपणे पूर्ण केल्या आहेत.

या चाचण्यांदरम्यान मारक क्षमता, अचूकता, सातत्य, एकाच वेळी डागल्यानंतर विविध लक्ष्यांचा वेध आदीचे मूल्यांकन करण्यात आले, असे संरक्षण मंत्रालयाने निवेदनात म्हटले आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संघटना अर्थात् डीआरडीओने तात्पुरती आधारभूत गुणात्मकता गरज प्रमाणीकरण चाचण्यांचा एक भाग म्हणून दिशादर्शक पिनाका शस्त्र प्रणालीच्या उड्डाण चाचण्या यशस्वीपणे पूर्ण केल्या आहेत, असे निवेदनात म्हटले.

या चाचण्या तीन टप्प्यांमध्ये विविध चाचणी केंद्रांवर घेण्यात आल्या. लाँचर उत्पादन संस्थांनी आधुनिकीकरण केलेल्या सेवेत असलेल्या दोन पिनाका लाँचर्समधील प्रत्येक उत्पादन एजन्सीच्या बारा रॉकेटची चाचणी घेण्यात आली. स□□रक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी प्रणालीच्या यशस्वी प्रमाणीकरण चाचण्यांसाठी भारतीय लष्कराचे कौतुक केले. या मार्गदर्शित पिनाका शस्त्र प्रणालीच्या समावेशामुळे सशस्त्र दलांच्या तोफखाना शक्तीला आणखी चालना मिळेल, असे राजनाथसिंह यांनी सांगितले.

### २०२७ पर्यंत भारताची वार्षिक वृद्धी ७ टक्के

**नवी दिल्ली** : वाढलेला पायाभूत खर्च आणि क्रयशक्ती पाहता मार्च २०२७ पर्यंत भारताची वार्षिक वृद्धी ६.५ ते ७ टक्क्यांनी होईल, असा अंदाज जागतिक मानांकन संस्था एस ॲण्ड पीने गुरुवारी वर्तवला. चांगल्या आर्थिक वाढीच्या शक्यता बँकांच्या मालमत्तेच्या गुणवत्तेला समर्थन देत राहतील, तर मजबूत कॉर्पोरेट ताळेबंद व सुधारित जोखीम व्यवस्थापन पद्धती मालमत्तेची गुणवत्ता आणखी स्थिर करतील, असे अहवालात म्हटले आहे.

# चिमुकल्यांचा स्क्रीन टाईम झाला साडेसात तास!

### शारीरिक, भावनिक आरोग्यासाठी धोक्याची घंटा

### तंत्रज्ञान ठरतेय् कट्टर शत्रू

◆ **नवी दिल्ली, १४ नोव्हेंबर**
आपल्या घरात आज मोबाईल, टॅबलेट आणि इतर इलेक्ट्रानिक उपकरणे जीवनावश्यक बनली आहेत. नव्या पाहणीनुसार, चिमुकल्यांचा स्क्रीन टाईम वाढला असून, तो सरासरी साडेसात तास इतका झाला आहे. त्याचा सर्वाधिक विपरित परिणाम मुलांवर होत आहे. याच्या अतिवापरामुळे मुलांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होत आहे.

नॅशनल इन्स्टिट्यूट ऑन ड्रग ॲब्युजच्या अहवालानुसार, किशोरवयीन मुले दररोज ७ तास २२ मिनिटे स्क्रीनवर घालवतात. या संशोधनात शाळेत शिकत असताना वापरल्या जाणाऱ्या कॉम्प्युटर स्क्रीन टाईमचा समावेश करण्यात आलेला नाही. स्क्रीनवर सतत लक्ष केंद्रित केल्याने मुलांच्या डोळ्यांवर ताण वाढतो, ज्यामुळे डोळ्यांची जळजळ, अंधूक दृष्टी, डोकेदुखी आणि चिंता यासारख्या समस्या उद्भवू शकतात. याव्यतिरिक्त स्क्रीनचा जास्त वापर केल्याने एकाग्रतेचा अभाव, झोपेत व्यत्यय आणि मुलांमध्ये चिडचिडेपणा वाढू शकतो.



### काय आहेत उपाय...

अमूक समस्या आहे, एवढेच सांगणे पुरेसे नसते. त्यावरील उपायही सांगता आला पाहिजे. म्हणून संशोधकांनी यावर काही उपाय सुचविले आहेत.

- **स्क्रीन टाईम सेट करणे**
- **डिजिटल उपकरणांचा वापर मर्यादित करणे**
- **'नो स्क्रीन डे' पाळता येईल**
- **निसर्गाच्या संपर्कात राहणे**
- **मुलांसोबत कला, हस्तकला करणे**
- **कौटुंबिक कामात मुलांना गुंतवणे**
- **डिजिटल उपकरणांना पर्याय देणे**

### स्क्रीन टायमिंगचा प्रभाव पाहा

स्क्रीन टाईम मर्यादित केल्यानंतर मुलांच्या वर्तनात काही बदल लक्षात येऊ शकतात. मुलांच्या एकाग्रता, झोपेची गुणवत्ता आणि सामाजिक वर्तनात सकारात्मक बदल होऊ शकतात. मुलांच्या शारीरिक हालचाली देखील सुधारू शकतात, ज्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास होतो.

श्री क्षुधाशांती सेवा संस्था
नवीन बसस्टँड व गांधी बगीच्या जवळ जळगाव. फोन २२२८९९६
शुध्द व सकस आहार अत्यल्प दरात सर्व समाजास पुरविण्यास कटिबध्द संस्था
सकाळी १० ते ८
(जेवण पार्सल उपलब्ध)
शुक्रवार, दि. १५ नोव्हेंबर२०२४
लसुण चटणी, शेंगदाणे चटणी, ताक, वेफर्स, उपवास चिवडा, मुरमुरे चिवडा उपलब्ध आहे.
सँडविच भाकरी २० रू. नग पोळी भाजी १५ रु. प्लेट मेथी पराठा व चटणी २० रू. मसाला पुरी उपलब्ध.
पार्सल मिळेल.
पार्सल वेळ १० ते ८ पर्यंत
सर्व पार्सलमध्ये उपलब्ध आहे
ऑर्डर- एम.एम.पाटील मो.क्र. ९३७२३२६४६० वर नोंदवावी.
केशवस्मृती सेवासंस्था समूहाचा उपक्रम
सर्व प्रकारच्या ऑर्डर्स स्वीकारल्या जातील.

## अग्रलेख...

# बांगलादेशी घुसखोर आणि रोहिंग्यांबद्दल एवढा पुळका कशासाठी?

काँग्रेस, ममतांची तृणमूल काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी देशाच्या ऐक्याचा विचार न करता कायम तुष्टीकरणाचेच राजकारण केले. आजही त्यांची ती सवय कायम आहे. सत्ताप्राप्तीसाठी देश गहाण ठेवायलाही ही मंडळी मागेपुढे पाहणार नाहीत, हे आजवरच्या त्यांच्या वर्तनावरून स्पष्ट होते. आज देशात बांगलादेशी आणि रोहिंग्या या घुसखोरी करून बेकायदेशीरपणे शिरलेल्या मुस्लिमांची वाढलेली प्रचंड संख्या आणि त्यांनी घातलेला धुडगूस लक्षात घेता देशाच्या एकात्मतेला आणि अखंडतेला धोका निर्माण झाला आहे. अवैधरीत्या घुसलेल्या रोहिंग्यांना आणि बांगलादेशींना हुडकून काढत देशाबाहेर काढण्याच्या मोदी सरकारच्या प्रयत्नांमध्ये कायम अडथळे आणण्याचे पाप ममता बॅनर्जी यांनी आणि काँग्रेस व इतर विरोधकांनी केले आहे. घुसखोरीला आळा घातला नाही आणि बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या रोहिंग्यांना हाकलले नाही तर भविष्यात परिस्थिती हाताबाहेर जाईल, हे लक्षात घेतले पाहिजे. विधानसभा निवडणूक होत आहे. मतदान करण्यापूर्वी मतदारांनी या बाबीचा गंभीरपणे विचार केला पाहिजे. राष्ट्रहित साध्य करणाऱ्या पक्षाला आणि उमेदवारालाच मत दिले पाहिजे. आपल्या देशातील कथित उदारमतवादी मंडळींना आणि स्थापनेपासून अल्पसंख्यकांचे तुष्टीकरण करत आलेल्या काँग्रेसी नेत्यांना रोहिंग्या मुसलमानांचा फारच पुळका येतो. देशातील गरीब मुसलमानांबद्दल जराही कळवळा नसलेली ही मंडळी रोहिंग्यांना आश्रय मिळावा म्हणून सरकारच्या विरोधात बाह्या सरसावून पुढे येत असतात. या मंडळींना रोहिंग्यांचा एवढाच पुळका असेल, त्यांच्यावर अन्याय होत आहे असे वाटत असेल, त्यांच्या मानवाधिकारांची बूज राखली जायला हवी असे वाटत असेल, तर खुशाल या मंडळींनी स्वतःच्या घरी रोहिंग्यांना आश्रय द्यायला हवा. सरकारनेही या कामात अडथळा आणू नये. काँग्रेसी नेत्यांची वाचाळ फौज रोहिंग्यांना आश्रय देण्यासाठी सरकारविरोधात काहीबाही बोलत असतात. ममता बॅनर्जी तर केंद्र सरकारला दम भरत असतात. यांना रोहिंग्यांची एवढीच काळजी वाटत असेल तर त्यांनी आधी किमान चार रोहिंग्या मुसलमानांना स्वतःच्या घरी आश्रय द्यावा. स्वतःच्या बंगल्यात चार रोहिंग्यांना आश्रय द्यावा, त्यांच्या उपजीविकेची व्यवस्था करावी. रोहिंग्या मुसलमानांची बाजू घेत तुष्टीकरणाचे राजकारण करण्याऐवजी काँग्रेसने देशातील गरीब मुस्लिम बांधवांच्या भविष्याचा विचार करावा. पण, तसे काँग्रेस कधी करणार नाही. कारण, काँग्रेसला मुस्लिमांची फक्त मते हवी आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून देशात दीर्घ काळ काँग्रेसचीच राजवट राहिली आहे. प्रत्येक निवडणुकीत मुस्लिमांची एकगठ्ठा मते कशी मिळतील, याचाच विचार काँग्रेसने सातत्याने केला. मुस्लिम लोक शिकले पाहिजेत, त्यांना रोजगार मिळाला पाहिजे, त्यांची आर्थिक स्थिती सुधारली पाहिजे यासाठी काँग्रेसने कधीच ठोस पावले उचलली नाहीत. त्यामुळे आज देशातल्या मुसलमानांची जी वाईट अवस्था झाली आहे, त्याला फक्त काँग्रेस पक्षच जबाबदार आहे. रोहिंग्यांना सरकारने आश्रय द्यावा, त्यांना सगळ्या नागरी सुविधा पुरवाव्यात, असा डोकं फिरल्यासारखा आग्रह करताना या मंडळींची जीभ जड कशी पडत नाही? कारण देशहित दुर्लक्षित करून फालतू गोष्टींना प्राधान्य देण्याची यांची जुनीच परंपरा आहे. गेल्या काही वर्षांपासून रोहिंग्यांचा प्रश्न कळीचा मुद्दा बनला आहे. स्वतःला शोषित-पीडित वर्गाच्या समस्या सोडविणारा मसीहा समजणारा स्वयंघोषित उदारमतवादी वर्ग रोहिंग्यांना आश्रय द्यावा म्हणून सरकारकडे आग्रही भूमिका मांडत असतो. भारतातील सव्वाशे कोटी जनतेच्या हिताकडे दुर्लक्ष करून केला जात असलेला हा आग्रह म्हणजे दुराग्रहच होय. म्यानमारमध्ये धुमाकूळ घातल्याने ज्यांना देशाबाहेर हाकलण्यात आले, त्या घातक रोहिंग्यांना भारतात आश्रय देण्याचा स्वयंघोषित पुरोगामी आणि उदारमतवादी मंडळींचा आग्रह म्हणजे सव्वाशे कोटी देशवासीयांप्रती असंवेदनशीलताच म्हटली पाहिजे. रोहिंग्ये हे देशविघातक कृत्यांमध्ये सामील होते, म्यानमारमध्ये त्यांनी शेकडो हिंदूंची कत्तल करून त्यांना ठार मारले, हे वास्तव माहिती असतानाही ही ढोंगी उदारमतवादी, छद्म मानवतावादी मंडळी देश अतिरेक्यांच्या हाती सोपवायला निघाली आहेत की काय, अशी शंका कधी कधी वाटते. रोहिंग्यांची लढाई स्वतःच्या खांद्यावर घेऊन ही मंडळी आपल्याच सरकारविरुद्ध लढताना दिसते, तेव्हा वाईट वाटते. ज्या रोहिंग्यांच्या समर्थनार्थ ही मंडळी आपल्याच सरकारविरुद्ध लढाई लढते, त्या रोहिंग्यांपैकी अनेकांचे पाकिस्तानी अतिरेक्यांशी संबंध आहेत, हे माहिती असतानाही ही मंडळी त्यांना आश्रय द्यावा असा आग्रह करीत आहेत, याचा अर्थ त्यांना देशाच्या सुरक्षेशी काहीही देणेघेणे नाही, असाच काढला जावा. सुरक्षेशी संबंधित मुद्दे दुर्लक्षित करून आपल्या साधन-संसाधनांचा हिस्सा रोहिंग्यांसाठी देण्याची तयारी ठेवावी, असे आवाहन ही मंडळी निर्लज्जपणे देशवासीयांना करते, तेव्हा चीड येते. केंद्र सरकार म्हणते त्याप्रमाणे रोहिंग्ये मुसलमान हे अवैध प्रवासी नसून ते शरणार्थी आहेत आणि शरणार्थींना परत पाठविण्याचा सरकारला अधिकार नाही, असा युक्तिवादही या मंडळींकडून केला जातो. शरणार्थींच्या बाबतीत जे आंतरराष्ट्रीय करार झाले आहेत, त्या करारातील तरतुदींनुसार रोहिंग्यांना आश्रय देणे ही सरकारची जबाबदारी असल्याचेही या मंडळींनी अनेकदा म्हटले आहे. वास्तविक, या मंडळींचा युक्तिवाद अतिशय चुकीचा आहे. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचाही चुकीचा दाखला या मंडळींनी अनेकदा दिला. वास्तविक, रोहिंग्या हे शरणार्थी नाहीतच. गेल्या अनेक वर्षांत बांगलादेशी मुसलमान अवैधरीत्या भारतात घुसून देशाच्या विविध भागांत बेकायदेशीरपणे राहात आहेत, तसेच हे रोहिंग्ये भारतात घुसले आहेत आणि म्हणूनच त्यांना हाकलण्याची सरकारची भूमिका योग्य आहे. शिवाय, शरणार्थींना आश्रय देण्यासंबंधी १९५१ साली जो करार करण्यात आला होता, त्यावर भारताने अजूनही स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे या कायद्यानुसार शरणार्थींना आश्रय देणे भारतावर बंधनकारकही नाही. शरणार्थींच्या संदर्भातील १९६७ च्या प्रोटोकॉलवरही भारताने स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे १९५१ च्या करारावर स्वाक्षरी करणाऱ्या देशांवरच शरणार्थींना परत न पाठविण्याचे बंधन आहे. ही बाब लक्षात न घेता स्वयंघोषित उदारमतवादी मंडळी अकलेचे तारे तोडत देशहित दुर्लक्षित करून सव्वाशे कोटी जनतेच्या आशा-आकांक्षांवर पाणी फेरण्यासाठीच या देशात जन्माला आल्यागत वागत आहेत. अकलेचे तारे तोडण्याच्या बाबतीत या स्वयंघोषित मंडळींनी कळसच गाठला आहे. रोहिंग्यांच्या मूलभूत अधिकारांचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला आहे. भारत हे एक गणराज्य आहे. भारताने २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना लागू केली. त्यात नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचा आणि कर्तव्यांचा उल्लेख करण्यात आला आहे. मूलभूत अधिकार हे भारताच्या नागरिकांना आहेत; रोहिंग्यांना ते कसे लागू होतील? प्रश्नच नाही. पण, रोहिंग्यांना भारतात आश्रय देत त्यांचा मसीहा होण्याच्या प्रयत्नात असलेली ही मंडळी आंधळी झाली आहेत. या लोकांना एवढीच खाज आहे, तर त्यांनी आधी रोहिंग्यांना स्वतःच्या घरी आश्रय द्यावा, स्वतःच्या संपत्तीमधील ठरावीक वाटा त्यांना द्यावा आणि त्यांचे यथायोग्य पुनर्वसन केल्यानंतर भारतीय नागरिकत्वासाठी अर्ज करावा. पण, ही सगळी मंडळी ढोंगी आहेत, स्वार्थी आहेत, यांच्या भावभावनाही नकली आहेत, त्यांना रोहिंग्येच काय, मानव जातीबद्दलही प्रेम-जिव्हाळा असेल असे अजिबात वाटत नाही. या देशाचा नागरिक असलेल्या प्रत्येकाला अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य आहे, देशात कुठेही प्रवास करण्याचे आणि वास्तव्याचेही स्वातंत्र्य आहे. पण, हे स्वातंत्र्य फक्त नागरिकांना आहे; अन्य कोणालाही नाही. त्यामुळे हा मुद्दा पुढे करून उदारमतवादी मंडळी आणि काँग्रेसवाल्यांनी देशातील जनतेची दिशाभूल करू नये आणि रोहिंग्यांनाही फालतू आशा दाखवू नये. आपले संविधान अगदी स्पष्ट आहे. त्यातील तरतुदीही स्पष्ट आहेत. असे असतानाही जर कुणी रोहिंग्यांच्या मूलभूत अधिकारांच्या बाता मारत असेल तर त्याला जनतेनेच उघड पाडले पाहिजे. मतदानाची तारीख जवळ आली आहे. विवेकाचा वापर करून, देशहित डोळ्यांपुढे ठेवत मतदान केले तर सर्व समस्या निकाली निघतील, यात शंका नाही.

## जीवन जिज्ञासा

# महाभारत ते भारत (८)

प्राचार्य प्र. श्री. डोरले

भारतभूमी ही धर्मभूमी आहे. धर्म हा तिचा प्राण आहे. अनादिकाळापासून ही धर्मपरंपरा गंगेसारखी अव्याहतपणे अप्रतिहत गतीने या देशात, समाजात वाहत आली आहे. कालमानाप्रमाणे हा धर्म प्रवाह कधी कमी, कधी जास्त वेगाने वाहत आला असेल; पण तो नष्ट मात्र झाला नाही. त्याला नष्ट, भ्रष्ट करण्याचे अथक प्रयत्न जगातील अनेक पाशवी आक्रमणकारी शक्तींनी करून पाहिले, पण ते यशस्वी झाले नाही. या उलट तो प्रयत्न करणारे परास्त झाले; संपले, पण भारताचा हा सनातन धर्म मात्र अद्याप कायमच आहे. त्याला नष्ट करण्याच्या अखंड प्रयत्नांची पराकाष्ठेची प्रतिक्रिया म्हणून सद्यःस्थितीत त्याला जागृती येत असल्याची सुचिन्हे दिसू लागली आहेत. कुंभकर्णासारखा निद्रिस्त असलेला हा समाजपुरुष जागृत होऊ लागल्याची लक्षणे दिसू लागली आहेत. १८९३ सालच्या जागतिक धर्म परिषदेच्या भव्य व्यासपीठावरून नव्या युगाचे प्रेषित स्वामी विवेकानंदांनी 'मी हिंदू असल्याचा मला अभिमान आहे' ही घोषित केलेली उद्घोषणा 'गर्व से कहो हम हिंदू है, सनातन धर्म की जय' या रूपाने हळूहळू संपूर्ण भारतात प्रतिध्वनित होऊ लागली आहे. या जागृतीच्या प्रक्रियेने खऱ्या अर्थाने मूळ जर धरले तर त्यातूनच आधुनिक काळातील 'महाभारत' घडल्याशिवाय राहणार नाही. कारण, मागील काही लेखांत पाहिल्याप्रमाणे कोणत्याही युगातील फाळणीचा परिणाम हा शेवटी कुरुक्षेत्रावरील महायुद्धात म्हणजे संघर्षातच परिणीत होत आला आहे. त्यामुळेच आज भारतातील अंतर्गत परिस्थितीचा निरपेक्षपणे वस्तुस्थितीला धरून विचार केला तर भारत हा अंतर्गत यादवीच्या, गृहयुद्धाच्या उंबरठ्यावर उभा होतो आहे का? याचा विचार करण्याची, चिंतन करण्याची खरी वेळ भरताचे वंशज असलेल्या हिंदूंवर, हिंदू समाजावर आली आहे. कारण हा लढा 'धृतराष्ट्री मनोवृत्तीच्या' आणि 'युधिष्ठिरी मनोवृत्तीच्या' आजच्या परिभाषेत आडपडदा न ठेवता सांगायचे झाले तर हिंदू आणि मुस्लिम मनोवृत्तीमध्ये असलेला, दोन भिन्न मानसिकतेमधील असलेला लढा आहे. दोन


मोपल्यांचे बंड

तलवारी जशा एका म्यानामध्ये राहू शकत नाही त्याप्रमाणे या दोन भिन्न मनोवृत्ती गुण्यागोविंदाने, सोज्वळपणाने, पूर्णतः एकरूपतेने नांदूच शकत नाही. निसर्गाच्या, प्रकृतिधर्माच्या विरुद्ध ते आहे. महाभारतात याचे शत्रू-मित्र संबंधात विवेचन करताना असे म्हटले आहे की, 'भक्ष्य आणि भक्षक' हे नाते प्रकृतिसिद्धच आहे. तो त्यांचा स्वभाव आहे. वृत्ती आहे. त्याप्रमाणे क्रियान्वयन, कर्माचे आचरण होत असते. मांजर उंदराला खाणारच, सरडा मुंग्यांना खाणारच, मुंगूस सापाला मारणारच, वाघ-सिंह कोवळ्या हरीण-शावकांवर ताव मारणारच त्या नियमानुसार प्रकृती नियमानुसार असुरी संपदा आणि दैवी संपदा यांचा संघर्ष हा सनातन संघर्ष आहे. त्यामुळे दुष्ट, क्रूर, पीडादायक, दीर्घ द्वेषी, सापाप्रमाणे डूक धरून दंश करण्यासाठी टपून बसलेल्या आपल्या स्त्रिया, धनसंपदा, समृद्धीची अभिलाषा धरून वेळेची वाट पाहणाऱ्या आणि अनुकूल संधी प्राप्त झाल्याबरोबर ते हडप करणाऱ्या कन्यांचे, स्त्रियांचे अपहरण करून त्यांच्यावर बलात्कार करणाऱ्या अशा शत्रूचे समूळ निर्दालन करणे हेच तुझे आद्य कर्तव्य आहे. (महाभारत-कणिक नीती)

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनापासून 'हिंदू आणि मुस्लिमांचे' म्हणजे परस्परांविरुद्ध निसर्गतःच असलेल्या मानसिकतेचे एकत्रिकरण करण्याचा, अनैसर्गिक प्रयत्न भारतातील महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू यांनी काँग्रेस या पक्षाद्वारे करण्याचा प्रयत्न केला. त्याच्यासाठी खिलाफत चळवळीची आफत कारण नसताना ओढवून घेतली. त्याने ना अलिबंधू संतुष्ट झाले, ना जिहादी मनोवृत्तीमुळे हिंदूंना शत्रू म्हणजे 'काफर' समजणारा मुस्लिम समाज संतुष्ट झाला. बंगालपासून ते केरळमधील मोपल्यांचे बंडापर्यंत आसुरी संपदेला शोभेसे अत्याचार, बलात्कार, कत्लेआम करून सहस्रावधी हिंदूंचे शिरकाण त्यांनी केले. त्यांच्या या अत्याचारी, बलात्कारी कृतीला महात्मा गांधींनी 'माझे धर्मप्रेमी, धर्मवीर मोपला बंधू' या कौतुकाने पुरस्कृत केले. येथेच हे थांबले नाही तर या मृगतृष्णेच्या मागे भरतवंशीय आणि त्यांचे नेते धावत राहिले. 'भक्ष्य आणि भक्षक' हा निसर्गसिद्ध असलेला अहिनकुलवत न्याय जो महाभारतात सहस्रावधी वर्षांच्या आधी सांगून ठेवला आहे. त्याच्याकडे आम्ही दुर्लक्ष केले. त्याची कटू फळं आज आम्ही भोगत आहोत. महाभारतातील या निसर्गसिद्ध, प्रकृतिसिद्ध न्यायाला अनुसरून एका महान देशभक्ताने, भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या संपूर्ण जीवनाचा होम करणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांनी द्विराष्ट्र सिद्धांतावर आधारित देशाच्या फाळणीकडे काँग्रेसची होणारी वाटचाल व स्वीकार्यतेची मानसिकता लक्षात घेऊन एक निर्वाणीचा इशारा म्हणून पं. जवाहरलाल नेहरूंना एका पत्रात लिहिले होते की, (१९३८) हा हिंदू आणि मुस्लिम अशा प्रकारचा संघर्षच नाहीये तर हा निसर्गतःच भिन्न असलेल्या दोन तत्त्वज्ञानांचा, दोन मनोवृत्तींचा संघर्ष आहे. या दोन्ही एकत्रित नांदूच शकत नाही. यावर एकच उपाय आहे. 'आयदर 'अखंड पाकिस्तान' ऑर 'अखंड हिंदुस्तान.' मुस्लिमांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांचे म्हणणे ऐकले आहे, असे वाटते. कारण ते 'गजवा-ए-हिंदुस्तान,' औरंगजेबाचे हिंदुस्तानला 'दारूल इस्लाम' करण्याचे अपूर्ण राहिलेले स्वप्न पूर्णत्वाला नेण्यासाठी कंबर कसून उभे राहिले आहेत.

'द्रष्ट्या' असलेल्या सावरकरांनी काय करायचे?

९८६०२९६१३१

(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

## वेध

संजय रामगिरवार

# खर्च मर्यादा!

क्रांतिभूमी चिमूर येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ऐतिहासिक सभा मंगळवारी पार पडली. याआधी कधीच देशाचे पंतप्रधान चिमुरात निवडणूक प्रचारासाठी आले नव्हते. या अर्थाने आणि प्रचंड मोठा जनसागर या सभेला लोटला याही अर्थाने ही सभा अभूतपूर्व ठरली. सभा सुरू होण्यापूर्वीचा एक गमतीशीर प्रसंग आहे. ज्या दारातून अतिमहत्त्वाच्या व्यक्ती, युतीचे मोठे नेते आणि पूर्व विदर्भातील युतीचे उमेदवार मंचावर जात होते, तेथे कडेकोट सुरक्षा व्यवस्था होती. ज्यांच्याकडे सभेच्या व्यासपीठावर जाण्याचे अधिकृत ओळखपत्र होते, त्याच व्यक्तीला सुरक्षा अधिकारी जाऊ देत होते. काही कारणास्तव अनेकांचे ओळखपत्र तयार नव्हते. त्यामुळे चिमूरला सभेसाठी येऊनही मोठ्या नेत्यांना आणि काही उमेदवारांनासुद्धा व्यासपीठापर्यंत पोहोचता आले नाही. ओळखपत्राशिवाय आल्यापावली परत जाणाऱ्यांत माजी केंद्रीय गृहराज्य मंत्री तथा राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांचाही समावेश होता. ओळखपत्र नाही म्हणून अहिर यांनी आपली गाडी दारातूनच वळवून घेतली आणि ते चंद्रपूरकडे रवाना झाले. तेथे उपस्थित काही पत्रकारांशी ते बोललेसुद्धा नाहीत. पण खरी गंमत पुढे आहे.

राजुरा विधानसभा मतदार संघातील युतीचे उमेदवार देवराव भोंगळे यांचेही ओळखपत्र तयार नव्हते. त्यामुळे त्यांनाही सुरक्षा व्यवस्थेने आत जाऊ दिले नाही. तणतण करीत ते बाहेर पडले. बाहेर त्यांच्या ओळखीचे काही पत्रकार उभे होते. त्यांनी भोंगळेंना विचारले, ''काय झाले भाऊ?'' त्यावर ते लगेच उत्तरले, ''मला मंचावर जाऊ देत नाही. पण चला बरेच झाले, माझे आठ लाख रुपये वाचले!'' त्यानंतर थोड्याच वेळात त्याच दारासमोर रेंगाळत असलेले भंडारा जिल्ह्यातील



सेनेचे उमेदवार नरेंद्र भोंडेकर आत जातच नव्हते. त्यांच्याकडे बाकायदा ओळखपत्र होते; तरीही ते मंचावर जायला तयार नव्हते. त्यांच्याच एका ओळखीच्या व्यक्तीने त्यांना विचारले, ''उमेदवार साहेब, आपण मंचावर का जात नाही?'' तर तेही बोलले, ''भाऊ, निवडणुकीचा खर्च खूप झाला आहे. आता हे आठ लाख त्यात जोडले गेले तर मी प्रचार कसा करू जी!''

या दोन्ही प्रसंगातून उमेदवारांनी अधिकृत खर्चाची कशी धास्ती घेतली आहे, हे कळते. एका उमेदवाराला खर्चाची जास्तीत जास्त मर्यादा ही ४० लाख रुपये आहे. याच मर्यादेत त्याने आपला निवडणूक खर्च पूर्ण करावा, अशी आदर्श आचारसंहिता आहे. खरे तर, यापेक्षा कितीतरी जास्त खर्च होतो, हे उघड गुपित आहे. पण सर्व खर्च मर्यादेत बसवूनच सादर केला जातो. संबंधित यंत्रणा देयक तेवढे बघते. जास्तीचा खर्च आपल्या अधिकृत खर्चात दिसू नये म्हणून उमेदवारांनी आणखी एक युक्ती शोधली आहे. कोणतीही जाहीर सभा, बैठका आयोजित केल्यानंतर सभेला आलेल्या मतदारांसाठी भोजनाची व्यवस्था करणे उमेदवाराचे कर्तव्य मानले जाते. पण एवढ्या लोकांच्या जेवणाचा खर्च केल्यास थाळीच्या शासकीय दरानुसार मोठा खर्च उमेदवाराच्या खर्च मर्यादेत जोडला जाऊ शकतो, या भीतीने आता सभा किंवा बैठक एखाद्या देवस्थानाजवळ घेतली जाते. सभा आटोपली की घोषणा केली जाते... 'सर्वांच्या प्रसादाची व्यवस्था अमुक देवस्थानाकडून केली गेली आहे, त्याचा लाभ घ्यावा!' खरे तर, ही व्यवस्था कुणी केली आहे हे जवळजवळ उघड असते; पण ते यंत्रणेला सिद्ध करता येत नाही आणि अशा काही गोष्टी चालूनही जातात!

खरे तर, पूर्वीसारखी निवडणूक आता राहिलेली नाही. कच्चा चिवडा आणि घुटभर चहावर कार्यकर्ते साध्या गाड्यांमध्ये बसून प्रचाराला निघायचे. आता एसी गाडी आणि हॉटेलात सुरुची भोज घेतल्याशिवाय कार्यकर्ते प्रचारच करीत नाहीत. सभेला गर्दी जमवायची म्हणजे गावात गाड्या पाठवाव्या लागतात. प्रचार-प्रसाराचा खर्च, जेवणावळी आणि अन्य काही अनधिकृत खर्चही असतोच आणि त्यामुळे निवडणूक आयोगाने आदर्श आचारसंहितेनुसार आखून दिलेली ४० लाखांची मर्यादा केव्हाच ओलांडली जाते. पण खर्च मर्यादेत सादर केला जातो आणि सारे काही निभावलेही जाते. खर्चाचेच काय घेऊन बसलो आपण, आजकाल निवडणुकीत साऱ्याच बाबतीत मर्यादेचे उ□ल्लंघन होत नाही का? उमेदवारांच्या आरोप-प्रत्यारोपांच्या फैरीही कुठे मर्यादेत राहिल्या आहेत. त्याही मर्यादेपलीकडे गेल्या आहेत... असो.

९८८१७१७८३२

## प्रासंगिक

# प्रत्येक हिंदूने लढलेच पाहिजे मतांचे हे धर्मयुद्ध!

मोरेश्वर बडगे

विधानसभा निवडणुकीला आता फक्त पाच दिवस उरले आहेत. २० नोव्हेंबरला मतदान आहे. २३ नोव्हेंबरला निकाल आहे. दर पाच वर्षांनी निवडणूक येते आणि जाते. मात्र, या वेळची निवडणूक त्यातली नाही. ही निवडणूक राज्याची असली, तरी देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी, उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ प्रचार सभा करीत आहेत. 'बटेंगे तो कटेंगे' असा असा नारा देत योगी यांनी हिंदू समाजाला सावधानतेचा इशारा दिला. 'एक है तो सेफ है' असे मोदी म्हणाले. या दोन्ही नाऱ्यांची जोरदार चर्चा आहे. निवडणूक आहे म्हणून काहीतरी घोषणा दिली पाहिजे म्हणून या नेत्यांनी हे नारे दिले नाहीत. त्यामागे दूरदृष्टी आहे. हिंदू समाजापुढे काय भयंकर संकट वाढून ठेवलंय, ते लक्षात आणून देणारे हे नारे आहेत. लोकसभा निवडणुकीत आपले तोंड पोळले. ज्या पद्धतीने धार्मिक ध्रुवीकरण करून मतं मागितली गेली त्याचा तडाखा भाजपाला बसला. महाराष्ट्रात तर मोठा खड्डा पडला. त्यामुळे मोदी 'चारसो पार' पोहोचू शकले नाहीत. मित्रपक्षांची मदत घेऊन मोदींना सरकार बनवावे लागले. धुळे या लोकसभा मतदारसंघाचे उदाहरण हिंदूंचे डोळे उघडणारे ठरावे. या मतदारसंघातील सहा जागांपैकी पाच जागी भाजपाचे उमेदवार निवडून आले. धुळ्यात डॉ. सुभाष भामरे आघाडीवर होते. तरीही पराभूत झाले. पाच जागांवरची भाजपाची आघाडी केवळ एका मालेगाव मध्य मतदारसंघातून काँग्रेसच्या मुस्लिम उमेदवाराने कापून काढली. एवढेच नव्हे, तर चार हजारांनी तो विजयीही झाला. मुस्लिम फॅक्टर इतक्या घट्टपणे गठ्ठा मतदान करतो, लोकसभेची जागा जिंकू शकतो, हे महाराष्ट्राने पाहिले. मुस्लिम भागात सर्वच जागी अशा पद्धतीने एकगठ्ठा मतदान झाले आहे. हिंदूंची मतं मात्र वाटल्या गेली. त्यामुळे महाविकास आघाडीला ४८ पैकी ३० जागा मिळू शकल्या. मोदी अनेक कायद्यांमध्ये सुधारणा आणताहेत. घटनेचे ३७० वे कलम रद्द झाले. आता वक्फ कायद्यात सुधारणा करणारे महत्त्वाचे विधेयक त्यांनी आणले आहे. गेल्या ७० वर्षांत आपल्या देशात हिंदुविरोधी राजकारण झालं. मोदी साफसफाई करीत आहेत. सध्या आपल्या देशात हिंदू ८० टक्के आहेत. पण हिंदुविरोधी राजकारण चालत राहिले तर एक दिवस भारतातच हिंदू उपरा होईल, अल्पसंख्यक होईल. हा धोका मोदींनी ओळखला आणि त्या दिशेने त्यांच्या हालचाली सुरू आहेत. हा राजकारणाचा विषय नाही. हिंदुत्व टिकले, इथल्या धर्म-परंपरा टिकल्या तर हिंदू टिकेल. शेजारच्या बांगलादेशात काय सुरू आहे, हे आपण उघड्या डोळ्यांनी पाहतो आहोत. तिथल्या पंतप्रधानाला



पळून भारतात यावे लागते, जे पळू शकत नाही त्या तिथल्या हिंदूंवर अत्याचार सुरू आहेत. भारतात हे होऊ द्यायचे नसेल, हिंदू म्हणून पुढच्या पिढ्यांना जगू द्यायचे असेल तर हिंदूंनी सावध झाले पाहिजे. या विधानसभा निवडणुकीत हिंदूंना ही संधी आहे. हिंदू हिताच्या गोष्टी करेल त्यालाच मतदान झाले पाहिजे. मुस्लिमांचे १०० टक्के मतदान होते. मग हिंदूंचे १०० टक्के मतदान का होऊ शकत नाही? मतदानाशी आपल्याला काही देणेघेणे नाही; आपला काय फायदा? ही मानसिकता आता तरी हिंदूंनी सोडली पाहिजे. प्रत्येक हिंदूने मतदानाला गेलेच पाहिजे.


आताच्या निवडणुकीत महायुती विरुद्ध महाआघाडी अशी टक्कर आहे. काँग्रेस, शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव ठाकरेंची शिल्लक सेना या तीन पक्षांनी मिळून महाआघाडी बनवली आहे. गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्राच्या राजकारणात खूप उलथापालथ झाली. भाजपासोबत युती करून उद्धव ठाकरे विधानसभा लढले. मात्र, निकालानंतर शरद पवारांकडे जाऊन बसले. अडीच वर्षांचे मुख्यमंत्रिपद भोगले. अखेर त्यांच्याच ४० आमदारांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली बंड करून सरकार पाडले. भाजपाने एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात सरकार बनवले. गेल्या वर्षी या महायुतीत अजित पवारही सामील झाले. आपले काका म्हणजे शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष फोडून अजितदादांनी खळबळ उडवली. लोकसभा निवडणुकीत मात्र अजितदादा ताकद दाखवू शकले नाहीत. त्यांची पत्नी बारामतीत पराभूत झाली. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीचे गणित वेगळे असते. यावेळी रणांगणात उमेदवारांची भाऊगर्दी आहे. आघाडी आणि महायुती यांचेही बंडखोर आहेत. राज ठाकरे स्वबळावर लढताहेत. वंचित बहुजन आघाडी, बहुजन समाज पक्ष... खूप सारे मैदानात आहेत. मोठ्या प्रमाणावर मतविभाजन होणार आहे. ओबीसींमधून मराठा आरक्षण मिळाले पाहिजे हा मुद्दा मनोज जरांगे पाटील यांनी जोरदार पेटवला. जरांगे पाटलांनी सुरुवातीला चांगला माहोल बनवला होता; मात्र शेवटच्या दिवशी निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली. 'पाडायचं त्याला पाडा' आणि 'आणायचं त्याला आणा' अशी भूमिका सध्या त्यांनी घेतली आहे. मात्र, वारंवार मारलेल्या कोलांटउड्यांमुळे त्यांनी स्वतःचा 'अण्णा हजारे' करून घेतला. मराठवाड्यापुरती जरांगे पाटील धूम करू शकतात, असा त्यांच्या समर्थकांचा दावा आहे. त्यामुळे कोणाचे सरकार येणार? कोणाला बहुमत मिळेल? याची जोरदार चर्चा आहे. '५० ते ६० आमदार निवडून आणता येतील' असे शिल्लक राष्ट्रवादीचे सुप्रीमो शरद पवार यांनी एक मुलाखतीत म्हटले आहे. लोकसभा निवडणुकीत शरद पवारांचा स्ट्राईक रेट तगडा होता. तेच ५०-६० जागांवर थांबले; याचा अर्थ काँग्रेस आणि ठाकरे सेना २५-२५ जागांच्या आत निपटतील. म्हणजे महाआघाडी १०० जागांच्या आत गुंडाळली जाईल. बहुमतासाठी १४५ आमदार हवेत. शरद पवार माणसं फोडण्यात वस्ताद आहेत. थोडे लागले तर पवार पुतण्यालाही फोडून आणू शकतात. हा जर-तरचा प्रश्न झाला. मुळात शरद पवारांनाच बहुमताची खात्री नाही. बहुमताची थोडीही खात्री असती तर पवारांनी आपला आकडा वाढवून सांगितला असता. यावेळी त्यांनी उभे केलेले बहुसंख्य उमेदवार इकडून तिकडून उधारीवर आणलेले आहेत. उद्धव ठाकरे यांचा करिष्मा संपला आहे. त्यांच्याबद्दल सहानुभूती तर अजिबात नाही. त्यामुळे उद्धव यांची चिडचिड वाढली आहे. वणीमध्ये निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांच्या बॅग तपासल्या. त्यावर त्यांनी खूप आरडाओरड केली. रोज सकाळी संजय राऊत यांचा भोंगा वाजवून उद्धव यांनी स्वतःचे नुकसान करून घेतले. पाच महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी होते तसले वातावरण आज नाही. त्या काळात विरोधकांनी खूप खोटा प्रचार केला. त्या खोट्या प्रचाराला लोक भुलले. यावेळी भाजापाच्या विरोधात ठोस असा मुद्दाच विरोधकांकडे नाही. राहुल गांधींनी नागपुरात 'लाल डायरी' दाखवून स्वतःची फजिती करून घेतली. नाना पटोले, विजय वडेट्टीवार आणि यशोमती ठाकूर या तिघांनाही मुख्यमंत्री व्हायचंय. 'एक अनार और सौ बीमार' अशी परिस्थिती आहे. ज्याच्या जास्त जागा येतील त्याचा मुख्यमंत्री, असे सूत्र ठरले आहे. त्यामुळे महाआघाडीमध्ये एकमेकांचे उमेदवार कसे कमी निवडून येतील, याची चढाओढ लागलेली दिसते. याच्या नेमके चित्र महायुतीत आहे. देवेंद्र फडणवीस यांनी प्रचाराची धुरा व्यवस्थित सांभाळली. मित्रपक्षांमध्ये कुठलाही वाद झाला नाही, हे फडणवीस यांच्या नेतृत्वाचे विशेष म्हणावे लागेल. तुम्ही लिहून ठेवा, महायुती किमान १८० जागा जिंकेल. हरयाणाच्या निकालामुळे महायुतीत उत्साहाचे वातावरण आहे. अमेरिकेच्या अध्यक्षपदी दुसऱ्यांदा विजयी झाल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेतील हिंदूंचे आभार मानले. यातूनही चांगला संदेश गेला आहे.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### आम्ही हे तरी करू शकतो ना?

आम्ही मध्यम वर्ग, आमचा मध्यम मार्ग. आम्ही कोणाच्या अध्यात-मध्यात नाही. आपली नोकरी, काम, व्यवसाय शक्य



तेवढ्या इमानदारीने करतो, टॅक्स निमूट नियमित भरतो, शासन-प्रशासनाला त्रास होईल, असे वागत नाही, नियम पाळतो. आम्ही हजारोंच्या संख्येने रस्ते अडवू शकत नाही, दगडफेक आम्हाला येत नाही, जाळपोळ दंगा करणे... आम्ही स्वप्नात पण विचार करत नाही. नियम कायदे पाळतो. मतदान जमेल तर करतो, नाही तर नोटा दाबतो, पण.... पण... असे वागणे आताच्या परिस्थितीत मूर्खपणाचे ठरते आहे, कळते आहे का? त्यांना नावे ठेवतो, शिव्या पण देतो (मनातल्या मनात), टीव्हीवर डिबेट ऐकतो, पेपर वाचतो, पण बस, मग आपल्या कामाला 'मला काय त्याचे' हे आमचे आवडते पालुपद आहे. अफगाणिस्तान, पाकिस्तान, काश्मीर, बंगाल, कर्नाटकमध्ये काय होते ते आम्ही वाचतो आणि विसरतो. कारण ते आमच्या दूर आहे ना. आता जर हेच संकट आपल्या उंबऱ्यावर आले असेल तरी आम्ही काहीच करणार नाही का? नाही नाही याचा विरोध करायला हातात संविधान शस्त्रे घ्यायची गरज नाहीच, पण संविधानाने दिलेले एक शस्त्र आहे आपल्याकडे मतास्त्र. मग लक्षात ठेवा, २० नोव्हेंबरला मतदान करा आणि इतरांचेही मतदान करवून घ्या. मतदान त्यालाच करा जो आमचे व आमच्या महाराष्ट्राचे रक्षण करेल; त्याची भरभराट करेल. शत-प्रतिशत मतदान, राष्ट्र हितात मतदान.

**रवी वाघमारे**

●● ●●

### पाकिस्तानमध्ये क्रिकेट नकोच

'पाकिस्तानने भारतासोबत क्रिकेट खेळणे बंद करावे : रशीद लतीफ' ही बातमी वाचली. पाकिस्तानच्या भूमीवर क्रिकेट खेळण्यास बीसीसीआयने स्पष्ट नकार दिला हे योग्यच आहे. पाकिस्तानबरोबर संबंध सुधारण्यासाठी आजवर भारताने 'राजनीती एक तरफ और कला कल्चर दुसरी तरफ' या

## वाचक पत्रे



विचाराने इतकी दशके बरेच प्रयत्न केले. पण भारताच्या या प्रयत्नांना पाकिस्तानने नेहमीच दहशतवादाने, निष्पाप नागरिकांचे बळी घेऊन आणि आमच्या जवानांवर भ्याड हल्ले करून प्रत्युत्तर दिले. भारताच्या या चांगूलपणाला पाकिस्तानने सातत्याने विश्वासघाताने प्रतिसाद दिला, हे वास्तव आहे. भारतात अशांतता, अराजकता, हिंसाचार आणि दहशतवाद पसरवण्यासाठी काहीही करण्याचे पाकिस्तानने बाकी ठेवलेले नाही. तेव्हा पाकिस्तानवर विश्वास ठेवणे शहाणपणाचे ठरणार नाही. दुसरे महत्त्वाचे म्हणजे आयसीसीमध्ये भारताच्या विरोधात जाण्याची हिंमत सध्या तरी नाही; कारण आयसीसीच्या आर्थिक उत्पन्नामध्ये ८० टक्के वाटा एकट्या बीसीसीआयचा आहे. जर भारताने आंतरराष्ट्रीय क्रिकेटवर बहिष्कार घातला आणि आयसीसीचे उत्पन्न घटले तर पाकिस्तानी क्रिकेट बोर्डाला हातात कटोरा घेऊन दारोदारी फिरावे लागेल, अशी स्पष्टोक्ती पाकिस्तानचा सुप्रसिद्ध खेळाडू रमीझ राजाने केले होते. तिसरा मुद्दा म्हणजे पाकिस्तानी सिलेब्रिटी, बुद्धिजीवी, विचारवंत, तेथील विरोधी पक्षनेते आणि सर्वच खेळाडूंनी पाकिस्तान सरकारवर पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद बंद करण्यासाठी कधीच कोणतेही प्रयत्न केले नाहीत. उलट 'कला आणि कल्चर'च्या माध्यमातून पाकिस्तानी दहशतवाद पसरवण्याला त्यांनी एक प्रकारे मूकसंमतीच दिली आहे. उलट पाकिस्तानला सर्वच क्षेत्रात, जागतिक पातळीवर वाळीत टाकण्याचे प्रयत्न भारताने केले पाहिजेत; त्याशिवाय पाकिस्तानचे दहशतवादी डोके ठिकाणावर येणार नाही. तेव्हा पाकिस्तानने या स्पर्धेचे यजमानपद सोडायला नकार दिला आणि स्पर्धा रद्द करण्याची वेळ आली तरी बेहत्तर; पण पाकिस्तानात जाऊन भारतीय क्रिकेट संघाने आणि बीसीसीआयने आपल्या हुतात्मा जवानांचा आणि पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या निरपराध नागरिकांशी प्रतारणा करू नये. नागरिक हे कधीच सहन करणार नाहीत, याचीही नोंद घ्यावी.

**शिवराम वैद्य**

●● ●●

### प्रवाशांनी सहकार्य करावे

काटोल येथील बसस्टॉपवर गेल्या अनेक दिवसांपासून सिमेंटीकरणाचे काम सुरू आहे. त्यामुळे सर्व बसेस या बसस्टॉपच्या मागच्या बाजूस उभ्या करण्यात येत आहेत. या ठिकाणांवरूनच वरुडकडे तसेच अवतीभवतीच्या खेडोपाडी बसेस जातात. पण बसस्टॉपच्या या मागच्या बाजूस बस उभ्या करण्याकरिता पुरेशी सोय नसल्यामुळे आणि त्यातल्या त्यात शाळांचे विद्यार्थी आणि प्रवाशांची गर्दी खूप होत असल्यामुळे तारांबळ उडते तसेच बसचालकालाही बस या जागी लावणे कठीण होत आहे. अशावेळी प्रवाशांनीही योग्य काळजी घेऊन काटोल बसस्टॉपच्या प्रगतीचे कार्य होईपर्यंत बसचालक-वाहकांना सहकार्य करून नको असलेली गर्दी टाळली पाहिजे.

**संचिता वानखेडे**

# ‘कलम ३७०’ला समर्थन म्हणजेच संविधानाला संपवण्याचा कट!

**काँग्रेससह ‘इंडी’ आघाडीमधील विरोधी पक्ष आपल्याच वचन आणि कृतींनी कसे जनतेसमोर उघडे पडतात, त्याचे आणखीन एक उदाहरण नुकतेच जम्मू-काश्मीर विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनात दिसून आले. ‘कलम ३७०’ची काश्मीरमध्ये पुनर्स्थापना करण्याबाबतचा प्रस्ताव भाजपच्या विरोधानंतरही विधानसभेत पारित करण्यात आला. त्यामुळे ‘कलम ३७०’ला समर्थन म्हणजेच संविधानाला संपवण्याचा कट असल्याचे स्पष्ट व्हावे.**

**प्रासंगिक**
**पंकज जयस्वाल**

लोकसभा निवडणुकीनंतर आता विधानसभा निवडणुकांच्या रणधुमाळीतही काँग्रेसचे खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी ‘संविधान धोक्यात आहे,’ असा अपप्रचार अजूनही करताना दिसतात. जणू हेच संविधानाचे खरे रक्षक. पण, सत्य परिस्थिती जनतेला आता समजली आहे. आणीबाणीपासून ते वेळोवेळी संविधान बदलणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विरोधात जाऊन कायदे आणणे, अशा अनेक गोष्टी काँग्रेस शासनाच्या काळात घडल्या, हा आजवरचा इतिहास!

काँग्रेसच्या संविधानविरोधाची नुकतीच पुन:प्रचिती आली. यानिमित्ताने संविधान आणि आरक्षण कोणाला वाचवायचे आहे आणि कोणाला घालवायचे आहे, हे दि. ६ नोव्हेंबर रोजी जम्मू-काश्मीर विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनातच स्पष्ट झाले. विधानसभेत ‘कलम ३७०’ पुन्हा आणण्याची मागणी करणारा प्रस्ताव भाजपच्या विरोधानंतरही सत्ताधाऱ्यांकडून पारित करण्यात आला आणि त्याचे काँग्रेसनेही समर्थन केले. मग आपणच विचार करावा, संविधानविरोधी कोण?

**‘कलम ३७०’ संविधान आणि आरक्षणविरोधी कसे होते?**

‘कलम ३७०’मुळे जम्मू-काश्मीरमध्ये लोक विशेषत: अनुसूचित जाती-जमाती आणि महिलांना वाईट वागणूक दिली गेली आणि संविधानाने दिलेला आरक्षणाचा हक्क आणि सोयी-सवलती काढून टाकल्या. तेथील स्वच्छता कामगारांच्या समुदायाला ‘वाटल’ म्हणजेच खालच्या दर्ज्यांची काम करणाऱ्या लोकांना, अशा अपमानास्पद शब्दांचा सामना करावा लागला.


सोप्या भाषेत सांगायचे, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान १९५४ साली काँग्रेसशासित नेहरू सरकारच्या सांगण्यावरून राष्ट्रपतींनी जम्मू-काश्मीरसाठी पूर्णपणे शिथिल करून टाकले. एकप्रकारे भारतीय संविधानाचा अपमान करून पाकिस्तानी हस्तक्षेपाला परवानगी दिली गेली. तिथे संविधान कमकुवत केल्यामुळे सर्वांत मोठा फटका बसला तो अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी आणि महिलांना. आजवर जम्मू-काश्मीरमध्ये ४२ हजार लोक मारले गेले आहेत. कारण, ‘कलम ३७०’मुळे फुटीरतावादाला चालना मिळाली आणि त्यामुळेच तेथे दहशतवाद निर्माण झाला.

**‘कलम ३७०’ रद्द केल्यामुळे काय बदल झाला?**

सर्वात महत्त्वाचे म्हणजे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान पूर्णपणे जम्मू आणि काश्मीरमध्ये लागू झाले. सर्वांना भारतीय म्हणून इतर राज्यांमध्ये जे अधिकार आहेत ते प्राप्त झाले. वंचित जातींना त्यांचा सन्मान मिळाला. आरक्षणाचा अधिकार, निवडणुकीत उभे राहण्याचा अधिकार, बोलण्याचा अधिकार असे अनेक अधिकार मिळाले.

मोदी सरकारने ‘कलम ३७०’ रद्द केल्यामुळे १९९३ सालच्या सफाई कर्मचारी कायद्यासह घटनेतील सर्व तरतुदी राज्यात लागू करण्याची परवानगी दिली. गेल्या चार वर्षांत जम्मू-काश्मीरमधील ओबीसी समुदायाची ओळख पहिल्यांदाच झाली आहे. उपेक्षित समुदायासाठी हा एक मोठा विजय आहे. कारण, ते त्यांच्या घटनात्मक अधिकारांचा उपयोग करू लागले. ‘कलम ३७०’ रद्दबातल केल्यामुळे उर्वरित देशातील अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठीची तरतूद आता जम्मू आणि काश्मीरमधील समुदायासाठी उपलब्ध आहे. वन हक्क कायदा, अत्याचार प्रतिबंधक कायदा आणि जम्मू-कश्मीरमधील वाल्मिकी समुदायासाठी अधिवास हक्कदेखील ‘कलम ३७०’ रद्द केल्यानंतरच लागू केले गेले. पंतप्रधान मोदींनी जम्मू-काश्मीरच्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी आरक्षणासाठी विधेयक मंजूर केले. जम्मू-काश्मीरच्या इतिहासात प्रथमच अनुसूचित जमातीसाठी नऊ जागा राखीव ठेवण्यात आल्या असून, अनुसूचित जातींसाठीही जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

उपेक्षित समुदायांवर सकारात्मक प्रभावाव्यतिरिक्त, या प्रदेशात महिलांच्या समानतेची प्रगती पाहणे आनंददायी आहे. पूर्वी जर जम्मू आणि काश्मीरमधील एखाद्या महिलेने राज्याबाहेरील पुरुषाशी लग्न केले, तर तिला जम्मू आणि काश्मीरमध्ये मालमत्ता खरेदी करण्याचा अधिकार नव्हता. या भेदभावपूर्ण प्रथेमुळे महिलांचे हक्क आणि त्यांचे जीवन साथीदार निवडण्याचे स्वातंत्र्य मर्यादित होते.



फुटीरतावादी नेत्यांची मुले श्रीमंती आणि ऐश्वर्यामध्ये राहत असताना इतरांनी संघर्षाचे कठोर परिणाम सहन केले. ‘कलम ३७०’ रद्द केल्याने या ‘इतरांना’ संरक्षण मिळाले. सन २०१६ ते २०१९ दरम्यान, राज्यात दगडफेकीच्या तब्बल ५ हजार, ५० घटनांची नोंद झाली. जी कलम रद्द केल्यानंतर केवळ ४४५ इतकी कमी झाली. आश्चर्यकारकपणे ९२ टक्के घट झाली. ऑगस्ट २०१६ आणि ऑगस्ट २०१९ दरम्यान, निषेध आणि दगडफेकीच्या घटनांमध्ये १२४ निष्पाप जीव गमावले गेले आणि त्यानंतरच्या चार वर्षांत ‘कलम ३७०’ रद्द केल्यानंतर अशा मृत्यूची कोणतीही नोंद नाही. शिवाय, ‘कलम ३७०’ नंतरच्या काळात कायदा आणि सुव्यवस्थेच्या परिस्थितीत नागरिकांच्या मृत्यूची घटना विस्मयकारक शून्यावर घसरली. याचाच अर्थ प्रदेशात पसरलेल्या शांततेची जबरदस्त भावना कोणीही नाकारू शकत नाही.

**‘कलम ३७०’ पुन्हा बहाल होणे शक्य नाही**

भारतीय राज्यघटनेच्या ‘कलम ३७०’ अन्वये जम्मू आणि काश्मीरचा विशेष दर्जा रद्द करण्यासोबतच ‘कलम ३५ ए’ अंतर्गत ‘राज्य विषय’ तरतूद संपुष्टात आणण्याला भारतीय संसदेच्या दोन्ही सभागृहांनी २०१९ साली मंजुरी दिली.

सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारच्या आणि संसदेच्या निर्णयाला कायम ठेवले. कारण, हा निर्णय भारताच्या राष्ट्रीय हिताशी सुसंगत आहे, असे त्यांनी नमूद केले. त्यानंतर ‘कलम ३७०’ पुनर्स्थापित करण्याचे वचन जम्मू आणि काश्मीरमधील अनेक राजकीय पक्षांसाठी एक महत्त्वाची निवडणूक घोषणा बनली आहे. काँग्रेस आणि मित्रपक्षांना माहीत आहे की, जम्मू-काश्मीर विधानसभेत ठराव पारित करून काही उपयोग नाही. कारण, तो अधिकार संविधानाप्रमाणे फक्त संसदेला आहे आणि तेही तेव्हाच शक्य होईल, जेव्हा दोन तृतीयांश खासदार या प्रस्तावाच्या समर्थनार्थ मतदान करतील. ‘इंडी’ आघाडीची अवस्था बघता, ते कधीच शक्य नाही. पण, यातून सर्व भारतीयांना समजले की, कोण संविधानाविरुद्ध आहे.

‘कलम ३७०’ पुन्हा काश्मीरला बहाल करणे, हा केवळ राजकीय इच्छाशक्तीचा प्रश्न नाही. त्यासाठी महत्त्वाचे घटनात्मक आणि कायदेविषयक अडथळे पार करणे आवश्यक आहे. त्यासाठी कोणत्याही घटनादुरुस्तीसाठी भारतीय संसदेतील दोन तृतीयांश बहुमताचा पाठिंबा आवश्यक असेल - हे आव्हान कमी करता येणार नाही. सध्या, भारतातील कोणत्याही एका राजकीय पक्षाकडे किंवा कोणत्याही प्रादेशिक युतीकडे असे बहुमत मिळवण्यासाठी आवश्यक असलेली संख्या नाही. भविष्यात एखादा पक्ष किंवा विरोधी पक्षांच्या गठबंधनाने (जसे की ‘इंडी’ आघाडी) केंद्र सरकार स्थापन केले तरीही, या गटांच्या भिन्न हितसंबंधांचे संरेखन करणे कठीण होईल. ‘इंडी’ आघाडीत अनेक पक्षांची राजकीय उद्दिष्टे आणि विचारधारा भिन्न आहेत. ज्यामुळे ‘कलम ३७०’ आणि ‘कलम ३५ए’ पुनर्स्थापित करण्यावर एकमत निर्माण करणे जवळजवळ अशक्य आहे.

खरं तर विरोधी पक्षांनाही ‘कलम ३७०’ पुन्हा आणण्याच्या प्रक्रियेतील घटनात्मक आणि कायदेविषयक अडथळे माहीत आहेत. तरीही, या कलमाची पुनर्स्थापना एक व्यवहार्य निवडणूक आश्वासन म्हणून सादर करणे सुरूच ठेवून ते जम्मू आणि काश्मीरमधील मतदारांची अशी दिशाभूल करत आहेत की, नजीकच्या भविष्यात हे बदल जणू सहज शक्य होतील. दुर्दैवाने, अशी आश्वासने फक्त पोकळ आश्वासनेच राहतील. कधीतरी हे पक्ष आपला राजकीय स्वार्थ सोडून मानवता आणि ‘राष्ट्र प्रथम’ ही भावना ठेवतील का? लोकांना भ्रमित करण्यापेक्षा जो तेथील लोकांना फायदा होतोय, त्यासाठी तरी केंद्र सरकारचा कितीही द्वेष असला तरी समर्थन करतील का? हे प्रश्न प्रत्येक भारतीयांच्या मनात आहे. एकंदरीत असेच दिसून येते की, काँग्रेसकडून काहीही अपेक्षा ठेवणे चुकीचेच.

मग, आपण सर्वांनीच विचार करावा. काँग्रेस आणि काँग्रेससोबत असणारे पक्ष जसे शरद पवार गट, उद्धव ठाकरे गट, हे संविधानाचे रक्षक आहेत की मारेकरी? कोणाला संविधान नकोय, ही जम्मू-काश्मीरमधील विधानसभेत झालेली घटना स्पष्टपणे सर्व भारतीयांचे डोळे उघडण्यासाठी पर्याप्त आहे. मतदान करताना आपण सगळ्यांनीच हे नक्कीच लक्षात ठेवले अशी आशा करतो.

# हिंदू एकतेचे स्वप्न साकारणारे तीन शब्द!

**आपसातील फाटाफुटीमुळे आणि विरोधकांच्या दिशाभूल करणाऱ्या फसव्या दाव्यांना बळी पडल्यामुळे नरेंद्र मोदी यांना बहुमतापासून वंचित राहावे लागले, याची बोच हिंदू मतदारांच्या मनात सलत होती. तिचे अंशत: परिमार्जन हरियाणात भाजपला पूर्ण बहुमत देऊन केले गेले. त्यात ‘बटेंगे तो कटेंगे’ या घोषणेचा महत्त्वाचा वाटा होता. आता महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये त्याचीच पुनरावृत्ती होत असल्याचे चित्र स्पष्ट दिसत असल्याने विरोधी पक्षांचे धाबे दणाणले आहे. परंतु, हा नारा केवळ निवडणुकीपुरता मर्यादित राहणार नाही.**



**हिंदूत्व**
**राहुल बोरगांवकर**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला पुढील वर्षी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. गेल्या शतकभरात जे स्वप्न संघाने पाहिले, ते आता प्रत्यक्षात उतरण्याचे संकेत मिळत आहेत. ही संघासाठी समाधानाची बाब म्हणावी लागेल. हे स्वप्न होते समस्त हिंदू समाजाच्या एकजुटीचे. गेली अनेक दशके अथक प्रयत्न करूनही जी गोष्ट कोणत्याही हिंदुत्ववादी संघटनेला जमली नव्हती, ती आता प्रत्यक्षात उतरण्याची चिन्हे दिसत आहेत. भारतात हिंदू समाज राजकीयदृष्ट्या एकवटत चालला आहे. त्याला कारण ठरल्या बांगलादेशातील घटना. तेथील पंतप्रधान शेख हसीना वाजेद यांच्याविरोधात सुरू झालेल्या आंदोलनाला जागतिक कट्टरवादी इकोसिस्टिमने मदत केली आणि शेख हसीना यांना आपला जीव वाचविण्यासाठी भारताचा आश्रय घ्यावा लागला. पण, त्या परागंदा झाल्यावर या आंदोलनाने थेट हिंदूविरोधी स्वरूप घेतले आणि तेथे हिंदूंचा नरसंहार सुरू झाला. मुळातच लोकसंख्येने नगण्य असलेल्या हिंदूंना चिरडून टाकणे तेथील कट्टरवाद्यांसाठी मुळीच अवघड नव्हते. पण, त्याचे पडसाद भारतात ज्या तऱ्हेने उमटले, त्याची कल्पना भारतातील हिंदुत्ववादी नेत्यांनीही केली नव्हती.

बांगलादेशात या घटना घडत होत्या, तेव्हा भारतात लोकसभा निवडणुका पार पडल्या होत्या. केंद्रात जरी पुन्हा एकदा एनडीएची सत्ता आली होती, तरी भाजपला बहुमतापासून वंचित राहावे लागले. याचे कारण देशातील मुस्लीम मतदारांनी केलेले भाजपविरोधी धोरणात्मक मतदान. त्या घटनेने एकच संदेश दिला गेला की, हिंदू आपसातील मतभेद विसरून एक झाले नाहीत, तर देशात मुस्लीमधार्जिणी राजवट राज्यांमध्येही येऊ शकते. ही गोष्ट देशातील हिंदूंच्या मनावर खोलवर रुजली आणि त्याचा परिणाम पुढील विधानसभा निवडणुकीत पाहायला मिळाला. हरियाणात काँग्रेसने सत्ताधारी भाजपविरोधात सोशल मीडियात इतकी हवा निर्माण केली होती की, हरियाणात काँग्रेसची सत्ता आल्यातच जमा होती, असा समज देशात निर्माण झाला.

पण, लागलेले निकाल पाहून सर्वांनाच धक्का बसला. भाजपने सलग तिसऱ्यांदा हरियाणात विजय मिळविला होता. इतकेच नव्हे, तर प्रथमच त्या पक्षाला स्वबळावर बहुमतही मिळाले होते. यामागे निवडणुकीच्या अखेरच्या टप्प्यांत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आणि रा. स्व. संघाने केलेल्या प्रचाराचा मोठा वाटा होता. लोकसभा निवडणुकीनंतर केवळ पाच महिन्यांतच देशातील जनमत फिरले आणि काँग्रेसच्या शिडात भरलेली हवा फुस्सकन निघून गेली. याच निवडणुकीत योगी आदित्यनाथ यांनी ‘बटेंगे तो कटेंगे’ असा नारा दिला आणि त्यासाठी बांगलादेशाचे उदाहरण दिले. पण, हा नारा केवळ हरियाणापुरता मर्यादित राहिला नाही आणि आता महाराष्ट्र व झारखंड विधानसभा निवडणुकीत ही घोषणा हाच प्रमुख मुद्दा बनला आहे.

‘बटेंगे तो कटेंगे’ या केवळ तीन शब्दांनी हिंदूंना एकत्र आणले आहे. त्याचे दृष्य परिणाम पाहून विरोधी पक्षांच्या पायाखालची जमीनच सरकली आहे. कारण धर्म, भाषा, जात, प्रांत वगैरे मुद्द्यांवरून हिंदूंमध्ये फूट पाडून मुस्लीम मतदारांच्या एकगठ्ठा मतदानाद्वारे सत्ता मिळविण्याचा सोपा मार्ग काँग्रेस आणि अन्य हिंदूविरोधी पक्ष आजवर अवलंबित आले आहेत. हिंदू मतदारांमधील उदासीनता आणि जागृतीचा अभाव यामुळे त्यांचा हा डाव यशस्वी होत असे. पण, बांगलादेशातील घटनांनी आणि देशातही घडत असलेल्या घटनांमुळे हिंदू सावध झाला. लोकसभेत आपल्यातील फाटाफुटीमुळे मोदी यांना बहुमतापासून वंचित राहावे लागले, याची बोच देशातील हिंदू मतदारांमध्ये सलत होती. तिचे अंशत: परिमार्जन करण्याची संधी हरियाणा विधानसभेच्या निवडणुकांनी दिली. हिंदूंनी त्याचा पुरेपूर वापर करीत भाजपला पूर्ण बहुमत देऊन सलग तिसऱ्यांदा सत्तेवर आणले.

बांगलादेशातील घटनांनी योगींना हिंदूंमध्ये एकता आणण्यास अचूक कारण मिळाले आणि त्याचा त्यांनी पुरेपूर लाभ उठविला. आपसातील हेवेदाव्यांमुळे जेव्हा जेव्हा हिंदू एकमेकांशी लढले, तेव्हा तेव्हा भारताचे तुकडे झाले होते आणि देश परकीयांच्या गुलामगिरीत ढकलला गेला होता. या इतिहासाचे भान हिंदूंना आले आहे. बांगलादेशातील घटना या केवळ निमित्त ठरल्या. देशातील काँग्रेस, समाजवादी पार्टी, तृणमूल काँग्रेस वगैरे हिंदूविरोधी पक्षांची धोरणे आणि त्यांच्या ‘इंडी’ आघाडीतील पक्षांच्या नेत्यांकडून सनातन धर्मावर उघडपणे केली जाणारी अश्लाघ्य टीका हेही हिंदूंमध्ये जागृती निर्माण होण्याचे प्रमुख कारण ठरले. अमेरिकेचा नवा अध्यक्ष बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचारांचा निषेध करतो.

पण, भारतातील विरोधी पक्षांतील नेत्यांकडून या घटनांवर पूर्ण मौन बाळगले जाते. हेच विरोधी नेते पॅलेस्टाईनमधील मुस्लिमांच्या मृत्यूवर आपली छाती पिटतात. पण, बांगलादेशातील हिंदूंच्या हत्याकांडाविरोधात विरोधाचा हुंकारही काढीत नाहीत. हे दिसून आल्यावर हिंदूंमधील संताप उफाळून आल्यास नवल नव्हते. योगी आदित्यनाथ यांनी हिंदूंमधील ही भावना नेमकी पकडली आणि ‘बटेंगे तो कटेंगे’ हा नारा दिला. या नाऱ्याने जादूची कांडी फिरावी, तसा चमत्कार केला. लोकसभा निवडणुकीतील मुस्लिमांच्या धोरणात्मक मतदानाने हिंदूंना धोक्याचा इशारा मिळालाच होता. त्यातच ‘वक्फ बोर्डा’च्या बेलगाम दाव्यांनी हिंदू समाजात अन्यायग्रस्ततेची भावना निर्माण झाली आहे.

राजकीय घोषणांचे आयुष्य हे तात्पुरते असते. पण, जेव्हा एखादी घोषणा आपल्या अस्तित्वाशीच निगडित आहे, असे समाजाला वाटते, ती केवळ राजकीय प्रचाराचा भाग राहात नाही. जनता स्वत:च तिचा स्वीकार करते. ‘बटेंगे तो कटेंगे’ ही घोषणा हिंदूंमधील असुरक्षिततेची भावना दर्शविणारी असून, त्यावर मात करण्यासाठीच हिंदू समाज एकत्र येत आहे. त्याचा पहिला दृश्य परिणाम चालू निवडणुकीतील मतदानातून दिसून येईल. विष्णूच्या वामन अवताराने केवळ तीन पावलांत अहंकारी राजा बळीला पाताळात गाडले होते. आता ‘बटेंगे तो कटेंगे’ या केवळ तीन शब्दांनी हिंदूंना आपले मतभेद मिटवून एकत्र आणण्याचे काम केले आहे.


**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 11- Raver | Amol Hari Jawale | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

**Name of constituency : 11-Raver**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 09 -Shirpur (S.T.) | Kashiram Vechan Pawara | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

**Name of constituency : 09 -Shirpur (S.T.)**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 03- Nandurbar (S.T.) | Vijaykumar Krishnarao Gavit | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

**Name of constituency : 03 -Nandurbar (S.T.)**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**



# विधानसभा निवडणूक विशेष



## थोडक्यात महत्त्वाचे...



### खान्देश केटरिंगचा आमदार भोळेंना पाठिंबा

**जळगाव** : येथील खान्देश केटरिंग असोसिएशनतर्फे जळगाव शहर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार सुरेश ऊर्फ राजूमामा भोळे यांना जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे. त्याबाबतचे पत्र असोसिएशनतर्फे आमदार भोळे यांना देण्यात आले. निवडणुकीसाठी आम्ही तुम्हाला खूप शुभेच्छा देत आहोत, तसेच जळगाव शहरातील सर्व केटरिंग व्यावसायिक हे तुम्हाला जाहीर पाठिंबा देत आहेत, असे पत्रात नमूद केले आहे. असोसिएशनचे अध्यक्ष सत्यनारायण जोशी व सचिव रतन सारस्वत यांच्या पत्रावर सह्या आहेत.



### जळगावात घरोघरी मतदार माहितीपत्रकाचे वाटप

**जळगाव** : जळगाव शहर विधानसभा मतदारसंघांतर्गत निवडणूक कर्तव्यावर नियुक्त बीएलओ आणि स्वतः उपविभागीय दंडाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी विनय गोसावी यांनी घरोघरी जाऊन मतदारांना मतदार माहिती पत्रकाचे वाटप केले. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ जाहीर झाली आहे. त्यानुसार राज्यासह जिल्ह्यातील ११ मतदारसंघांतर्गत २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. बुधवारअखेर जिल्ह्यातील विविध मतदारसंघांत ज्येष्ठ तसेच दिव्यांग मतदार जे मतदान केंद्रापर्यंत पोहोचू शकणार नाहीत, अशा मतदारांसाठी गृहमतदान प्रक्रिया पार पडली. गुरुवारी (१४ नोव्हेंबर) जळगाव शहर मतदारसंघांतर्गत विविध वॉर्ड- प्रभागातील तसेच कॉलनी वसाहत परिसरात मतदारांना माहितीपत्रकाचे वितरण करण्यात आले. यात हरिविठ्ठलनगर, गणेशनगर, जिल्हापेठ, मनीषा कॉलनी, गणपतीनगर आदी परिसरात मतदार माहितीपत्रकाचे बीएलओंमार्फत वितरण करण्यात आले असल्याचे उपविभागीय दंडाधिकारी तथा जळगाव शहर विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी विनय गोसावी यांनी म्हटले आहे.

### मतदानामुळे आठवडे बाजार दिवसात बदल

**धुळे** : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जिल्ह्यातील साक्री, धुळे ग्रामीण, धुळे शहर, शिंदखेडा, शिरपूर मतदारसंघांमध्ये बुधवार, २० नोव्हेंबर, रोजी मतदान प्रकिया पार पडणार आहे. विधानसभा निवडणूक शांतता, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टिकोनातून मतदानाच्या दिवशी आठवडे बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी दिले आहेत. धुळे जिल्ह्यात साक्री विधानसभा मतदार संघातील बेहेड, ब्राह्मणवेल, धुळे ग्रामीण व धुळे शहर मतदारसंघातील गोताणे, बोरकुंड, रतनपुरा, लळिंग, धामणगाव, कुसुंबे, चौगाव, तिखी तर शिरपूर मतदारसंघातील मांजरोद, दहिवद, पनाखेड या गावांमध्ये बुधवार, २० नोव्हेंबर, २०२४ रोजी भरणारे आठवडे बाजार बंद ठेवण्यात येऊन ते अन्य सोईच्या दिवशी भरविण्यात यावेत, असे जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी पापळकर यांनी दिलेल्या आदेशात नमूद केले आहे.

# बाळासाहेबांच्या पुण्याईने, जनतेच्या आशीर्वादाने विधान भवनात चौथ्यांदा प्रवेश करणारच

## मंत्री गुलाबराव पाटील यांना विश्वास; ममुराबाद, मोहाडी, दोनगाव, आव्हाणीतून उत्स्फूर्त पाठबळ

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १४ नोव्हेंबर**

''होय, हा सामान्य टपरीवालाच बाळासाहेबांच्या पुण्याईने आणि जनतेच्या आशीर्वादाने विधान भवनात चौथ्यांदा प्रवेश करणार आहे. आपण गावोगावी रस्ते, मूलभूत सुविधा देत, पूल बांधले आणि गावे जोडण्याचे काम करून जनतेच्या सुखदु:खात जाऊन माणसे जोडण्याचे काम केले आहे, असे जळगाव ग्रामीण मतदारसंघातील शिवसेना व महायुतीचे उमेदवार मंत्री गुलाबराव पाटील यांनी माध्यमांशी संवादात संजय राऊत यांच्या टीकेला प्रत्युत्तर दिले.

सध्या विधानसभा निवडणूक शेवटच्या टप्प्यावर येऊन ठेपली आहे. सगळीकडे आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. जळगाव ग्रामीण मतदारसंघातील ममुराबाद, मोहाडी, दोनगाव, आव्हाणी, फुलपाट, धानोरा, टाकळी या भागात शिवसेनेचे नेते व महायुतीचे उमेदवार मंत्री गुलाबराव पाटील यांच्या प्रचारफेऱ्यांत सळसळता जल्लोष पाहायला मिळाला. ममुराबाद येथे खंडेराव महाराज मंदिरासाठी तीन कोटींच्या निधीतून सुधारणा, या भागातील विविध गावांत रस्ते, पूल, स्मशानभूमी, ट्रान्स्फॉर्मर, शेतरस्ते, नवी ग्रामपंचायत भवन उभारणी, लेंडी नाला, पिंप्राळा रोड, कानळदा रस्ता व लवकी नाल्यावर चार पूल, मुस्लीम वस्तीत कब्रस्तानला संरक्षक भिंत, शादीखाना, ऊर्दू शाळेपर्यंतचा रस्ता, बौद्धविहार गावांतर्गत सोयी-सुविधा, कंपाउंडसह आधुनिक स्मशानभूमी, दोनगावपासून शेरी, कानळदा, पथराड, खेडी हे शिव व शेतीचे रस्ते दर्जोन्नत करून डांबरीकरण, अशा विविध सुविधा केल्याबद्दल ग्रामस्थांनी व शेतकऱ्यांनी मंत्री गुलाबराव पाटील यांचे रांगोळ्या काढून, फटाक्यांच्या आतषबाजीत व पुष्पवृष्टी करून उत्साहात स्वागत केले.





मोहाडी येथे घोड्यावरून, ममुराबादमध्ये खुल्या जीपमधून आणि इतर भागात पायी फेरी काढून मंत्री गुलाबराव पाटील यांनी आपला प्रचार केला. विविध समाजांनी पाठिंबा देत मंत्री गुलाबराव पाटील यांना सन्मानित केले, तर ममुराबाद येथील शेतकऱ्यांनी आपल्या पाठीशी ठामपणे उभे आहोत, असे आश्वस्त केले.

**यांची होती उपस्थिती**

जिल्हाप्रमुख नीलेश पाटील, संजय पाटील, डी. ओ. पाटील, शिवराज पाटील, पवन सोनवणे, जनाआप्पा कोळी, अनिल भोळे, तुषार महाजन, ममुराबाद येथील महेश चौधरी, सरपंच हेमंत चौधरी, शैलेंद्र पाटील, भरत शिंदे, अमर पाटील, राहुल ढाके, संतोष कोळी, निखिल पाटील, सचिन पाटील, विकास शिंदे, विलास सोनवणे, नासीर पटेल, अनिस पटेल, एजाज पटेल, मोहाडी येथील सरपंच डंपी सोनवणे, भगवान पाटील, योगेश बाविस्कर, राहुल पाटील, भरत सोनवणे, निंबा गवळी, किरण गवळी, वाल्मीक गवळी, राजू गवळी, युवराज निरखे, धानोरा येथील भूषण पाटील, गणेश पाटील, नाना पाटील, दोनगाव बुद्रूक व खुर्द येथील किशोर पाटील, सरपंच भागवत पाटील, अमोल पाटील, राहुल पाटील, वासुदेव पाटील, सुभाष पाटील, ज्योती शिवदे, पुष्पा पाटील, आव्हाणी येथील सदाशिव पाटील, सचिन पाटील, तुषार पाटील, फुलपाट येथील हरिभाऊ पाटील, भीमसिंग पाटील, किरण पाटील, टहाकळी येथील जितू चव्हाण, मधुकर पाटील, सुनील पाटील यांच्यासह त्या-त्या गावातील ग्रामस्थ, महिला, युवक उपस्थित होते.

### आजचा प्रचारदौरा

१५ नोव्हेंबर : चांदसर : स. ८.३० वा., कवठळ : स. ९ वा., चोरगाव : स. ९.३० वा., धार : स. १०.३० वा., शेरी : स. ११ वा., पथराड बुद्रूक : स. ११.३० वा., पथराड खुर्द : दु. १२.३० वा., बांभोरी प्र. चा. : दु. ४ वा. शिवसेनेचे नेते गुलाबराव पाटील यांची जाहीर सभा भोकर - संध्या. ६ वा. तसेच कानळदा : रात्री ८ वा.



# आमदार कादरींनी डॉ. बाबासाहेबांविषयीच्या विधानाबाबत काँग्रेस नेत्यांनी माफी मागावी

## भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे लालसिंह आरिया यांची मागणी

**जळगाव** : कर्नाटकातील काँग्रेसचे आमदार आजमपीर कादरी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दबावात बौद्ध धर्म स्वीकारला असून, ते मुस्लीम धर्म स्वीकारणार होते, असे वादग्रस्त वक्तव्य केले आहे. त्यांच्या या विधानाबाबत काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, राहुल गांधी, महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी जाहीर माफी मागावी, अशी मागणी भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष लालसिंह आरीया यांनी केली.

शहरातील भाजपच्या वसंतस्मृती या जिल्हा कार्यालयात गुरुवारी (१४ नोव्हेंबर) पत्रकार परिषदेत ते बोलत होते. लालसिंह आरिया म्हणाले की, काँग्रेस खोट्याची फॅक्टरी आहे. काँग्रेसमधील काही मंडळी पापे लपविण्यासाठी असे मुद्दे पुढे करीत आहे. सय्यद कादरी यांनी केलेले वक्तव्य म्हणजे बौध्द धर्मासह डॉ. बाबासाहेबांचा अपमान केला आहे. काँग्रेस समाजात विष पेरण्याचे काम करीत असल्याचा आरोप त्यांनी या वेळी केला. बौद्ध अनुयायांचा अपमान सहन केला जाणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेला भाजप जिल्हा महानगराध्यक्षा उज्ज्वला बेंडाळे, अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश महामंत्री दिनेश पगारिया, आरपीआयचे महानगराध्यक्ष अनिल अडकमोल, भाजप जिल्हा सरचिटणीस ज्योती निंभोरे, अनुसूचित जाती जिल्हा महानगराध्यक्ष लता बाविस्कर, जिल्हा सरचिटणीस महेश जोशी, माध्यम प्रसिद्धीप्रमुख मनोज भांडारकर, मंगेश जुनागडे, सोशल मीडिया जिल्हा संयोजक धीरज वर्मा उपस्थित होते.

# वाढदिवस साधेपणाने साजरा करणार, प्रचार कार्यालयात शुभेच्छा स्वीकारणार : अमोल शिंदे

## फुले, बुके, भेटवस्तू न आणण्याचे आवाहन; मतदानरूपी प्रेम हीच जनतेची शुभेच्छा

**तभा वृत्तसेवा**
**पाचोरा, १४ नोव्हेंबर**

पाचोरा-भडगाव मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार अमोल पंडितराव शिंदे यांचा शुक्रवारी (१५ नोव्हेंबर) वाढदिवस साजरा होत आहे. आचारसंहितेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन होण्यासाठी आपला वाढदिवस साधेपणाने साजरा करणार असल्याचे अमोल शिंदे यांनी गुरुवारी (१४ नोव्हेंबर) आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.

अमोल शिंदे यांनी सांगितले की, शुक्रवारी (१५ नोव्हेंबर) सकाळी आठपासून सायंकाळी सहापर्यंत पाचोरा शहरातील रिलायन्स पेट्रोल पंपाशेजारील निवडणूक प्रचार कार्यालयात जनतेच्या शुभेच्छा स्वीकारणार आहे. आपल्या वाढदिवसाला कोणीही फुले, बुके, भेटवस्तू आणू नये, मतदानाच्या रूपातून भरभरून मिळणारे प्रेम हीच माझ्यासाठी जनतेची शुभेच्छा असेल, अशी भावनिक साद अमोल शिंदे यांनी जनतेला घातली.

### वाढदिवसानिमित्त वचननामा जाहीर करणार

वचननामा जाहीर करण्यासाठी जनतेकडूनच काही समस्या व मागण्यांची मागणी अमोल शिंदे यांनी समाजमाध्यमांद्वारे केली होती. हजारो जनतेने आपली मते व समस्या पाठविल्या आहेत. त्या सर्व मागण्यांच्या आधारावर आपला वचननामा वाढदिवसाच्या निमित्ताने जाहीर करणार असल्याचेही अमोल शिंदे यांनी स्पष्ट केले.



महाराष्ट्रात निवडणुकीची रणधुमाळी जोरात आहे आणि पाचोरा- भडगाव मतदारसंघाकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. अशा परिस्थितीत माझा वाढदिवस साजरा होणे हा एक दुग्धशर्करा योग आहे, असे मतही अमोल शिंदे यांनी व्यक्त केले.

# आमदार चव्हाणांच्या प्रचारात सर्वच घटक सक्रिय

## चाळीसगाव मतदारसंघ महायुतीमय; केंद्रीय गृहमंत्री शहांच्या सभेचीच चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**चाळीसगाव, १४ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा अखेरचा टप्पा सुरू असून, शहरासह तालुक्यात भाजप- महायुती- मित्रपक्षांचे उमेदवार आमदार मंगेश चव्हाण यांच्या प्रचाराचा झंझावात अखेरच्या टप्प्यात अधिक जोरदार झाला आहे. प्रचारफेऱ्यांसह कॉर्नर सभा, सामाजिक मेळाव्यांना प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे. सर्वसामान्यांसह शेतकरी, व्यापारी, उद्योजक, महिला, तरुणाई व ज्येष्ठ नागरिक आमदार चव्हाण यांच्या प्रचारात सक्रिय झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

महायुतीचे उमेदवार आमदार मंगेश चव्हाण यांच्या विजयाची चर्चा आता शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात चावडीवर रंगत आहे. तालुक्यात केंद्रीय गृहमंत्री तथा सहकारमंत्री अमित शहा यांच्या बुधवारी १३ नोव्हेंबर झालेल्या विजयी संकल्प सभेची सकारात्मक साद पोहोचली आहे. शहरासह तालुक्यात आमदार चव्हाण व त्यांच्या पत्नी, शिवनेरी फाऊंडेशनच्या अध्यक्षा प्रतिभा चव्हाण यांची प्रचाराची पहिली फेरी पूर्ण झाली आहे. काही भागांत दोन फेऱ्याही झाल्या आहेत.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या विजयी संकल्प सभेचीही चर्चा व देशासमोरील राष्ट्रीय मुद्दे, गेल्या १० वर्षांत झालेली कामे आणि विविध केंद्रीय योजनांमुळे देशातील जनतेला झालेला लाभ, राज्यातील महायुती सरकारकडून फक्त अडीच वर्षांत झालेली कामे, असा पट केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी जनतेसमोर ठेवला. विकास आणि प्रखर राष्ट्रवाद हे त्यांच्या सभेतील मुद्दे चर्चिले जात आहेत. दुसरीकडे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचीही चाळीसगावला सभा झाली. मात्र, त्यांनी सभेत उमेदवाराचे नावही पुकारलेले किंवा त्यांना मतदान करा की निवडून द्या, असे सांगितले नाही. त्यामुळे त्यांच्या सभेचीही आता उलटसुलट चर्चा सुरू आहे.

उद्धव ठाकरेंनी कोणत्याही स्थानिक प्रश्नाला स्पर्श केला नाही, उलट अमित शहा यांनी पाटणादेवी, के. के. मूस व श्रीक्षेत्र पद्मालय येथील गणपती मंदिराचा उल्लेख करीत स्थानिक प्रश्नांचाही भाषणात उल्लेख केला, तसेच विकासाच्या मुद्द्यावर स्थानिक प्रश्नांनाही भाषणात जोड दिली.

### आता निवडणूकच जनतेच्या हाती

चाळीसगाव मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार मंगेश चव्हाण यांचा प्रचार हजारो कोटींच्या विकासकामांवर होत आहे. त्यामुळे जनतेची सक्रियता प्रचारात अधिक दिसून येत आहे. कार्यकर्त्यांची मोठी फळी गावागावांत व शहरातही सक्रिय झाल्याचे दिसून येत आहे. ही निवडणूक जनतेने हातात घेतली असल्याचे चित्र दिसून येत आहे. सर्वसामान्यांसह शेतकरी, व्यापारी, उद्योजक, महिला, तरुणाई व ज्येष्ठ नागरिक आमदार चव्हाण यांच्या प्रचारात सक्रिय झाल्याचे चित्र दिसून येत आहे.




# मंत्री अनिल पाटलांची प्रचारफेरी प्रतिसादामुळे लक्षवेधी

## अमळनेरकरांकडून पसंती : गोपी कासार, नरेंद्र चौधरींचा मोठे मताधिक्य मिळण्याचा दावा

**अमळनेर** : शहरातील सर्वच प्रभागांत महायुतीचे उमेदवार मंत्री अनिल भाईदास पाटील यांचा प्रचारदौरा प्रतिसादामुळे लक्षवेधी ठरत असून, जिथे तिथे प्रचारफेरीचीच चर्चा होत आहे. भूमिपुत्र व विकासपुरुष म्हणून अमळनेरकरांकडून मंत्री अनिल पाटील यांना पसंती मिळत असल्याची भावना माजी उपनगराध्यक्ष गोपी कासार व माजी नगरसेवक नरेंद्र चौधरी यांनी व्यक्त केली.

प्रचारफेरीप्रसंगी माजी उपनगराध्यक्ष गोपी कासार व माजी नगरसेवक नरेंद्र चौधरी यांनी भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले की, असा एकही प्रभाग नाही, जेथे अनिल पाटील यांच्या फेरीने गर्दीचा उच्चांक गाठला नाही. आम्ही पहिल्या दिवसापासून प्रत्येक प्रभागाच्या प्रचारफेरीत सहभागी असून, प्रत्येक प्रभागात गर्दी वाढत आहे. लोक स्वयंस्फूर्तीने यात सहभागी होऊन समर्थन देत आहेत.



प्रत्येक प्रभागात महिला-भगिनींची औक्षण करण्यासाठी रीघ लागत असून, गल्लोगल्ली फटाक्यांच्या आतषबाजीने स्वागत केले जात आहे. एकंदरीत सारे शहरच अनिल पाटील यांचे समर्थन करीत असल्याचे हे चित्र असून कदाचित संपूर्ण शहरातून रेकॉर्ड ब्रेक मतदान होईल आणि मोठे मताधिक्य त्यांना मिळेल, असेच चित्र आजतरी दिसत आहे.

मंत्री अनिल पाटील यांनी शहर व ग्रामीण भागात केलेली विकासकामे, विशेषकरून बाजारपेठेत झालेले रस्ते, गुंडगिरी कमी झाल्याने व्यापाऱ्यांचा संपलेला त्रास यामुळे अमळनेरकरांत समाधानाची भावना आहे. कोरोना काळात मंत्री अनिल पाटील यांनी जनतेची अहोरात्र केलेली सेवा लोक अजून विसरलेले नसून, अनेक प्रभागात नागरिकांनी याबाबत भावना बोलून दाखविल्या. अनेक भागात झालेला विकास आणि मंजूर झालेली १९७ कोटींची रोज पाणी देणारी योजना यांमुळे महिलांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.



आपल्या मातीचा भूमिपुत्र म्हणूनच नव्हे, तर हे भूमिपुत्र असल्याने आणि त्यांना पुन्हा संधी दिल्यास मंत्रिपद पुन्हा मिळून शहराच्या विकासाचा आलेख अजून वाढणार असल्याने आम्ही सर्व आजी-माजी नगरसेवक एकसंध झालो असून, कोणत्याही परिस्थितीत शहरातून मताधिक्य देण्याचा निर्धार आम्ही केला आहे. जनतेनेदेखील विकासाला साथ म्हणून जात-पात न बघता भूमिपुत्र अनिल पाटील यांना साथ द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. भाजप प्रदेश युवा मोर्चाच्या सचिव भैरवी पाटील उपस्थित होत्या.

# शाश्वत विकास म्हणजे काय हो दादा? दिसणारा की कधी न झालेला?

## चाळीसगाव मतदारसंघातील जनतेत प्रश्नांकित चर्चा

**चाळीसगाव** : सध्या विधानसभा निवडणूक शेवटच्या टप्प्यावर येऊन ठेपली आहे. सगळीकडे आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत आणि या सगळ्यांमध्ये सर्वाधिक चर्चेत आहे तो चाळीसगाव मतदारसंघ. मतदारसंघात महायुती व महाविकास आघाडीतील उमेदवारांतच खरी लढत आहे. निवडणुकीवरच चर्चा रंगत असून, जर चिरकाल टिकणारी शाश्वत कामे नसतील तर मग नेमके कोणत्या कामांना शाश्वत कामे म्हटले पाहिजे? असा प्रश्न आता जनतेत उपस्थित होत असल्याने शाश्वत विकास म्हणजे काय हो दादा? दिसणारा की कधी न झालेला? अशी प्रश्नात्मक चर्चा सुरू आहे.

चाळीसगाव मतदारसंघात पूर्वी भाजपचे माजी आमदार व खासदार राहिलेले आणि आता उमेदवारी नाकारली म्हणून शिवसेना ठाकरे गटात गेलेले उन्मेश पाटील आणि भाजप-महायुतीचे उमेदवार आमदार मंगेश चव्हाण यांच्यात सरळसरळ लढत होत आहे. आमदार चव्हाण यांनी फक्त गेल्या अडीच वर्षांतच जवळपास तीन हजार कोटींच्या निधीतून विकासकामे मतदारसंघात खेचून आणली. त्यातील काही कामे सुरू तर काही कामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत.

### शाश्वत म्हणजे नेमकं काय बरं?

गेल्या अडीच वर्षांत मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलला असून, जिकडे नजर जाईल तिकडे विकासकामे सुरू असल्याचे बघायला मिळत आहे. शहरातील प्रमुख चौकांचे सुशोभीकरण, सर्वदूर काँक्रीट आणि डांबरी रस्त्यांचे जाळे, विभागीय आरटीओ कार्यालय, विविध शासकीय कार्यालये एकाच छताखाली आणून भव्यदिव्य प्रशासकीय इमारत, तसेच गिरणा मन्याड नदीजोड प्रकल्पाला मिळालेली गती, याव्यतिरिक्त इतर मोठी आणि महत्त्वाची कामे तर जनतेच्या दृष्टीला दिसत असून, मग ही कामे जर चिरकाल टिकणारी शाश्वत कामे नसतील, तर मग नेमके कोणत्या कामांना शाश्वत कामे म्हटले पाहिजे, असा प्रश्न आता जनतेतून चर्चिला जात आसून, ज्यांनी फक्त अडीच वर्षांतच हजारो कोटींची विकासकामे आणून कायमचा विकास केला आहे, त्यांची कामे शाश्वत आहेत की ज्यांनी दहा वर्षे सत्तेत असतानाही सांगण्यासारखे आणि लक्षात ठेवण्यासारखे असे कोणतेही काम केल्याचे दिसत नाही, मग आता काय समजायचे, ते समजून जनता कौल कोणाच्या बाजूने देणार, हे पाहणे औत्सुक्याचे आहे.

महायुतीचे उमेदवार आमदार चव्हाण हे निवडणुकीत आश्वासने नव्हे, तर केलेल्या विकासकामांची यादी जनतेसमोर ठेवून पुन्हा निवडून देण्यासाठी मतदान मागताना दिसत आहेत आणि सर्वच समाज, क्षेत्रांतील मतदारांचा त्यांना प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

दोन महिन्यांपूर्वीच लोकसभा उमेदवारी नाकारण्यात आल्याने भाजपमधून बंडखोरी करत शिवसेना ठाकरे गटात गेलेले माजी आमदार-माजी खासदार उन्मेष पाटील हे महाविकास आघाडीचे उमेदवार आहेत. त्यांच्या दहा वर्षांच्या कालावधीत केंद्रात आणि राज्यातही सत्ता होती; परंतु या सत्तेचा फारसा मतदारसंघातील विकासासाठी उपयोग त्यांना फारसा करता आला नसल्याचे समोर आले आहे. उन्मेष पाटील यांनी २०१४ मध्ये मोठमोठी आश्वासने देऊन मतदारांची सहानुभूती मिळवत विजयी झाले होते. त्यापैकी प्रामुख्याने बेलगंगा साखर कारखाना विक्री होऊ देणार नाही, पुन्हा सुरू करणार, कन्नड घाटात बोगदे बनवणार, गिरणा नदीवर बलून बंधारे बांधणार, पाटणा येथे जागतिक दर्जाची गणित नगरी साकारणार अशी अनेक आश्वासने दिली होती; परंतु प्रत्यक्षात पाच नव्हे, तर दहा वर्षे सत्तेत राहूनही ती आश्वासने पूर्ण करू शकले नाहीत. आता पुन्हा विरोधी पक्षासोबत हातमिळवणी करून महायुतीचे उमेदवार मंगेश चव्हाण यांच्याविरोधात विधानसभा लढवत आहेत. सध्या ठाकरे गटाचे उमेदवार हे सतत एकच भाषण देताना दिसत आहेत, ते म्हणजे शाश्वत विकास. या शब्दाचा वापर ते प्रत्येक वेळी करतात की, भाजप आमदारांनी कोणताच शाश्वत विकास केला नाही. मंगेश चव्हाण यांनी जी हजारो कोटींची कामे केली आहेत, ती तात्पुरती आहेत, शाश्वत नाहीत, असे उन्मेष पाटील सांगत आहेत.

# पर्यावरण जनजागर शोभायात्रेसह वृक्षदिंडीने वेधले लक्ष

## अमळनेरमध्ये मंगळ ग्रह सेवा संस्थेचा स्तुत्य उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**अमळनेर, १४ नोव्हेंबर**

धार्मिकतेसोबतच सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या मंगळ ग्रह सेवा संस्थेतर्फे गुरुवारी (१४ नोव्हेंबर) पर्यावरण संरक्षणार्थ काढण्यात आलेल्या जनजागर शोभायात्रेसह वृक्षदिंडीने अमळनेरकरांचे लक्ष वेधले.



संत श्री सखाराम महाराज वाडीपासून गुरुवारी (१४ नोव्हेंबर) सकाळी नऊला प्रांताधिकारी नितीन मुंडावरे, पोलीस निरीक्षक विकास देवरे व मंगळ ग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांनी श्रीफळ वाढवून शोभायात्रेस प्रारंभ केला. मंदिराचे पुरोहित प्रसाद भंडारी, तुषार दीक्षित, जयेंद्र वैद्य, गणेश जोशी, वैभव लोकाक्षी, मेहुल कुलकर्णी, अक्षय जोशी, शुभम वैष्णव यांनी पौरोहित्य केले. हास्यसम्राट प्रा. दीपक देशपांडे हे पूजेचे यजमान होते.

शोभायात्रेत मतदान जनजागृती रथ, भगवान श्री विष्णू, माता श्री तुलसी यांच्या प्रतीकात्मक मूर्तींचा रथ, डोक्यावर कलशधारी डी. आर. कन्या शाळेच्या विद्यार्थिनी, संतश्री सखाराम महाराज वेधपाठशाळेचे विद्यार्थी, श्री सखाराम महाराज वारकरी अध्ययन करणारे विद्यार्थी, खेडी व्यवहारदळेचे श्रीकृष्ण भजनी मंडळ, आनोरे येथील गुरुदेव भजनी मंडळ, नंदगाव येथील वेदमाता भजनी मंडळ, तासखेडा, अंतुर्ली, खेडी, निंभोरा येथील वारकरी संप्रदायाचे पथक, जी. एस. हायस्कूलमधील छात्रसेनेचे विद्यार्थी, लोकमान्य विद्यालयाचे विद्यार्थी, साने गुरुजी नूतन माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी, उस्ताद बाबूभाई यांची अलीम अँड पार्टी यांच्या सहभागासह वेतोशी, रत्नाागिरी येथील शिवकालीन मर्दानी चित्तथरारक कसरतीचे खेळ करणारे कसरतपटू शोभायात्रेचे मुख्य आकर्षण ठरले. संस्कृती आणि परंपरेचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी खराखुरा फलधारी आम्रवृक्ष तसेच माता-भगिनी पारंपरिक भारतीय वेशात होत्या आणि त्यांच्या डोक्यावर सजवलेला कलश तसेच छोटेखानी तुलसी वृंदावन होते. शोभायात्रेवर फुलांची उधळण केली जात होती. पी. एन. ज्वेलर्स, लक्ष्मीनारायण ट्रेडर्स, रोटरी क्लब, लक्ष्मणदास पंजाबी आदी दात्यांनी चहापान, फराळी चिवडा व बिस्किटांची सोय केली होती.

संत सखाराम महाराज वाडी संस्थान येथून शोभायात्रेची सुरुवात होत दगडी दरवाजातून तिरंगा चौक, कोंबडी बाजार, नगरपालिकेच्या मागून सुभाष चौक, राणी लक्ष्मीबाई चौक, मोठा बाजार, फरशी पूल, चोपडा नाकामार्गे श्री मंगळ ग्रह मंदिरात शोभायात्रेची सांगता झाली.

यावेळी माधुरी पाटील, करुणा सोनार, उज्ज्वला शिरोडे, झेप फाउंडेशनच्या रेखा चौधरी, पाडळसरे धरण जनआंदोलन समितीचे सुभाष चौधरी, साने गुरुजी विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील पाटील, जी. एस. हायस्कूलचे मुख्याध्यापक बी. एस. पाटील, पंकज मुंदडे, ताहा बुकवाला, महेश कोठवदे, विलास चौधरी, डी. ए. धनगर, डी. के. पाटील, समाधान पाटील, महेश कोठावदे, मुकेश पाटील, प्रियंका पवार, वैशाली पाटील, गायत्री पाटील, दीपाली पाटील आदी उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव सुरेश बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम, खजिनदार गिरीश कुलकर्णी, विश्वस्त अनिल अहिरराव, डी. ए. सोनवणे, जयश्री साबे, मंगल सेवेकरी उज्ज्वला शाह, प्रकाश मेखा, आशा महाले, आनंद महाले, विनोद कदम, बाळा पवार, आशिष चौधरी, उमाकांत हिरे, ए. डी. भदाणे, मनोहर पाटील, राहुल पाटील, ग्रिनरी कन्सल्टंट सुबोध पाटील, नीलेश महाजन आदींनी सहकार्य केले.

# वैशाली सूर्यवंशीकडे विकासाचा दृष्टिकोन

## सुषमा अंधारे यांची विरोधकांवर टीका

**पाचोरा** : पाचोरा-भडगाव मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार वैशाली सूर्यवंशी यांच्याकडे विकासाचा दृष्टिकोन आहे तर विरोधक जनतेत भ्रम निर्माण करीत असल्याची टीका शिवसेना-उबाठा पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केली. वैशाली सूर्यवंशी यांच्या प्रचारासाठी आयोजित सभेत त्या बोलत होत्या.



महाविकास आघाडीच्या उमेदवार वैशाली सूर्यवंशी यांनी विकासाचे व्हिजन मांडतानाच अन्य उमेदवारांवर कडाडून टीका केली. यानंतर सुषमा अंधारे यांनीही जोरदार वाग्बाण सोडले. सुषमा अंधारे म्हणाल्या की, स्वर्गवासी आर. ओ. पाटील यांनी अतिशय परिश्रमपूर्वक निर्मल समूहाला प्रगतीपथावर नेले. आज जगभरात या ग्रुपची ख्याती असून येथे परिसरातील हजारो स्त्री-पुरुषांना रोजगार मिळाला आहे. यातून त्यांची उपजीविका होत असते.

सुषमा अंधारे यांच्या या सभेला नागरिकांची मोठी गर्दी जमली होती. उपस्थितांनी त्यांच्या भाषणाला जोरदार दाद दिली. या कार्यक्रमाला महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्तेदेखील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील, सहसंपर्कप्रमुख सुनील पाटील, उध्दव मराठे, रमेश बाफना, अरुण पाटील, अभय पाटील, शरद पाटील, अनिल सावंत, एकलव्य संघटनेचे सुधाकर वाघ, डॉ. संजीव पाटील, भैयासाहेब ईस्माइल फकिरा, गजू पाटील, तिलोत्तमा मौर्य, पुष्पा परदेशी, योजना पाटील, लक्ष्मी पाटील, कमलाताई पाटील, डॉ. अस्मिता पाटील, सागर गवते, रसूल शेठ, अमजद पठाण, शफीक खान, मुकुंद सपकाळे, वाल्मीक जाधव, एकनाथ महाजन, उत्तमराव महाजन, दीपक पाटील, गणेश परदेशी, शंकर मारवाडी, मनोहर चौधरी, मच्छींद्र आबा, सागर वाघ, दीपकसिंग राजपूत, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सचिन सोमवंशी, राजेंद्र महाजन, प्रताप पाटील, प्रवीण पाटील, विनोद पाटील, राजेंद्र पाटील, भालचंद्र ब्राह्मणे, दीपक पाटील, जे. के. पाटील, राजू काळे, राहुल संघवी, विकास वाघ, हरिभाऊ पाटील, राकेश सोनवणे, दादा चौधरी, राजेंद्र राणा, प्रशांत पाटील, भरत खंडेलवाल, विठ्ठल गुंजाळ, अमजद पठाण, इरफान मणियार, पप्पू राजपूत, बंडू मोरे, वैभव पाटील, हरीश देवरे, गौरव पाटील, गोरख पाटील, रतन परदेशी, दत्तू मांडोळे, रमेश भदाणे, अरुण तांबे, लोटन महाजन, विलास पाटील आदींसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धरणगाव बेघर संघर्ष समितीतर्फे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**धरणगाव** : धरणगाव बेघर संघर्ष समितीतर्फे भोगवटदार वर्ग दोनऐवजी वर्ग एक द्यावा. जेणेकरून अतिक्रमणधारकांना कर्ज घेताना अथवा विक्री करताना सरकारची कोणत्याही प्रकारची परवानगी घेण्याची गरज राहणार नाही, याबाबतचे निवेदन येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देण्यात आले.

याबाबत मुख्यमंत्री शिंदे व पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी, सरकार आल्यानंतर निश्चितच याबाबत विचार करण्यात येईल व धरणगाव येथील अतिक्रमणधारकांना भोगवटादार एक देण्यात येईल. जेणेकरून कर्ज घेताना अथवा घराची विक्री करताना कुठल्याही प्रकारे सरकारची कोणत्याही प्रकारची परवानगीची गरज राहणार नाही, असे आश्वस्त केले.






# बालाजी वहन व्यवस्थापक मंडळाच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा-मंथन

**धरणगाव** : येथील श्री बालाजी वहन व्यवस्थापक मंडळाची बैठक उत्साहात झाली. बैठकीत विविध विषयांवर चर्चा-मंथन करण्यात आले.

शहरात सकाळी अकराला झालेल्या श्री बालाजी वहन व्यवस्थापक मंडळाच्या बैठकीत सचिव प्रशांत वाणी यांनी झालेल्या वहन उत्सवाचा लेखाजोखा सादर केला आणि कानगी व वहनासाठी लागणाऱ्या बैलजोडीचा जुंपवण्याच्या माध्यमातुन मिळालेल्या देणगीचा मंडळाला मोठा आर्थिक लाभ झाल्याने संबंधित भक्तांचे टाळ्या वाजवीत अभिनंदन करण्यात आले.

मंडळाचे अध्यक्ष डी. आर. पाटील यांनी मनोगतातून रथ व वहन उत्सव शांततेत पार पडल्याने कोणताच अनुचित प्रकार न होता सर्व जाती-धर्मातील लोकांनी सहभाग नोंदवून सहभागी झाल्याबद्दल अभिनंदन करून आभार मानले आणि वर्षानुवर्षे चालत असलेला या धार्मिक उत्सवात पुढे असेच सहकार्य अपेक्षित असल्याचे नमूद करून ऐनवेळेवर आलेल्या विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

बैठकीला मंदिर उत्सव समितीचे जीवन बयस, मंडळाचे संचालक ज्ञानेश्वर महाजन, किरण वाणी, अशोक येवले, प्रशांत केले, किशोर वाणी, अरुण महाले, मंगलदास भाटिया, ज्येष्ठ पत्रकार कडू म हाजन, रतिलाल चौधरी, भास्कर मराठे, माधवराव पाटील, पंडित गुरुजी, श्याम भाटिया, बाबासाहेब भाटिया, महेंद्र बयस, प्रकाश जाधव यांच्यासह सभासद उपस्थित होते.


**MAHAVITARAN**
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

## e-Tender Notice:-

The Executive Engineer, MSEDCL, U&R Division, Bhusawal invites e-tenders in two bid system from registered and experienced Reputed Agency/ Contractors having experience of similar work in MSEDCL and completing the formalities for the following work.

| Tender No. | Name of Work | Tender Amount in Lakhs | EMD Amount in Rs | Tender Cost in Rs (including GST) |
|---|---|---|---|---|
| T-17/ 2024-25 | e-Tender for the work of transportation, loading & unloading of Line Material & PSC/RSJ Poles except Power Transformer under Bhusawal Division. | 20.00 Lakhs | 20,000/- | 2950/- |

The tender documents are available at our website www.mahadiscom.in from date 14.11.2024 to 27.11.2024 up to 15:00 Hrs. Last date for online uploading of tender bid documents is 27.11.2024 up to 15:30 hrs. For Any query please contact: - The Addl. Ex. Engineer (O), MSEDCL, U&R Dn, Bhusawal. Tel. No. 7875889027.

**PRO No.: - 163/2024** **Executive Engineer U&R Division Bhusawal**



**जळगांव जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, जळगांव**
विकास
पोस्ट बॉक्स नं. ३२, शिवाजी नगर रोड, जळगांव - ४२५००१
फोन नं. ०२५७ - २२२६६४५-४८ फॅक्स नं. ०२५७ - २२२५६११

**टेंडर नोटीस**

जळगाव जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघासाठी खालील नमुद केले प्रमाणे निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचा तपशील |
|---|---|
| ०१ | पॉलीफिल्मचे टेक्नीकल |

सदर निविदेतील कामाचा तपशील, अनामत रक्कम, नियम अटी व शर्ती इत्यादी माहिती संघाच्या www.vikas.coop या वेब साईटवर पाहावयास मिळतील. **अ.क्र. 01 च्या निविदा दि 23/11/2024 रोजी दुपारी 5.00 वाजेपर्यंत संघाच्या कार्यस्थळी अनामत रक्कमेसह पाठवावे.** सदरच्या जाहीराती मध्ये काही बदल झाल्यास त्याची सुचना संघाच्या **www.vikas.coop** या वेबसाईटवर अपलोड करण्यात येईल. कोणतेही कारण न देता निविदा पुर्णत: किंवा अंशता मंजुर अथवा नामजूर करण्याचा अधिकार संघाने राखून ठेवलेला आहे.

**कार्यकारी संचालक**



## Format C-1

(For Candidate to Publish in Newspapers)

**Declaration About Criminal Cases**

As per the judgement dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

Name of Candidate : **Unmesh Bhaiyyasaheb Patil**
Address : **At.Post. Daregaon, Tal. Chalisgaon, Dist. Jalgaon / M.J.Nagar, Kharjai Road, Chalisgaon, Dist. Jalgaon**
Name of Political Party : **Shivsena (Uddhav Balasaheb Thackeray)**
Name of Election : **State Legislative Assembly Election - Maharashtra Vidhansabha 2024**
Name of Constituency : **17 Chalisgaon Vidhansabha (Dist. Jalgaon)**

I **Unmesh Bhaiyyasaheb Patil** (name of candidate), a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

| Sr. No. | Pending criminal cases | | | Details about cases on conviction for criminal offences | |
|---|---|---|---|---|---|
| | Name of Court | Case No. and status of case | Section (s) of Acts concerned and brief description of offence (s) | Name of Court & date(s) of order (s) | Description of offence(s) & punishment imposed |
| 1 | Judicial Magistrate First Class Court Chalisgaon | 476/2021 | IPC Sec. 188, MPC 37(1)(3), 135 | N.A. | N.A. |
| 2 | | 358/2021 | IPC Sec. 188, MPC 37(1)(3), 135 | N.A. | N.A. |
| 3 | | 213/2020 | IPC Sec. 143, 145, 149, 188, 269, 270, 341, MPC 37(1)(3) | N.A. | N.A. |



## Format C-1

(For candidate to publish in Newspapers, TV)

**Declaration about criminal cases**

(As per the judgment dated 25 September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No.536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name and Address of Candidate : Sharad Krishnarao Gavit**
**Name of Political Party : Independent**
(Independent candidates should write "Independent here)
**Name of Constituency : 4 Navapur**

**I, Sharad Krishnarao Gavit.** (name of candidate), a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents.

**(A) Pending criminal cases**

| Sr. No. | Name of Court | Case No. and dated | Status of Case(s) | Section(s) of Acts concerned and brief descripation of offence (s) |
|---|---|---|---|---|
| 1 | District Court, Nandurbar | | | 1. u/s 409,420,467,471,34<br>2. u/s 409,420,467,471,34<br>3. u/s 409,420,467,471,34<br>4. u/s 409,420,467,471,34<br>5. u/s 409,420,467,471,34<br>6. u/s 409,420,467,471,34<br>7. u/s 130 (1) (D)<br>8. u/s 144 () 144 (G), u/s323,504,506<br>9. u/s 143,147,149,337,324,323,504, 506, u/s 37(1)(3) 135<br>10.u/s 143,147,149,324,341,427,323, u/s 37 (1)(3)135 11.u/s 36/134 37 (1) (3)135 |
| | IR No 1) RRCC 124/2015 क) अंतर्भूत असलेल्या संबंधित अधिनियमांची संहितेची कलम (कलमे ) कलम क्रमांक द्यावा, उदा, भारतीय दंड संहितेचे कलम.. (इत्यादी) **2)** R.C.C.No. 47/2017, मुख्य न्यायदंडाधिकारी, नंदुरबार, **3.)** R.C.C.No. 115/2018 मुख्य न्यायदंडाधिकारी, नंदुरबार, **4.)** R.C.C.No. 79/2017, मुख्य न्यायदंडाधिकारी, नंदुरबार, **5.)** R.C.C.No. 37/2017, मुख्य न्यायदंडाधिकारी, नंदुरबार equitted by the Cou , **6.)** R.C.C.No. 78/2015, मुख्य न्यायदंडाधिकारी, नंदुरबार | | | |

**(B) Details about cases of conviction for criminal offences.**

| Sr. No. | Name of Court & date (s) of Order(s) | Description of offence (s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
|---|---|---|---|
| | NA | NA | NA |

In the case of election to Council of States or election to Legislative Council by MLAs, mention the elect concerned in place of name of constituency.



## Format C-1

(for candidate to publish in Newspapers, TV)

**Declaration about criminal cases**

(As per the judgement dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

Name and address of candidate :- Shivaji Maharu Hatkar, Nehru Nagar, Mehrun Jalgaon
Name of Political Party :- Independent
Name of Election :- Maharashtra Legislative Assembly 2024
Name of Constituency :- 14 – Jalgaon Rural

I **Shivaji Maharu Hatkar** a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

**(A)Pending criminal cases**

| Sl. No. | Name of Court | Case No. and dated | Status of case (s) | Sections (s) of Acts concerned and brief description of offence (s) |
|---|---|---|---|---|
| 1. | 1) Chief Jr. Magistrate Court, Jalgaon | Case No. 399/2018 | Pending | IPC 420,468,471,34 201 Maharashtra Prevention Malpractices Act University Board and other Specify Examination Act 1982 of clause 7,8 Information tech Act 2000 Clause 66 d, 72 |
| | 2) First Class Magistrate Court, Dhule | Case No. 192/2008 | Pending | IPC 494,34 |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sl. No. | Name of Court & date (s) of order (s) | Description of office (s) & punishment imposed | Maximum Punishment imposed |
|---|---|---|---|
| 1. | 1) Chief Jr. Magistrate Court, Jalgaon | Nil | Nil |
| | 2) First Class Magistrate Court, Dhule | Nil | Nil |

**Shivaji Maharu Hatkar**
Name of Constituency :- 14 – Jalgaon Rural



## Format C-2

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

Name of Political Party : Bharatiya Janata Party
*Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024
Name of State/UT : Maharashtra

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 12- Bhusawal (S.C.) | Sanjay Vaman Savkare | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

Name of constituency : 12 - Bhusawal (S.C.)

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**



# दर्जेदार शिक्षणातून डॉक्टर्स, इंजिनीयर्स आणि अधिकारी घडवण्याचे कार्य - आमदार अमरिशभाई पटेल

## आ. काशिराम पावरा यांच्या प्रचारार्थ बोराडी येथील सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**शिरपूर** : मी सर्वप्रथम आमदार झाल्यावर आदिवासी भागात १९९० मध्ये फार फिरलो, खूप काम केले. असंख्य रस्ते, पूल बनवले. 'शिरपूर ६०' हा माझा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवून आदिवासी व इतर अनेक विद्यार्थी घडवतोय. यातून अनेक डॉक्टर्स, इंजिनीयर्स, मोठे अधिकारी बनवायची मोहीम यशस्वीपणे अविरतपणे सुरू आहे, असे प्रतिपादन आ. अमरिशभाई पटेल यांनी केले. ते बोराडी येथील आ. काशिराम पावरा यांच्या प्रचार सभेत बोलत होते.

तालुक्याच्या विकासासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करत आहोत. ग्रामीण, आदिवासी भागाची विजेची समस्या दूर करणार. येत्या ५ वर्षांत २४ तास वीज देण्यासाठी मनापासून प्रयत्न करणार आहोत. बोराडी ते गिधाडे दर्जेदार रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाच्या कामाला सुरुवात झाली आहे. कर्मवीर व्यंकटराव यांच्यानंतर आता तुषार रंधे व राहुल रंधे यांचे बोराडीसाठी चांगले काम आहे, याचा आनंद वाटतो. सर्वच क्षेत्रात मनापासून काम करून शिरपूर तालुक्यातील सर्वसामान्य जनतेला न्याय देण्यासाठी आम्ही प्रयत्न केला आहे. तालुक्याच्या विकासासाठी आम्ही संपूर्ण पटेल परिवार व आ. काशिराम पावरा मनापासून प्रयत्नशील आहोत. मी गेल्या ४० वर्षांपासून तालुक्यासाठी जीव ओतून काम करतोय. मोठे होण्यासाठी परिश्रमाशिवाय पर्याय नाही. येत्या पाच वर्षात हजारो युवकांना रोजगाराची संधी मिळणार आहे. बोराडी, सांगवी, पळासनेरला नवीन शाळा सुरू करणार आहे. १ हजार बेडचे हॉस्पिटल लवकरच सुरू करुन कमी खर्चात आरोग्य सेवा देऊ. मेडिकल कॉलेजे निर्माणकार्य लवकर होईल. साखर कारखाना कोणत्याही परिस्थितीत सुरु करणार, अफवांना बळी पडू नका. आमदार कार्यालयात जनतेसाठी शासकीय योजनांचा लाभ दिला जात आहे. आ. काशिराम पावरा हे तालुक्याच्या विकासासाठी आमच्या सोबत मनापासून काम करत आहेत, त्यांना भरघोस मतांनी विजयी करावे असे आवाहन आमदार अमरिशभाई पटेल यांनी केले.

महायुतीचे शिरपूर विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार आमदार काशिराम पावरा यांच्या प्रचारार्थ तालुक्यातील बोराडी येथील अहिल्यादेवी होळकर फार्मसी कॉलेज मैदानावर बोराडी, कोडीद, पळासनेर या तीन जिल्हा परिषद गटाच्या पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक यांची जाहीर सभा १३ नोव्हेंबर रोजी मोठ्या उत्साहात झाली. या वेळी व्यासपीठावर माजी मंत्री, आ. अमरिशभाई पटेल, आ. काशिराम दादा पावरा, भाजपा प्रवासी नेते दीपक देसाई, भाजपा जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी, विधानसभा भाजपा महायुती समन्वयक डॉ. तुषार रंधे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, तालुकाध्यक्ष किशोर माळी, माजी तालुकाध्यक्ष राहुल रंधे, निवडणूक प्रभारी के. डी. पाटील, माधवराव पाटील, आदिवासी आघाडी जिल्हाध्यक्ष जयवंत पाडवी, सांगवी मंडळ अध्यक्ष सत्तारसिंग पावरा, पं. स. सभापती लता वसंत पावरा, वसंत पावरा, जि. प. सदस्य योगेश बादल, मोगरा पाडवी, जता पावरा, रमण पावरा, दत्तू पाडवी, साहेबराव पाटील, नारायणसिंग चौधरी, प्रा. संजय पाटील, भटू माळी, राष्ट्रवादीचे बाळकृष्ण पाटील, हिरा वाकडे, शिवसेनेचे मनोज धनगर, कन्हैया चौधरी, युवराज राजपूत, आरपीआयचे बाबा थोरात, रोहित रंधे, शशांक रंधे, सांगवी मंडळ युवा मोर्चा अध्यक्ष मंजीत पावरा, राजेंद्र पाटील, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच, विविध संस्था पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला, पुरुष, युवा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी आ. काशिराम पावरा म्हणाले, आदिवासी भागात वन सातबारे वाटप करून महसूल फायदे मिळवून देणारा आपला एकमेव तालुका ठरला आहे. तालुक्यातील विजेची समस्या दूर होईल यासाठी तसेच २४ तास विजेसाठी प्रयत्न करणार. तालुक्यात एकही पाडा सुविधांपासून वंचित राहणार नाही. आ. अमरिशभाई पटेल व भूपेशभाई पटेल यांच्यासह आम्ही शिरपूर तालुक्याचा सर्वच क्षेत्रात विकास साधतोय. तालुक्यात पाणी, शिक्षण, रोजगार, शेती अशा सर्वच क्षेत्रात काम केले आहे. तर राहुल रंधे म्हणाले, बोराडी येथे भाईंच्या मार्गदर्शनाखाली आम्हीही कामे करत आहोत. वसुंधरा योजनेत प्रथम क्रमांक पटकावला. भाई व आ. पावरा यांचे काम प्रेरणादायी आहे. जयवंत पाडवी व अनेक मान्यवर यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन संदीप चौधरी यांनी केले. आभार डॉ. तुषार रंधे यांनी मानले.



# किशोर पाटील यांना विजयी केल्यास मुख्यमंत्री मतदारसंघ दत्तक घेणार

## बेरोजगार तरुणांच्या हातांना काम देण्याचे खा. श्रीकांत शिंदे यांचे प्रचारसभेत प्रतिपादन

**पाचोरा** : राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी किशोर पाटील निवडून आले तर हा मतदारसंघ दत्तक घेण्याचे वचन दिले आहे. त्यामुळे मतदारसंघाच्या विकासाची चिंता करू नका. कारण मुख्यमंत्री जे बोलतात ते करतात. येथील एमआयडीसीत उद्योग आणून बेरोजगार तरुणांच्या हातांना काम देण्याचे वचन ही यानिमित्ताने आपल्याला देतो, असे प्रतिपादन शिवसेनेचे युवा नेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केले.

ते महायुतीचे उमेदवार किशोर पाटील यांच्या प्रचारार्थ भडगाव येथे शेतकरी सहकारी संघाच्या प्रांगणात आयोजित सभेत बोलत होते. डॉ. श्रीकांत शिंदे पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून जवळपास अडीच कोटी महिलांच्या खात्यावर प्रत्येकी साडेसात हजार रुपये टाकण्यात आले आहेत. या माध्यमातून महिलांना सक्षम करण्याचे काम मुख्यमंत्र्यांनी केले आहे. या लाडकी बहीण योजनेमुळे महाराष्ट्रात भावा-बहिणीचं एक वेगळं नात निर्माण झालं आहे. विरोधकांकडून या योजनेची टिंगल करण्यात येत होती. मात्र ज्यांना फक्त 'माझ कुटुंब आणि माझी जबाबदारी' एवढंच माहीत आहे त्यांना या १५०० रुपयांचे महत्त्व काय समजेल? असा मर्मभेदी टोलाही त्यांनी लगावला. महायुतीचे सरकार आल्यावर या लाडक्या बहिणींच्या खात्यावर प्रत्येक महिन्याला २१०० रुपये पडणार आहेत. उलट जे मुख्यमंत्र्यांवर टीका करतात त्यांनी कोरोना काळात खिचडीतसुध्दा भ्रष्टाचार केला आहे. त्यामुळे ते काय बोलतील? मुख्यमंत्र्यांचा प्रवास हा रिक्षाचालक ते मुख्यमंत्री असा राहिला आहे. त्यामुळे त्यांना सर्वसामान्यांची जाण आहे. जे लोक बाळासाहेबांची मिमिक्री करायचे आज त्यांना पक्षात घेऊन खांद्यावर बसविण्याचे काम काही जण करत आहेत. असेही त्यांना निकालानंतर मिमिक्रीचेच काम करावे लागणार आहे, असा टोला 'उबाठा'च्या नेत्या सुषमा अंधारे यांचे नाव न घेता लगावला.

या वेळी व्यासपीठावर भाजपच्या गुजरातमधील निंबायत मतदारसंघाच्या आमदार संगीता पाटील, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रावसाहेब पाटील, माजी नगराध्यक्ष राजेंद्र पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विकास पाटील, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मधुकर काटे, भाजपचे विधानसभा संयोजक अमोल पाटील, शेतकी संघाचे अध्यक्ष भैयासाहेब पाटील, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख डॉ. विशाल पाटील, प्रवक्ते प्रदीप देसले, डॉ.प्रियंका पाटील, शहरप्रमुख बबलू देवरे, तालुकाप्रमुख संजय पाटील, सुनील पाटील, माजी नगराध्यक्ष संजय गोहील, समन्वय समितीचे अध्यक्ष युवराज पाटील, रिपाइंचे तालुकाध्यक्ष एस. डी. खेडकर, सुरेंद्र मोरे, शशिकांत येवले, पी. ए. पाटील, युवा नेते सुमित पाटील, युवा सेनेचे जितेंद्र जैन, लखीचंद पाटील, आबा चौधरी, विकास पाटील, प्रवक्ते उल्हास आवारे, नंदू सोमवंशी, इमरान अली सैयद, वासिम मिर्झा, आनंद जैन, एकलव्य संघटनेचे धर्मा बाविस्कर, दशरथ मोरे, जहागिर मालचे आदी उपस्थित होते.

आदिवासी प्रकल्प कार्यालय भडगाव तालुक्यात करण्यासाठी प्रयत्न करत आहे. ते अंतिम टप्प्यात आहे. त्याला शासन स्थापन झाल्यावर मंजुरी द्यावी, अशी मागणी आमदार किशोर पाटील यांनी केली. दरम्यान डॉ. प्रियंका पाटील यांनी उबाठाच्या उमेदवार वैशाली सूर्यवंशी यांच्यावर चांगलाच हल्ला चढविला.

### विरोधकांना हिशोब घेण्याचा अधिकार नाही -आमदार किशोर पाटील

परवा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभेत चार हजार कोटींची कामे केली, असे सांगितले तर विरोधकांनी एक हजार कोटी कुठे गेले म्हणून रान उठवले. मात्र विरोधकांना मी सांगू इच्छितो की, तुम्ही साधी मुतारी बांधली नाही. तुम्हाला अधिकार तरी आहे का हिशोब मागायचा? तरी सांगतो, मी जी कामे केली आहेत ती ३ हजार कोटींची तर एक हजार कोटीचे कामे हे पाईपलाईनमध्ये आहे. त्यामुळे विरोधकांनी विकासकामांवर बोलावे. मात्र त्यांच्याकडे दुसरे मुद्दे नसल्याने काहीतरी उकरून काढण्याचे काम ते करतात. जुवार्डी पाझर तलावाचा अनेक वर्षांपासून रखडेला प्रश्न मी सोडविला. पाचोरा-भडगाव तालुक्यातील अतिक्रमित घरे नियमित करण्यासाठी मी प्रयत्न केले. मैत्रेयवरून काहींनी राजकारण सुरू केले आहे. मात्र मी गेल्या ७ वर्षांपासून या विषयावर काम करत आहे. आता हा विषय अंतिम टप्प्यात आला आहे. त्यामुळे राज्यातील ४९ लाख ठेवीदारांना त्यांचे पैसे परत मिळणार आहेत.

### पाचोरा-भडगाव मतदारसंघावर मुख्यमंत्र्यांचे विशेष लक्ष -डॉ.श्रीकांत शिंदे

किशोर पाटील हे मुख्यमंत्र्यांचे मानसपुत्र आहेत. त्यामुळे.ते निवडून आल्यानंतर हा मतदारसंघ दत्तक घेणार आहेत. म्हणून विकासकामांच्या बाबतीत कोणीही चिंता करायचे काम नाही. महाराष्ट्र परकीय गुंतवणुकीत देशात नंबर एकवर आहे. त्यामुळे येथे मंजूर असलेल्या एमआयडीसीत मोठे उद्योग आणून लाडक्या भावांना रोजगार देण्याचे वचन मी देतो. याशिवाय गिरणा नदीवर प्रलंबित बंधाऱ्याचा प्रश्नही मार्गी लावू, अशी ग्वाही डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिली.




# महिलांच्या बँक खात्यात खटाखट तीन हजार रुपये टाकू

## राहुल गांधी यांची ग्वाही; नंदुरबारमध्ये उमेदवारांच्या प्रचारार्थ जाहीर सभा




**नंदुरबार** : भारतीय संविधानामध्ये वनवासी हा शब्द नाही. आदिवासी शब्द आहे. आदिवासी व वनवासी यामध्ये काय फरक आहे, याबाबत कॉंग्रेसचे नेते खासदार राहुल गांधी यांनी सभेला समजावून सांगत महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार आल्यास महिलांच्या बँक खात्यात खटाखट तीन हजार रुपये दिले जातील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

नंदुरबार जिल्ह्यातील विधानसभेच्या सहा मतदारसंघांत निवडणुकीतील उमेदवारांच्या प्रचारासाठी नंदुरबार शहरातील जी. टी. पी. महाविद्यालयाच्या मैदानावर राहुल गांधी यांची जाहीर सभा झाली. राहुल गांधी म्हणाले की, आदिवासी हेच हिंदुस्थानाचे मूळनिवासी असून, जल, जंगल, जमिनीवर त्यांचाच अधिकार आहे. मात्र, भाजप-आरएसएसवाले मूळ आदिवासींना वनवासी संबोधून त्यांचे जल, जंगल, जमिनीवरील अधिकार हिरावून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. आदिवासींचे जंगल तोडून त्यांचा रहिवास नष्ट करीत आहेत. जंगलच राहणार नाही, तर आदिवासी जातील कुठे? म्हणजेच आदिवासींना बेदखल करण्याचे काम सुरू आहे. मात्र, कॉंग्रेस गठबंधनचे सरकार आल्यास तसे होऊ देणार नाही. आदिवासी, मागास, दलितांनाही या हिंदुस्थानचे भागीदार बनविणार. त्यांना त्यांच्या टक्केवारीनुसार न्याय देणार, तसेच महाविकास आघाडीचे सरकार महाराष्ट्रात आले, तर महिलांना प्रत्येक महिन्याला तीन हजार रुपये खटाखट बँकेत टाकले जातील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. सुरुवातीला याहामोगी, भगवान बिरसा मुंडा, पंडित नेहरू यांच्या प्रतिमांना पुष्पार्पण केले. व्यासपीठावर पक्षाचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेनिथेला, प्रतिभा शिंदे, धुळे ग्रामीणचे उमेदवार कुणाल पाटील, साक्रीचे उमेदवार प्रवीण चौरे, खासदार गोवाल पाडवी, नंदुरबारचे उमेदवार इंजि. किरण तडवी, शहाद्याचे उमेदवार राजेंद्रकुमार गावित, नवापूरचे उमेदवार शिरीष नाईक, अभिजित पाटील, जयपाल रावल यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी रेवा फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. समीधा नटावकर यांनी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला.

# महाराष्ट्राला प्रगती, समृद्धीकडे नेण्याची जबाबदारी स्वीकारलीय - विजय चौधरी

**नंदुरबार** : भाजपने महाराष्ट्राला प्रगती आणि समृद्धीकडे नेण्याची जबाबदारी स्वीकारली आहे, असे भाजपचे प्रदेश महामंत्री विजय चौधरी यांनी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जाहीरनामा म्हणजे संकल्पपत्र-२०२४ जाहीर करताना सांगितले.




नंदुरबार येथे पत्रकार परिषदेत भाजपचे जिल्हाध्यक्ष नीलेश माळी उपस्थित होते.

भाजपचे प्रदेश महामंत्री चौधरी म्हणाले की, भाजपने महाराष्ट्राला प्रगती आणि समृद्धीकडे नेण्यासाठी एक महाराष्ट्र- श्रेष्ठ महाराष्ट्र या दृष्टिकोनातून भाजप नेहमीच विकास, प्रगती आणि जनकल्याणात प्रथम आहे. महाराष्ट्र धर्माची भावना जपली आणि वाढवली आहे. महायुतीत-गती-प्रगती या संकल्पनेतून सर्वच एकत्र आणले. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जाहीरनामा समितीचे अध्यक्ष सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनातून, सहकार्यातून, महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींना प्रत्येक महिन्याला २१०० रुपये देण्यात येतील, तसेच या योजनेचे औचित्य साधून महिलांमध्ये आर्थिक साक्षरता निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण दिले जाईल. महिला सुरक्षेसाठी २५ हजार महिलांचा पोलीस दलात समावेश करण्यात येईल. येणाऱ्या काळात २५ लाख रोजगारनिर्मिती तसेच महिन्याला १० लाख विद्यार्थ्यांना १० हजार रुपये विद्यावेतन देण्यात येईल. २०२७ पर्यंत महाराष्ट्रात ५० लाख लखपती दीदी तयार करण्यात येतील. यासाठी प्रत्येकी ५०० स्वयंसाहाय्यता गटांचे एक औद्योगिक क्लस्टर तयार करण्यात येईल आणि एक हजार कोटींचा प्रारंभिक फिरता निधी उपलब्ध करण्यात येईल, असेही त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्राने २०२८ पर्यंत एक ट्रिलियन अर्थव्यवस्था बनविण्याचे लक्ष्य ठेवले आहे. महाराष्ट्राच्या विकासासाठी भाजप सरकार असंख्य योजना या जाहीरनाम्याच्या माध्यमातून प्रसिद्ध केल्या आहेत, अशी माहिती प्रदेश महामंत्री विजय चौधरी यांनी दिली.

### गड-किल्ले विकास प्राधिकरण स्थापणार

महाराष्ट्रात प्राचीन आणि ऐतिहासिक गड-किल्ल्यांची मोठी संख्या आहे. हे गड-किल्ले महाराष्ट्राचे वैभव असून, महाराष्ट्राच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक जडणघडणीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे. महाराष्ट्राच्या या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धनासाठी गड-किल्ले विकास प्राधिकरण स्थापित करण्यात येईल, असे प्रदेश महामंत्री चौधरी यांनी सांगितले.

# नंदुरबारमध्ये शरद पवार गटाला मोठा धक्का

## जिल्हाध्यक्ष जगताप, बिपीन पाटलांचा शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपप्रवेश; डॉ. विजयकुमार गावित यांना आता पाठबळ

**नंदुरबार** : राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष नितीन जगताप, बिपीन पाटील यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये जाहीर प्रवेश करीत महायुतीचे उमेदवार डॉ. विजयकुमार गावित यांना जाहीर पाठिंबा घोषित केला. यामुळे ऐन विधानसभा निवडणुकीवेळी हा महाविकास आघाडीला मोठा धक्का मानला जात आहे.



महायुतीचे भाजपचे उमेदवार मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांच्या नेतृत्वात पक्षप्रवेश सोहळा झाला. डॉ. विजयकुमार गावित यांच्या हस्ते भाजपचा भगवा स्कार्फ गळ्यात घालून सर्व पदाधिकाऱ्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा डॉ. सुप्रिया गावित, सभापती प्रकाश गावित, भाजप युवानेते विक्रांत मोरे, तालुकाध्यक्ष जे. एन. पाटील, जिल्हा परिषद सदस्य शांताराम पाटील, मोहन खानवाणी, श्यामबापू मराठे, नगरसेवक आनंदा माळी, संतोष वसईकर, पावबा मराठे, दीपक पाटील यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

महायुती सरकारने मागील अडीच वर्षांत सर्वाधिक निधी देऊन जिल्ह्यात विविध विकासकामांना गती दिली. आपल्याला जिल्ह्याचा तोच विकास सुरू ठेवण्यासाठी पक्षीय धोरण लक्षात ठेवून लोकांची कामे पूर्णत्वास आणावयाची आहेत. आपण सर्वजण विकासाचे ध्येय ठेवून महायुतीला जास्तीत जास्त मते मिळवून द्याल, अशी अपेक्षा डॉ. विजयकुमार गावित यांनी व्यक्त केली.

पक्षप्रवेशाविषयी भूमिका मांडताना नितीन जगताप यांनी सांगितले की, इथे पक्षात गद्दारी खूप झाली आहे. शिवाय, फक्त आणि फक्त डॉ. विजयकुमार गावित यांना व्यक्तिगत लक्ष्य बनविले जात आहे. गेल्या ३० वर्षांत त्यांनी केलेली कामे लक्षात न घेता केवळ त्यांच्या परिवार आणि घराण्यावर बोलले जाते. ही टीका करणाऱ्या दुसऱ्या कोणा नेत्याचे एवढे काम आहे का, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित करीत त्यांनी दाखवून द्यावे, असे आव्हानही त्यांनी दिले. एकंदरीत या स्थितीमुळे आम्ही शरदचंद्र पवार गटाचे जेवढे पक्षाचे पदाधिकारी होतो, त्यांनी शंभर टक्के डॉ. विजयकुमार गावित यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला, असेही जगताप यांनी स्पष्ट केले.

### मराठा समाजाला डॉ. गावितांचा अभिमान : जगताप

मराठा आरक्षणाचा प्रश्न गाजत असताना आणि त्यावर आम्ही आमच्या मागणीचे निवेदन काढले असताना, ते स्वीकारण्याची हिंमत स्थानिक कोणत्याही नेत्याने दाखवली नाही; परंतु एकमेव डॉ. विजयकुमार गावित हे असे नेते आहेत की, ज्यांनी आमचे नुसते निवेदन स्वीकारले नाही, तर येथील समस्त मराठा समाजाची भूमिका मुंबईत राज्य सरकारकडे मांडली. पाठपुरावा घेऊन त्यावर अधिकृत उत्तर मिळवून दिले. आम्हाला मराठा समाजाला याचा आज अभिमान वाटतो. सर्व घटकांना न्याय देणारा असा नेता खरोखरच विकास करू शकतो, ही खात्री असल्यामुळे आम्ही सर्व त्यांना जाहीर पाठिंबा देत आहोत, अशी ग्वाहीही नितीन जगताप यांनी दिली.

# दुर्गम भागाच्या विकासासाठी हवा डॉ. हिना गावितांसारखा आमदार!

## अक्कलकुवा मतदारसंघातील मतदारांची अनोखी मागणी; मतदारांकडून स्वागत

**नंदुरबार** : जिल्ह्यातील दुर्गम भाग विकासापासून कोसो दूर आहे. दुर्गम भागातील आदिवासी बांधवांना विकासाच्या प्रमुख प्रवाहात आणण्यासाठी आणि कायापालट घडविण्यासाठी डॉ. हिना गावित यांच्यासारखा आमदार हवा, अशी अनोखी मागणी अक्कलकुवा मतदारसंघातील मतदारांनी केली. डॉ. हिना गावित यांनी केलेल्या विकासकामांची आठवण ठेवून त्यांना विधानसभेत पाठविण्याचा निर्धारही त्यांनी केला.



जिल्ह्यातील पहिल्या महिला खासदार बनण्याचा मान संसदरत्न डॉ. हिना गावित यांनी नुसता पटकावला नाही, तर सलग दहा वर्षे या दुर्गम भागात विविध विकासकामे करून दाखविली. या दुर्गम भागाला विकासाच्या प्रमुख प्रवाहात आणण्यासाठी आणि आपल्या भागाचा कायापालट घडवण्यासाठी त्यांच्या त्या विकासकामांची आठवण ठेवून त्यांना आमदारपदावर आरूढ करावे, अशी साद अक्कलकुवा मतदारसंघातील कॉर्नर सभांमधून नागेश पाडवी, यशवंत पावरा, सुभाष पावरा, शिवाजी पराडके, प्रताप वाळवी आणि प्रमुख वक्त्यांनी अतिदुर्गम पहाडातील मतदारांना घातली.

अक्कलकुवा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार संसदरत्न डॉ. हिना गावित यांनी अक्कलकुवा आणि धडगाव तालुक्यातील गाव-पाड्यात जाऊन प्रत्यक्ष संपर्क करण्यावर भर दिला आहे. अनेक ठिकाणी डोंगराळ आणि टेकड्यांच्या भागात पायी जाऊन मतदारांशी प्रत्यक्ष संपर्क करीत आहेत.

महिलांकडून त्यांचे उत्स्फूर्त स्वागत होताना पाहायला मिळते. डॉ. हिना गावित यांनी खासदार असताना दोन लाख गॅस सिलिंडरचे केलेले वाटप, स्थलांतर करणाऱ्या मजुरांची नोंदणी सुरू करून त्यांना मिळवून दिलेले रोजगाराचे लाभ, दोन लाख बेघर लोकांना मिळवून दिलेली घरे, बचत गटातील महिलांना मिळवून दिलेले गृहोद्योग यांसह विविध विकासकामांची उजळणी प्रत्येक गावात लोकांकडूनच होत असल्याचे पाहायला मिळते. त्यामुळे त्यांच्या प्रचारफेऱ्यांना वाढता प्रतिसाद मिळत आहे.

### विकासासाठी पुन्हा जनता संधी देईल...

दरम्यान, कॉर्नर सभांत अपक्ष उमेदवार डॉ. हिना गावित यांनी सांगितले की, वर्षानुवर्षे दुर्लक्षित राहणारा अक्कलकुवा- धडगावातील दुर्गम भाग प्रगतीच्या प्रमुख प्रवाहात आणायचा असेल तर पुन्हा एकदा त्याच विश्वासाने मला संधी द्यावी, अशी साद मतदारांना घातली. अस्तंबा, सावऱ्या दिगर, तोरणमाळ यांसारख्या दुर्गम भागाला पूल, कॉंक्रीट रस्ते मिळवून दिले. खासदार असताना दुर्गम-अतिदुर्गम भागाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी निधी आणला. केंद्र सरकारकडून योजना आणून येथील आदिवासी बांधवांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न केला. यामुळे विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी जनता संधी देईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# ईश्वरबाबू जैन, प्रदीप रायसोनींकडून 'विजयी भव'चा आशीर्वाद

## आमदार सुरेश भोळे यांचे गणपतीनगर, रामेश्वर कॉलनीत जल्लोषात स्वागत

**जळगाव** : जिल्ह्यातील राजकारणात चाणक्य समजले जाणारे माजी महापौर प्रदीप रायसोनी यांनी, 'मग येणार ना मंत्री बनून' अशा शब्दांत विचारणा करून, माजी खासदार ईश्वरलाल जैन यांनी 'विजयी भव'चा आशीर्वाद महायुतीचे उमेदवार आमदार सुरेश ऊर्फ राजूमामा भोळे यांना मिठाई भरवून दिला.



जळगाव शहर मतदारसंघांत प्रचाराने वेग घेतला आहे. गुरुवारी (१४ नोव्हेंबर) सकाळी पहिल्या टप्प्यात आमदार भोळे यांना गणपतीनगर, रामेश्वर कॉलनी भागांमध्ये नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. आमदार भोळे यांनी सकाळी गणपतीनगर भागातील श्री गणपतीचे दर्शन घेऊन पहिल्या टप्प्यातील प्रचारफेरीला सुरुवात केली. तेथून गणपतीनगर, आदर्शनगर, जीवनमोती सोसायटी, रामेश्वर कॉलनी, विश्वकर्मानगर, राजपूत गल्लीमार्गे स्वामी समर्थ चौकात समारोप केला.



आमदार भोळे यांनी प्रचारफेरी मार्गात माजी महापौर प्रदीप रायसोनी, माजी खासदार ईश्वरलाल जैन, उद्योजक यशवंत बारी, माजी नगरसेविका रेखा पाटील, ज्योती चव्हाण, सदाशिवराव ढेकळे, राजेंद्र घुगे- पाटील आदींच्या निवासस्थानी जात भेट दिली.

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे मनीष जैन यांनी काही काळ प्रचारात सहभाग घेतला. सिंधी समाजाचे प्रार्थनास्थळ प्रेमप्रकाश आश्रमात भेट देऊन महाराजांचे आशीर्वाद घेतले. महाराजांनी शाल अंगावर टाकून सत्कार करीत आशीर्वाद दिले.

प्रचारफेरीत भाजपचे महानगर जिल्हाध्यक्षा उज्ज्वला बेंडाळे, जिल्हा उपाध्यक्ष नितीन इंगळे, विधानसभा क्षेत्रप्रमुख विशाल त्रिपाठी, शिवसेनेचे माजी महापौर ललित कोल्हे, राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे प्रदेश संघटक विनोद देशमुख, लोक जनशक्ती पक्षाचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दीपक सपकाळे, जिल्हाध्यक्ष अशोक पारधे, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजूभाई मोरे, रिपाइं आठवले गटाचे महानगराध्यक्ष अनिल अडकमोल, भाजपचे माजी महानगर जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, माजी नगरसेवक सदाशिवराव ढेकळे, रेखा पाटील, राजेंद्र घुगे- पाटील, शिवसेनेच्या ज्योती चव्हाण, भाजपचे अनिल देशमुख, भाजप मंडळ क्रमांक ८ चे अध्यक्ष महादू सोनवणे, राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला महानगराध्यक्षा मीनल पाटील, भाजपचे गौरव ढेकळे, मधुकर ढेकळे, पृथ्वीराज सोनवणे, महेश कापुरे, महेश जोशी, राहुल वाघ, आशुतोष पाटील, राहुल कुलकर्णी, विनोद मराठे, प्रकाश बालाणी, वैशाली पाटील, रेखा कुलकर्णी, शोभा कुलकर्णी, माधुरी देशमुख, शिवसेनेचे माजी नगरसेवक गणेश सोनवणे, कुंदन काळे, पीयूष कोल्हे, उमेश सोनवणे, राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या माजी नगरसेविका लता मोरे, अर्चना कदम, ममता तडवी, शोभा भोईटे, रिपाइं आठवले गटाचे युवा जिल्हाध्यक्ष मिलिंद सोनवणे, अविनाश पारधे, अक्षय मेघे आदी महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## महत्त्वाचे

### गंधारतर्फे आज माझी मराठी माझा अभिमान कार्यक्रमाचे आयोजन

**जळगाव** : मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाल्याने गंधार कला मंडळातर्फे अक्षरगप्पा अंतर्गत माझी मराठी माझा अभिमान हा कार्यक्रम शुक्रवारी, १५ नोव्हेंबर रोजी होणार आहे. या वेळी मराठी भाषेचे महत्त्व, त्याचा इतिहास अशा विविध विषयांवर प्रकाश टाकण्यात येणार आहे. दुपारी १ वाजता भोईटे नगर, पिंप्राळा गेटजवळ येथे हा अक्षरगप्पा कार्यक्रम होईल. तरी साहित्यप्रेमींनी उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यक्षा विशाखा देशमुख यांनी कळविले आहे.

### जुन्या वादातून हल्ला; ३ दुचाकींची तोडफोड

जळगाव : जुन्या वादातून सहा जणांच्या टोळक्याने लाठ्या-काठ्यांसह घरावर तलवारीने हल्ला केला. सुरेश बळीराम कोळी (वय ५२, रा. वाल्मीक नगर, असोदा) यांच्या घरावर हा हल्ला मंगळवार, १२ रोजी रात्री १०.३० वाजेच्या सुमारास झाला. सुरेश कोळी यांच्या मालकीच्या बुलेट (क्रमांक एमएच १९ डीआर ०९०१) यासह अन्य दोन दुचाकींची तोडफोड केली. या प्रकरणी तक्रारीनुसार विशाल उर्फ यश सुधाकर सपकाळे, अर्जुन पद्माकर सपकाळे, पद्माकर पुरुषोत्तम सपकाळे, भरत शिवाजी सपकाळे, खेमचंद रवींद्र कोळी, योगेश रवींद्र कोळी यांच्या विरोधात तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो. हे. कॉ. दिनेश चव्हाण करीत आहे.

### वीज कर्मचाऱ्याला मारहाण

**जळगाव** : खासगी कामासाठी विद्युत पुरवठा बंद केला नाही. या कारणावरून भारत नगरातील उपकेंद्रात कार्यरत वीज कंपनी कर्मचाऱ्याला शिवीगाळ करीत मारहाण केली. तेथील बुक फाडून ११ केव्हीचे फिडर बंद पाडले. ही घटना ३ रोजी घडली. याप्रकरणी दहा दिवसांनंतर बुधवारी महावितरणचे कर्मचारी हिरालाल पाटील यांच्या दिलेल्या तक्रारीवरून शहर पोलिसात कुणाल हटकर विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. तपास पोलीस उपनिरीक्षक महेश घायतड करीत आहेत.



गरजूंसाठी शवपेटी उपलब्ध
संपर्क – (०२५७) २२३६१६६, २२२३६९९


अंकासाठी संपर्क
'तरुण भारत' अंकासंदर्भात काही सूचना, तक्रारी किंवा काही अडचण असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
मो.९८३४७४५४२२
९६२३६०४७१२

# रुग्णवाहिका आग दुर्घटनेची सखोल चौकशी : जिल्हाधिकारी

## फोर्स मोटार टीमलाही केले पाचारण; पोलिसांकडून तपास सुरू

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १४ नोव्हेंबर**

एरंडोल येथून प्रसूती झालेल्या महिलेसह तिचे बाळ, आई व डॉक्टर यांना घेऊन येणाऱ्या १०८ क्रमांकाच्या शासकीय रुग्णवाहिकेला आग लागून ऑक्सिजन सिलिंडरचा स्फोट झाला. या दुर्घटनेत कोणालाही इजा झालेली नाही. मात्र या घटनेची सखोल चौकशी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी पोलीस प्रशासनाला दिले.



बुधवार, १३ रोजी रात्री शहरातून जाणाऱ्या महामार्गावर खोटे नगर उड्डाणपुलावर रात्री उशिरा १०८ या रुग्णवाहिकेला आग लागली. त्यानंतर ऑक्सिजन सिलिंडरचा स्फोट होऊन आगीचे भीषण तांडव झाले. जळगाव मनपाच्या अग्निशमन विभागाच्या बंबांच्या पथकाने ही आग विझविली. तत्परतेने रुग्णवाहिकेतील रुग्णांना खाजगी वाहनाने रुग्णालयात हलविण्यात आले. सुदैवाने कोणालाही इजा अथवा दुखापत झालेली नाही. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी तत्काळ याची माहिती घेतली. तसेच या घटनेच्या सखोल चौकशीचे आदेश पोलीस प्रशासनाला दिले. त्यानुसार पोलिसांनी रुग्णवाहिकेच्या आगी संबंधीची माहिती घेण्याच्या आणि तपास कामाला सुरुवात केली आहे, असे सूत्रांकडून आज सांगण्यात आले. ही रुग्णवाहिका फोर्स या कंपनीकडून बनविलेली आहे. फोर्स मोटरची टीम ही जळगावकडे रवाना झाली आहे. हे पथक परिवहन तसेच पोलीस प्रशासनाला तपासकामी सहकार्य करेल. १०८ क्रमांक रुग्णवाहिका व्यवस्थापनालाही पाचारण करण्यात आले आहे. पोलिसांना तपासात सर्वांनी आवश्यक ती मदत करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी संबंधितांना दिले आहेत.

**रुग्णवाहिका उपलब्धतेचे आदेश**

या रुग्णवाहिकेऐवजी इतर जिल्ह्यातून दुसरी रुग्णवाहिका रुग्णसेवेसाठी उपलब्ध करून देण्याची सूचना आरोग्य विभागाला जिल्हाधिकाऱ्यांनी केली आहे. ज्यामुळे जळगाव जिल्ह्यामध्ये रुग्णवाहिकांचे प्रमाण पुरेसे राहील आणि जळगाव जिल्ह्यात रुग्णवाहिकेची कमतरता भासणार नाही. त्यानुसार पर्यायी रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात येत आहे. घटनास्थळावर अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, उपविभागीय पोलीस अधिकारी संदीप गावित, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी लोही यांनी भेटी दिल्या. संपूर्ण घटनेवर जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, लक्ष ठेवून असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले.

### ऑक्सिजन सिलिंडरचा एक स्फोट

रुग्णवाहिकेतून प्रसूत झालेली महिला आणि तिचे नवजात बाळ यांना जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात बुधवार, १३ रोजी रात्री आणले जात होते. या दरम्यान खोटेनगर उड्डाणपुलावर या रुग्णवाहिकेत स्पार्किंग झाल्याने वाहनाला आग लागली. त्यातील एका ऑक्सिजन सिलिंडरचा स्फोट झाला. रुग्णवाहिका चालक राहुल सुकलाल पाटील हे वाहन चालवित असताना त्यांच्या पायाजवळ ठिणगी पडली. त्यांनी तत्काळ वाहन थांबवून रुग्ण महिला मनीषा सोनवणे व त्यांच्या मातोश्री तसेच डॉ. रफिक अन्सारी, डॉ. गिरीश पाटील यांना चालकाने वाहनातून उतरविले. वाहनातील ऑक्सिजन सिलिंडर बाहेर काढले. त्यानंतर दुसऱ्या सिलिंडरचा प्रचंड आवाज होऊन मोठा स्फोट झाला. स्फोटानंतर आगीचे तांडव सुरू झाले. हळूहळू आगीने रौद्ररुप धारण केले. या आगीत सिलिंडरचे तुकडे होऊन ते परिसरात उडाले. रुग्णवाहिकेचा सापळा झाला. या भीषण घटनेत सुदैवाने प्राणहानी टळली, मात्र थरकाप उडविणाऱ्या या स्फोटाने अनेक घरांच्या खिडक्यांच्या काचा तडकल्या. अनेक घरे हादरली. आवाजाने अनेक नागरिक भयभीत झाले.

# झेडपीतील अधिकाऱ्याकडून व्होट जिहादचा प्रयत्न

**जनजागृती की फतवा** : पत्र व्हायरल; सीईओंकडून पत्र चुकीचे असल्याची सारवासारव

**जळगाव** : सध्या शासकीय यंत्रणांमार्फत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जनजागृती केली जात आहे. मात्र शासनाच्या जनजागृतीपर कार्यक्रमाच्या माध्यमातून जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाकडून उर्दू शाळेच्या मुख्याध्यापकांना पत्र पाठविण्यात आले. जनजागृतीच्या नावाने पाठविण्यात आलेल्या या पत्रात मदरशामध्ये जाऊन जागृती करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.




जिल्हा परिषदेतून

महिला मदरशांमध्ये महिला शिक्षकांना पाठवून जनजागृती करणे, शुक्रवारी नमाजाच्या दिवशी धर्मगुरूमार्फत जनजागृती करणे यासंदर्भात तारखेनिहाय उल्लेख केलेला आहे. त्यामुळे नेमकी ही मतदान जनजागृती की फतवा होता याबाबत जिल्हाभरात या पत्राची चर्चा आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी यांच्या नावाने हे पत्र काढण्यात आले आहे. पत्र काढण्यात आल्यानंतर लागलीच त्यावर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक यांनी तातडीने त्याच दिवशी पत्र काढत खुलासा केला आहे. यातील माहिती चुकीची असून त्यावर कोणतीही कार्यवाही करू नये. सदर पत्र रद्द करण्यात आल्याचे सीईओंनी पत्रात स्पष्ट केले आहे.

### उपशिक्षणाधिकाऱ्यांना नोटीस : सीईओ

माध्यमिक शिक्षण विभागातील उपशिक्षणाधिकारी पठाण यांनी हे पत्र तयार केले असून स्वीप नोडल अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय असे पत्र निवडणुकीच्या कोणत्याही कार्यक्रमांबाबत दिले जात नाही. स्वीप नोडल अधिकारी म्हणून जि.प.त मी कार्यरत आहे. मात्र माझ्या परवानगीशिवाय परस्पर हे पत्र माध्यमिक उपशिक्षणाधिकारी यांनी काढले. संबंधित उपशिक्षणाधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा स्वीप नोडल अधिकारी श्रीअंकित यांनी सांगितले.



माध्यमिक शिक्षण विभागाचे पत्र



जि.प. सीईओंचे पत्र रद्दचे आदेश





# जगत्‌गुरू श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या पादुका दर्शन सोहळ्याला भाविकांची अलोट गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १४ नोव्हेंबर**

तुम्ही जगा, दुसऱ्याला जगवा असा मंत्र देणारे जगत्‌गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज दक्षिण पीठ, नाणीजधाम (रत्नागिरी) यांच्या पादुका जळगावात दाखल झाल्या असून त्यांच्या दर्शनासाठी गुरुवार, १४ रोजी येथील एमआयडीसीतील आदित्य फार्म या ठिकाणी जिल्ह्यातील असंख्य भाविकांची उपस्थिती होती. तत्पूर्वी सकाळी पादुकांची मिरवणूक काढण्यात आली.

वासदा (नवसारी) येथून निघालेल्या पालखीचे शिरपूर (जि. धुळे) येथे आगमन झाले. बुधवार, १३ रोजी रात्री ८.३० वाजता पालखी जळगाव शहरात दाखल झाली. औरंगाबाद महामार्गावर येथील एमआयडीसीत आदित्य फार्म येथे विशाल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या ठिकाणी भव्य मंडप उभारण्यात आला होता. जळगाव जिल्ह्यातील महिला, पुरुष भाविकांची येथे सकाळपासून दर्शनासाठी रीघ लागली होती. सकाळी पालखी मिरवणुकीचे आयोजनस्थळी आगमन झाल्यानंतर गुरुपूजन मंत्रोच्चारास सुरुवात झाली. त्यानंतर दुपारी उपासक यांना दीक्षा देण्याचा कार्यक्रम झाला. भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले होते. येथून पालखीचे नाणीज (रत्नागिरी) कडे प्रस्थान झाले.

असंख्य सेवेकरी भाविकांना सुविधा देण्यासाठी सेवेत व्यस्त होते. वाहन पार्किंग, पिण्याचे पाणी, महाप्रसाद तसेच भाविकांना बसण्यासाठी हे सेवेकरी व्यवस्था करून देत होते. अतिशय शिस्तीने हा धार्मिक सोहळा पार पडला. स्वरूप संप्रदाय व जळगाव जिल्ह्यातील भाविकांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले होते.

### डिसेंबरमध्ये दर्शन सोहळा

पुढच्या महिन्यात ९ आणि १० डिसेंबर रोजी समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. जगत्‌गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थान उपपीठ श्रीक्षेत्र रामशेज, ता. दिंडोरी (जिल्हा नाशिक) येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# जोशीवाडा येथे दोन गटात झोंबाझोंबी; ११ जणांविरोधात पोलिसात गुन्हा

**जळगाव** : जोशीवाडा भागात १२ रोजी सार्वजनिक ठिकाणी दोन गटात मोठ्याने आरडाओरड झाली. झोंबाझोंबी करून आपआपसात मारामारी केली. तसेच सार्वजनिक शांततेचा भंग केला, असा गुन्हा दोन्ही गटातील ११ जणांविरोधात बुधवार, १३ रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल झाला.

मंगळवार, १२ रोजी जोशी वाड्यामध्ये मुलांनी लहान रथाची मिरवणूक काढली होती. फुले उधळताना पाकळी ओट्यावर पडल्याने जोशीवाडयात दगड भिरकाविल्याची घटना घडली. दरवाजा व पाण्याची टाकी फोडल्याचाही प्रकार झाला. मात्र या प्रकरणी कोणीही तक्रार दिली नाही. परिसरात सार्वजनिक जागेत झोंबाझोंबी, मारामारी व आरडाओरड केली म्हणून गोपाल कोळी (वय ४१), ज्योती कोळी (वय ३८), उज्ज्वला कोळी (वय ५५), महेंद्र कोळी (वय ३४), शोएब शेख (वय २२), अशपाक शेख (वय २३), चपटा, त्याची बहीण (वय २८) जुबेर शेख (वय २४), हकीम शेख (वय २०), सलमा किराणा मालक (वय ४९ ) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. तपास पो. ना. पंकज पाटील हे करीत आहेत.

# कार्तिकस्वामी मंदिरात कार्तिकी पौर्णिमेचे वेध : नवचंडी याग

**जळगाव**: येथील निवृत्तनगर-मधील केरळी महिला ट्रस्ट संचलित कार्तिक स्वामी मंदिरात कार्तिकी पौर्णिमेचे वेध लागले असून नवग्रह मंदिरात नवचंडी याग भक्तिभावात पार पडला.

नवचंडी पूजा विधी दरम्यान देवीच्या नऊ रूपांची पूजा केली जाते. नवचंडी यज्ञ हा एक उपासना प्रकार आहे. हा यज्ञ शत्रू आणि अशुभ ग्रहांचे परिणाम नाहीसे करतो. या यज्ञाला शरण जाऊन मनुष्य यश मिळवू शकतो. त्यातून मोक्षही मिळतो. याशिवाय अशुभ ग्रहांचे सर्व प्रकारचे वाईट प्रभाव दूर होतात. तसेच या उपासनेतून



मन, शरीर आणि आत्मा यांची शुद्धता येते. ते आत्मा शुद्ध करते आणि शांत करते. वेदांच्या घोषात भक्तिभावात हा नवचंडी याग झाला. यावेळी केरळी महिला ट्रस्ट पदाधिकारी, सदस्य आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बसचा धक्का लागून प्रवाशाचा मृत्यू

**जळगाव** : चालक रिव्हर्स घेत संबंधित ठिकाणी लावत असताना प्रवाशाला पाठीमागून एस.टी. बसचा धक्का लागल्याने प्रवाशाचा मृत्यू झाला. ही घटना गुरुवार, १४ रोजी दुपारी येथील नवीन बसस्थानकात घडली. अरुण रघुनाथ पारधी (वय ४६, रा. धानोरा) असे मृताचे नाव आहे.

अरुण पारधी हे खोबरे, खारीक तसेच मधाची विक्री करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. सकाळी मध घेऊन ते जळगाव शहरात मधाची विक्री करत होते.दुपारी दोन वाजेच्या सुमारास धानोरा येथे घरी जाण्यासाठी ते बसस्थानकावर बसच्या प्रतीक्षेत उभे होते. दरम्यान बाहेरून आगारात एस.टी. बस आली. ती संबंधित प्लॅटफॉर्मवर लावण्यासाठी चालक बस मागे घेत होते. स्थानकाकडे तोंड करून उभे असलेले अरुण पारधी यांना पाठीमागून बसचा अचानक धक्का लागल्याने ते कोसळले. हा प्रकार पाहिल्यानंतर मयूर पाटील तसेच त्याचा महाविद्यालयीन तरुण अशा दोघांनी वाहनात टाकून अत्यवस्थ अरुण पारधी यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात हलविले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती पारधी यांना मृत घोषित केले. मृत्यू झाल्याचे कळाल्याने कुटुंबातील सदस्यांसह नातेवाईक शोकमग्न झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मोठा मुलगा सचिन (वय २१) लहान मुलगा ( १८) असून ते अविवाहित आहेत.

# व्यवस्थेचा बोजवारा... गॅस पंप सुविधेचा शहरात अभाव

## अवैध रिफिलिंग सेंटर्स घडलेल्या परिस्थितीला कारणीभूत

**आर.आर. पाटील**

**जळगाव** : गॅसकिट बसविण्याला परवानगी दिली. त्यानंतर वाहनमालकांनी गॅस प्रणालीची वाहने कार्यान्वित केली. या वाहनांमध्ये गॅस भरण्याची व्यवस्था कार्यरत ठेवण्याची जबाबदारी यंत्रणेची होती. राज्यात अनेक शहरांमध्ये गॅस पंपांची सोय उपलब्ध आहे. जळगाव शहरात मात्र एकही गॅस पंप सुरू नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. व्यवस्थेतील या उणिवेकडे कानाडोळा करता येणार नाही.

शहरात कोर्ट चौकाकडून गणेश कॉलनीकडे जाणाऱ्या मार्गावर एचपीच्या पंपावर गॅस पंप होता. मात्र वर्षभरापासून हा पंप बंद आहे. कुसुंब्यांपासून पुढे औरंगाबाद मार्गावरील गॅस पंप गेल्या अनेक महिन्यांपासून बंदच आहे. सद्यस्थितीला नशिराबाद येथे गॅस पंप असून त्या ठिकाणी वाहनात गॅस भरला जात आहे. त्याठिकाणी वाहनांच्या रांगा असतात. जळगाव शहरात वाहनांमध्ये गॅस भरण्यासाठी पंपच नाही, हे वास्तव आहे. व्यवस्थेतील या अभावाने अवैध रिफिलिंग सेंटरकडे वाहनधारक धाव घेऊ लागले असल्याचे चित्र समोर आले आहे.. वर्षभरापूर्वी शहरात एचपीचा गॅस पंप कार्यान्वित होता. तसेच कुसुंब्यानजीकच्या गॅस पंपावरही वाहनांमध्ये गॅस भरण्याची सुविधा कार्यान्वित होती. मात्र कालांतराने हे दोन्ही पंप बंद पडले. त्यानंतर शहरात गॅस भरण्याची अधिकृत अशी सोयच राहिली नाही. गॅस पंप बंद पडण्यामागची कारणे काहीही असोत. मात्र वाहनांना पर्यायी गॅस पुरवठा करण्याची अधिकृत यंत्रणा शहरात नसल्याने वाहनधारकांची गैरसोय झाली. यातून अवैधरीत्या गॅस सेंटरही बोकाळले.

यंत्रणेतील उणिवा, दुर्लक्ष, व्यवस्थेचा अभाव अशा कारणांनी रिफिलिंग सेंटरला बळ मिळाले आणि गॅस वाहनधारकांच्या गरजेची पूर्ती होऊ लागली. गॅस वाहनांसाठी शहरात अधिकृत गॅस पंप व्यवस्था कार्यान्वित करणे, ही काळाची गरज आहे. यंत्रणेने यासाठी कार्यतत्परतेने उपाययोजना करणे आवश्यक आहे. या कृतीतून अवैध रिफिलिंग सेंटर्सना पायबंद बसेल. वाहनधारकांनाही सुरक्षित गॅस भरण्याची सुविधा उपलब्ध होईल. तसेच अप्रिय अशा जीवित व आर्थिक हानीच्या दुर्घटना टाळण्यासही मदत होईल.

### उदरनिर्वाह वाहनावरच

नशिराबाद येथे गॅस पंप कार्यान्वित आहे, परंतु तो जळगाव शहरापासून लांब आहे. अनेक ऑटो रिक्षा, काही चारचाकी वाहनांना गॅसकिट बसवून घेतले आहे. अनेकांचा या वाहनांच्या चाकावर कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. वाहन चालविण्याशिवाय त्यांच्यासमोर पर्याय नाही, असे अनेक गॅस वाहनधारकांनी म्हणणे मांडले. वाहनांना ज्यापद्धतीने मान्यता दिली. त्यानुसार शहरात तंत्रशुद्ध पद्धतीने गॅस भरण्याचा पंपही उपलब्ध करून देणे ही यंत्रणेची जबाबदारी बनते. मात्र अशी व्यवस्था कायम कार्यरत ठेवण्यात प्रशासनाला स्वारस्य वाटले नाही, असा सूर गॅस वाहनधारकांनी लावला. ही गरज लक्षात घेऊन काही लोकांनी रिफिलिंग सेंटर सुरू करून धंदा मांडला. गॅस भरण्याची पर्यायी व्यवस्था त्यामुळे कार्यान्वित झाली. अशा अनधिकृत सेंटर्सना कोणतीही मान्यता नाही. ते गैर आहेत, हे माहीत असूनही गरजेतून वाहनधारक या सेंटरकडे जाऊ लागले. ही वेळ या वाहनधारकांवर कोणामुळे आली? याचा विचार होणे आवश्यक आहे.

### रिफिलिंग सेंटर्सला घरगुती सिलेंडरचा पुरवठा

शहरातील गॅस पंप बंद पडल्यामुळे वाहनांमध्ये गॅस भरण्याची समस्या वाहनधारकांसमोर निर्माण झालेली आहे. अनेक चालकांचा या वाहनाच्या माध्यमातून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो आहे. प्रामुख्याने या वाहनावर कुटुंबाची भिस्त असलेल्या चालक-मालकांवर बेरोजगार होण्याची आफत येण्याची भीती व्यक्त होऊ लागली. याचाच गैरफायदा म्हणा किंवा अवैध व्यवसाय म्हणा वा गरज म्हणून रिफिलिंग सेंटर्सकडे लोक वळू लागले. घरगुती गॅसमधून अवैधरीत्या वाहनात गॅस भरण्याची कृती समर्थनीय मुळीच नाही. रिफिलिंग सेंटर ही सुरक्षित अथवा वैधही नाहीत. मात्र या सेंटरर्सला यंत्रणेच्या माध्यमातूनच घरगुती सिलिंडरचा पुरवठा कोणत्या आधारावर होतो? हाही प्रश्न अनाकलनीय आहे.





# आयुर्वेद हा जगण्याचा सार - डॉ. केतकी पाटील

## डॉ. गुणवंतराव सरोदे आयुर्वेद महाविद्यालयात दीक्षारंभ सोहळा

**जळगाव** : आयुर्वेदाला तीन हजार वर्षांची परंपरा लाभली आहे. आयुर्वेदात सगळ्यांचे मिश्रण आहे. एकूणच आयुर्वेदामध्ये जगण्याचा सार असल्याचे मत गोदावरी फाऊंडेशनच्या संचालिका डॉ. केतकी पाटील यांनी व्यक्त केले.

गोदावरी फाऊंडेशन संचलित डॉ. गुणवंतराव सरोदे आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालय आणि रिसर्च सेंटरचा प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी दीक्षारंभ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या.

या वेळी व्यासपीठावर डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाचे संचालक डॉ. एन.एस. आर्विकर, वैद्यकीय रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रेमचंद पंडित, होमिओपॅथी महाविद्यालयाचे डीन डॉ. राकेशकुमार मिश्रा, आयुर्वेद महाविद्यालयाचे डीन डॉ. हर्षल बोरोले, वैद्यकीय महाविद्यालयाचे रजिस्ट्रार प्रमोद भिरूड आदी उपस्थित होते.

आयुर्वेद महाविद्यालयाचे डीन डॉ. हर्षल बोरोले यांनी महाविद्यालयाविषयीची माहिती उपस्थित विद्यार्थी आणि पालकांना दिली. सोहळ्याच्या प्रमुख पाहुण्या डॉ. केतकी पाटील पुढे म्हणाल्या की, शिस्त हा गोदावरी परिवाराचा पाया आहे. त्यामुळे पालकांनी जो विश्वास आमच्यावर दाखवून त्यांच्या पाल्यांसाठी याठिकाणी प्रवेश घेतला आहे तो विश्वास नक्कीच सार्थ ठरेल. प्रथम वर्षात प्रवेश घेतलेला प्रत्येक विद्यार्थी वैदिक आणि वैद्यकीय आयुष्य जगतील. विद्यार्थ्यांनी पदवी घेऊन पुणे, मुंबईकडे न जाता जिथे खरी गरज आहे, त्या ठिकाणी वैद्यकीय सेवा द्या. आयुर्वेद ही सामाजिक सेवेची पदवी असून आयुर्वेदातच जगण्याचा सार असल्याचे डॉ. केतकी पाटील यांनी स्पष्ट केले. यावेळी डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाचे संचालक डॉ. एन. एस. आर्विकर, वैद्यकीय रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रेमचंद पंडित, होमिओपॅथी महाविद्यालयाचे डीन डॉ. राकेशकुमार मिश्रा, रजीस्ट्रार प्रमोद भिरूड यांनीही मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी विशेष यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. सोहळ्याचे सूत्रसंचालन डॉ. कोमल खांडरे व डॉ. पालवी चौधरी यांनी केले. डॉ. मयूरी चौधरी यांनी धन्वंतरी स्तवन म्हटले.

या सोहळ्यासाठी डॉ. मुकेश चौधरी, डॉ. सुवर्णा खंगार, डॉ. धनके, डॉ. मिनल किनगे, रजीस्ट्रार नितीन पाटील, चेतन चौधरी, मोहीत येवले, जमीर तडवी, हेमंत जंजाळकर, संजय परिस्कर, तेजस राणे, मनोज पाटील यांनी सहकार्य केले.

## थोडक्यात महत्त्वाचे...



## केरळी महिला ट्रस्टच्या अयप्पा स्वामी मंदिरात आजपासून कार्तिक पौर्णिमा उत्सव

**जळगाव** : येथील निवृत्तीनगरातील केरळी महिला ट्रस्टच्या अयप्पा स्वामी मंदिरात कार्तिक पौर्णिमा उत्सवास शुक्रवार, १५ नोव्हेंबरपासून प्रारंभ होत आहे. १५ रोजी सकाळी १०.३० वाजता मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात येईल. १६ रोजी सकाळी ७.३० पर्यंत दर्शन घेता येणार आहे. उत्तर महाराष्ट्रात जळगावातील केरळी महिला ट्रस्टच्या या मंदिराची प्राणप्रतिष्ठा शास्त्रोक्त पद्धतीने केली असून पौर्णिमेचा हा मुहूर्तदेखील केरळातील गुरुजींशी बोलून शास्त्रोक्त पद्धतीने काढला जातो, हे या मंदिराचे वैशिष्ट्य आहे. गेल्या अनेक वर्षांपासून हा उत्सव केरळी महिला ट्रस्ट जळगावात निवृत्तीनगरातील अयप्पा स्वामी मंदिरात साजरा करीत असतात. या वर्षी १५ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० ते १६ नोव्हेंबर सकाळी ७.३० पर्यंत पौर्णिमा आणि कृतिका नक्षत्र असून शुभ मुहूर्त १५ नोव्हेंबर रोजी दु. ४.१९ ते १६ रोजी पहाटे २.५९ असा आहे. तर कृतिका नक्षत्राची वेळ पहाटे २.५९ वा. सुरू होऊन १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ७.३० वाजता समाप्त होईल, असे ट्रस्टमार्फत कळवण्यात आले आहे. जास्तीत जास्त भाविकांनी दर्शन घ्यावे, असे आवाहन केरळी महिला ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी केरळी महिला ट्रस्ट संस्थापक अध्यक्ष वासंती अयर यांच्याशी ९४०५१४३२३५ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## ओम शांतीनगरातील शिवशंकर मंदिरात आजच्या शुभ मुहुर्तावर होणार षडानंदाचे दर्शन

**जळगाव** : येथील गुजराल पेट्रोल पंपासमोरील ओम शांतीनगरात शिवशंकर मंदिराच्या प्रांगणात असलेल्या सर्वांत जुन्या षडानंदाचे (कार्तिक स्वामी) मंदिरात कार्तिक पौर्णिमा शुक्रवार, १५ नोव्हेंबर रोजी शुभमुहुर्तावर रात्री ९.५५ ते पहाटे २.५८ या वेळेत दर्शनाचा लाभ घेता येणार आहे. कारण याच वेळेत पौर्णिमा व कृतिका नक्षत्राचा संयोग आहे. स्त्रियांना लाभदायी ठरण्यासाठी मंदिर व्यवस्थापनाने याच वेळेत मंदिर खुले ठेवून सपत्नीक दर्शन घेता येणार आहे. मंदिर स्थापनेपासून कार्तिक पौर्णिमा व कृतिका नक्षत्राच्या संयोग असलेल्या शुभ मुहुर्तावर सपत्नीक दर्शन देण्याची प्रथा आहे. याचा सर्व भाविकांनी लाभ घ्यावा, असे मंदिर व्यवस्थापनातर्फे कळविण्यात आले आहे.

## डॉ. आचार्य विद्यालयात बालदिन साजरा

**जळगाव** : डॉ. अविनाश आचार्य विद्यालय प्राथमिक विभागात १४ नोव्हेंबर रोजी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती बालदिन म्हणून साजरी करण्यात आली. मुख्याध्यापिका योगिता शिंपी व समन्वयिका सीमा पाटील यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन केले. मनीषा पाटील यांनी बालदिनाची माहिती सांगितली. रंजना बाभुळके यांनी बालगीत सादर केले. बालदिनाचे औचित्य साधून मुलांना दुपारी बालचित्रपट दाखवण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमात सहभागी होऊन व वेगवेगळे खेळ खेळून बालदिन आनंदाने व उत्साहाने साजरा केला. सूत्रसंचालन छोटू पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन कार्यक्रमप्रमुख मनीषा पाटील, छोटू पाटील, तुषार पुराणिक व पूर्वजा चौधरी यांनी केले. यशस्वितेसाठी मुख्याध्यापिका योगिता शिंपी यांनी मार्गदर्शन केले. सर्व शिक्षक व शिक्षकेतर बंधू-भगिनींनी सहकार्य केले.




## लिग्रॅण्ड कंपनीत मतदानाबाबत जनजागृती

**जळगाव** : मतदानाचा टक्का वाढावा यासाठी जळगाव शहरासह जिल्ह्यात शासकीय यंत्रणेमार्फत मार्फत तसेच विविध सेवाभावी संस्थांमार्फत मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे. जळगाव औद्योगिक वसाहतीतील लिग्रॅण्ड कंपनीत मतदान जनजागृतीनिमित्त शपथ घेण्यात आली. जळगाव जिल्हा विधानसभा मतदारसंघांमध्ये २०२४ च्या निवडणुकीसाठी मतदान जनजागृती आयकॉन मदन लाठी यांनी मतदानाचे महत्त्व सांगून त्याच बरोबर मतदानाची शपथ सर्व अधिकारी, कामगार यांना दिली. सर्व सहकाऱ्यांनी आपण आपला मतदानाचा हक्क बजावू आणि त्याच बरोबर आपापल्या परिसरात जनजागृती करू अशी शपथ घेतली. या वेळी कंपनीचे युनिट हेड रवींद्र गजभिये, मानव संसाधन विभागाचे समीर दाभाडकर आणि सर्व व्यवस्थापक, विभागातील अधिकारी, कर्मचारी, कामगार वर्ग उपस्थित होते.



## प्रगती शाळेत विविध उपक्रमातून मतदानाबाबत केली जनजागृती

**जळगाव** : मतदान टक्का वाढावा या दृष्टिकोनातून शासनामार्फत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. त्यातील एक उपक्रम म्हणून प्रगती विद्यामंदिर व प्रगती माध्यमिक शाळेत मतदार जनजागृतीपर उपक्रम घेण्यात आले. यात मानवी साखळी, रांगोळी, पालक संकल्प पत्र अशा उपक्रमांचा समावेश करण्यात आला. मतदानाविषयी जनमानसात जनजागृती व्हावी यासाठी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध रांगोळ्यांमध्ये घोषणांचा वापर केला. 'ना जातीवर ना धर्मावर, मतदान करा कार्यावर' अशा विविध घोषणा रांगोळ्यात लिहिल्या होत्या. जनमानसात मतदानाविषयी जागृतता व्हावी या हेतूने उपक्रम हाती घेतले जात आहेत. मतदान जनजागृतीपर उपक्रमासाठी विद्यावर्धिनी शिक्षण संस्थेचे चेअरमन प्रेमचंद ओसवाल, अध्यक्षा मंगला दुनाखे, सचिव सचिन दुनाखे, मुख्याध्यापक मनीषा पाटील, संगीता गोहील, ज्योती कुलकर्णी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## महाराणा प्रताप विद्यालयात बालदिन

**जळगाव** : महाराणा प्रताप माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त बालदिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक डी. बी. सोनवणे होते. प्रास्ताविक समिधा सोनी यांनी तर आभार जयश्री मोरे यांनी मानले. पर्यवेक्षक सी. एस. चौधरी, ज्युनिअर कॉलेज इंचार्ज संजय पाटील यांनी विचार मांडले.







# मायादेवी मंदिराजवळ व्हॉल्व्हला लागली गळती

### भाऊंच्या उद्यानाजवळील व्हॉल्व्हच्या दुरुस्तीच्या कामास सुरवात, निघाल्या चार गळत्या, पुढील पाणीपुरवठ्याबाबत संभ्रमच

**जळगाव** : महाबळ रोडवरील मायादेवी मंदिराजवळील मुख्य रस्त्यांवर असलेल्या अमृत योजनेच्या मुख्य जलवाहिनीच्या व्हॉल्व्हला गळती लागली आहे. यामुळे छत्रपती संभाजी राजे नाट्यगृहाकडे जाणाऱ्या रस्त्यावरून पाणी वाहत होते. यात हजारो लीटर पेयजल वाहून गेले.

दरम्यान भाऊंच्या उद्यानाजवळील अमृत योजनेच्या व्हॉल्व्हसह जलवाहिनीला लागलेल्या गळतीच्या दुरुस्तीच्या कामास सुरवात करण्यात आली आहे.

**मायादेवी मंदिराजवळ लागली गळती**

मायादेवी मंदिराजवळील मुख्य रस्त्यावर असलेल्या अमृत योजनेच्या व्हॉल्व्हसह जलवाहिनीला गळती लागली आहे. व्हॉल्व्हमधून उकळीप्रमाणे पाणी वेगाने बाहेर येत छत्रपती संभाजी राजे नाट्यगृहाकडे जाणाऱ्या रस्त्यावरून वाहत होते.

**भाऊंच्या उद्यानाजवळ दुरुस्ती**

भाऊंच्या उद्यानाजवळ असलेल्या महापालिकेच्या अग्निशमन कार्यालयासमोर अमृतच्या मुख्य जलवाहिनीच्या व्हॉल्व्हला गेल्या पाच महिन्यांपासून गळती लागली होती. व्हॉल्व्ह व फुटलेल्या जलवाहिनीच्या दुरुस्तीसाठीचे साहित्य महापालिकेकडे उपलब्ध नव्हते. त्यामुळे ते बाहेरून मागवण्यात आले. हे साहित्य आल्यानंतर मंगळवार, १२ रोजी दुपारून या गळतीच्या दुरुस्तीच्या कामास सुरवात झाली. त्यासाठी नव्याने डांबरीकरण केलेला रस्ता खोदून मोठे खड्डे तयार करण्यात आले आहेत. गळतीमुळे आता या खड्ड्यात पाणी साचले आहे. हे पाणी उपसून दुरुस्ती करण्यात येणार आहे. या कामास दोन दिवस लागण्याची शक्यता आहे.

**मंजुरी एका गळतीची निघाल्यात ४ गळत्या**

याबाबत पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता योगेश बोरोले यांच्याशी संपर्क साधला असता भाऊंच्या उद्यानाजवळील एका गळतीच्या दुरुस्तीसाठी मंजुरी घेण्यात आली. त्यानुसार कामास सुरवात केली असता तेथे अजून तीन गळत्या आढळल्यात. त्यांच्याही दुरुस्तीसाठी मंजुरी घेऊन साहित्य आणणार आहोत, असे ते म्हणाले.

**अवेळी पाणीपुरवठा**

मंगळवारी व्हॉल्व्हच्या दुरुस्तीसाठी रस्त्यात मोठा खड्डा खोदण्यात आला. त्यामुळे रात्री सातच्या सुमारास महाबळसह परिसरात अचानकपणे पाणीपुरवठा करण्यात आला. अर्धा पाऊण तासानंतर तो बंद झाला. पूर्वीच्या रोटेशननुसार महाबळ व परिसरात बुधवारी सकाळी पाणी येणार होते. परंतु मंगळवारी रात्री अचानकपणे पाणी सोडल्याने बुधवारी नियोजनानुसार पाणीपुरवठा झाला नाही. गुरुवारी एक दिवस पुढे ढकललेल्या नियोजनानुसार शनिवारी पाणी येणार होते. मात्र गुरुवार, १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता अचानकपणे पाणी आले. अर्धा ते पाऊण तासात हा पुरवठा बंद झाला.

**शनिवार, रविवारच्या पाणीपुरवठ्याबाबत संभ्रम**

मंगळवारी सायंकाळी व गुरुवारी सकाळी अर्धा ते पाऊणतास नियोजनाव्यतिरिक्त पाणीपुरवठा झाल्याने पूर्वनियोजनानुसार पाणीपुरवठा होणार की, पुन्हा एक दिवसाने पुढे ढकलला जाणार? याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. पूर्वनियोजनानुसार महाबळ परिसरात बुधवारी पाणी येणार होते. परंतु ते आले नाही. मंगळवारच्या सायंकाळच्या पाण्याचा दिवस धरला तर शुक्रवारी पाणी येईल असे गृहीत धरले होते. मात्र गुरुवार, १४ रोजी अचानकपणे अर्धा ते पाऊण तास पाणी आल्याने दोन दिवसाआडच्या नियोजनानुसार आता रविवार, १७ नोव्हेंबरला पाणी येईल, असे नागरिकांनी गृहीत धरले आहे. भाऊंच्या उद्यानासह मायादेवी मंदिराजवळील गळत्या दुरुस्तीचे काम सुरू आहे. हे काम जेव्हा पूर्ण होईल त्यानंतरच पुढील पाणीपुरवठ्याचे नियोजन करता येणार असल्याने तूर्तास शनिवार व रविवारच्या पाणीपुरवठ्याबाबत संभ्रम कायम आहे.

## बहिणाबाई प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात बालदिन

**जळगाव** : येथील बहिणाबाई माध्यमिक विद्यालयात १४ नोव्हेंबर रोजी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांचा जन्मदिवस बालदिन म्हणून साजरा करण्यात आला.

याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ. विलास नारखेडे यांनी नेहरूंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. त्यांनी विद्यार्थ्यांना नेहरूंच्या जीवनकार्याविषयी माहिती सांगितली. तसेच बालदिन साजरा का करतात? याविषयीची माहिती दिली.

याप्रसंगी विद्यालयाच्या समन्वयक प्रतिभा खडके, प्राथमिकचे मुख्याध्यापक राम महाजन, स्वाती कोल्हे, सीमा चौधरी, डॉ. प्रतिभा राणे, वैशाली पाटील, संतोष पाटील, राजेश वाणी, दिनेश चौधरी, विशाल पाटील, शंकर चव्हाण, चंद्रकांत पाटील, पद्माकर चौधरी, जगदीश नेहते, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## के. सी. ई. सोसायटीच्या कॉलेज ऑफ इंजिनीयरिंगच्या पॉलिटेक्निक विभागात व्याख्यान

**जळगाव** : के. सी. ई. सोसायटीचे कॉलेज ऑफ इंजिनीयरिंग महाविद्यालयात पॉलिटेक्निक इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक अभियांत्रिकी विभागात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

प्राचार्य डॉ. एस. आर. सुगंधी, डिप्लोमा समन्वयक डॉ. सी. एस. पाटील, पॉलिटेक्निकच्या विभाग प्रमुख अर्चना शेवाळे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. प्रमुख वक्ते म्हणून इलेक्ट्रोसॉफ्ट सिस्टमचे सीईओ राजेश ठाकरे होते. सत्राची औपचारिक ओळख एल. एल. पाटील यांनी करून दिली. इलेक्ट्रोसॉफ्टचे सीईओ राजेश ठाकरे यांनी व्याख्यानात इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक अभियांत्रिकीद्वारा आयोजित इमर्जिंग टेक्नॉलॉजीज आणि करिअरच्या संधी उपलब्ध आहेत.

आगामी काळात उद्योग आणि अर्थव्यवस्थांना आकार देणाऱ्या



महत्त्वाच्या उदयोन्मुख तंत्रज्ञानावर प्रकाश टाकत त्यांनी स्पष्ट केले की, हे तंत्रज्ञान केवळ व्यवसाय कसे चालवतात, ते बदलत नाही, तर विविध क्षेत्रांमध्ये करिअरच्या नवीन संधी आणि कौशल्याची आवश्यकता देखील निर्माण करत आहेत. ऑटोमेशन, डेटा ॲनालिटिक्स प्रेडिक्टिव मॉडेलिंग आणि वैयक्तिक सेवा यांसारख्या क्षेत्रात नावीन्य कसे आणत आहेत, याची माहिती दिली.

भाषणाच्या दुसऱ्या भागात ठाकरे यांनी उदयोन्मुख करिअरच्या वाढत्या संधींवर लक्ष केंद्रित केले. तंत्रज्ञान या तांत्रिक प्रगतीमुळे विकसित होत असलेल्या जेब मार्केटमध्ये कसे तयार व्हावे आणि त्याची भरभराट कशी करावी, याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

कामिनी पवार यांनी आभार मानले. कार्यक्रम समन्वयक प्रा. दीक्षा के. अहिराने या होत्या.



## डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात बालदिवस साजरा

**जळगाव** : भारतीय संस्कृती विविधतेने सजली असून भावी वैद्यकिय तज्ज्ञांनी या संस्कृतीचे जतन करत असून १४ नोव्हेंबर रोजी बालदिवस उत्सहात साजरा करण्यात आला.


यावेळी बालरोग विभागात दाखल झालेले रूग्ण व त्यांच्या नातेवाईकासह बालरोग तज्ञ विभागप्रमुख डॉ. अनंत बेंडाळे, डॉ उमाकांत अणेकर, डॉ. सुयोग तन्नीरवार डॉ. भारती झोपे, डॉ. चंदाराणी, डॉ. ओमश्री गुडे, डॉ. कुशल धांडे, हिरामण लांडगे, यांचेसह बालरूग्ण व नातेवाईक म ोठया उत्साहाने सहभागी झाले होते.

यावेळी बालरोग वार्डमध्ये फ ुग्यांची आकर्षक सजावट केली होती.विविध मनोरंजनाचे खेळ व गाणी देखिल लावण्यात आली तसेच बालरूग्णांना खाऊ व भेटवस्तुचे वाटप करण्यात आले. यशस्वीतेसाठी बालरोग विभागाच्या कर्मचायांनी परिश्रम घेतले.

## कबचौउमविच्या दोघा खेळाडूंची भारतीय विद्यापीठ क्रिकेट संघात निवड

**जळगाव** : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे खेळाडू नचिकेत ठाकूर आणि तुषार चोरडीया या दोघांची भारतीय विद्यापीठाच्या क्रिकेट संघात निवड झाली आहे. २५ ते ६ डिसेंबर या कालावधीत मुंबई आणि भुवनेश्वर येथे ऑस्ट्रेलियन विद्यापीठ क्रिकेट संघाविरुद्ध होणाऱ्या मालिकेत ते सहभागी


नचिकेत ठाकूर


तुषार चोरडीया

होणार आहेत. भारतीय विद्यापीठ क्रिकेट संघात दोन खेळाडूंची निवड होण्याचा पाहिल्यांदाच मान कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला प्राप्त झाला आहे. या दोन्ही खेळाडूंचा प्रवास खर्च, प्रशिक्षण शिबिर व निवास, भोजन यासाठी येणारा एकूण १ लाख ७६ हजार रुपयांचा खर्च तातडीने कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी विद्यापीठामार्फत करण्यास मंजुरी दिली आहे.

नचिकेत ठाकूर हा रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा तर तुषार चोरडीया हा भुसावळच्या पी. ओ. नाहाटा महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे.

कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी या खेळाडूंसाठी प्रत्येकी ८८ हजार याप्रमाणे एकूण १ लाख ७६ रुपयांचा खर्च (प्रवास, शिबिर, निवास आदी) विद्यापीठामार्फत केला जाणार असल्याचे घोषित करून तातडीने या प्रस्तावाला मान्यता दिली. या दोन्ही क्रिकेटपटूंचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

## मनपाचे दुर्लक्ष : गोलाणीत साचले सांडपाण्याचे तळे

**जळगाव** : महापालिकेच्या आरोग्य विभागासह बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे गोलाणी मार्केटच्या तळमजल्यावर मैलायुक्त सांडपाण्याचे तळे साचले आहे. एकीकडे स्वच्छ सर्वेक्षणाचा गाजावाजा करणाऱ्या महापालिकेच्या इमारतीजवळ असलेल्या गोलाणीतील सांडपाण्याचा निचरा करता येत नाही. याकडे आता लक्ष देण्याची गरज आहे.




## राज्यस्तरीय इंद्रधनुष्य स्पर्धेत विद्यापीठाच्या संघाला दोन सुवर्ण पदके

**जळगाव** : अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात झालेल्या राज्यस्तरीय इंद्रधनुष्य सांस्कृतिक स्पर्धेत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संघाला क्ले मॉडेलिंग व इन्स्टॉलेशन या ललित कला प्रकारात दोन सुवर्ण पदके प्राप्त झाली.

७ ते ११ नोव्हेंबर या कालावधीत अकोला येथील कृषी विद्यापीठात २० व्या राज्यस्तरीय इंद्रधनुष्य सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या देवा सपकाळे या विद्यार्थ्याला क्ले मॉडेलिंग या कला प्रकारात सुवर्णपदक प्राप्त झाले. तर इन्स्टॉलेशनमध्ये तौशिफ शेख, गौरी चौधरी, कुणाल जाधव व समय चौधरी या विद्यार्थ्यांनी भाग घेऊन सुवर्णपदक प्राप्त केले.

ललित कला प्रकारातील हे सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थी जळगावच्या मूळजी जेठा महाविद्यालयाचे विद्यार्थी आहेत. या विद्यार्थ्यांना पीयूष बडगुजर व शशिकांत वडोदकर यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यापीठाच्या संघासोबत या स्पर्धेसाठी डॉ. मनोज पाटील व प्रा. सुचित्रा लोंढे हे संघ व्यवस्थापक म्हणून सहभागी होते.

सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थ्यांचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, केसीई सोसायटीचे अध्यक्ष प्रज्ञावंत नंदकुमार बेंडाळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी अभिनंदन केले आहे.

## जळगावच्या सी. ए. शाखेत 'जी.एस.टी. अभय योजने'वर चर्चासत्र

**जळगाव** : एस.जी.एस.टी. डिपार्टमेंट जळगाव व सी. ए. शाखा यांच्यातर्फे सी. ए. शाखेत 'जी. एस. टी. अभय योजना' या विषयावर चर्चासत्र झाले.




या चर्चासत्रासाठी स्टेट जी. एस. टी.चे अतिरिक्त कमिशनर राजेसाहेब माने, जळगाव जी. एस. टी. विभागाचे संयुक्त कमिशनर सुभाष भवर, नाशिक व जळगाव विभाग अपीलचे एस. पी. दानी, उपायुक्त एम. एल. पाटील हे प्रमुख वक्ते होते.

या वेळी जळगाव सी. ए. शाखेचे अध्यक्ष सी. ए. अभिषेक कोठारी, उपाध्यक्ष व सी. ए. विद्यार्थी शाखा अध्यक्ष सी. ए. हितेश आगीवाल, माजी अध्यक्षा सी. ए. ममता राजानी केजरीवाल, माजी अध्यक्ष सी. ए. विकी बिर्ला, जळगाव कर सल्लागार संघटनेचे माजी अध्यक्ष साहेबराव पाटील, जळगाव सी. ए. शाखेचे व जळगाव कर सल्लागार संघटनेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सी. ए. शाखेचे अध्यक्ष सी. ए. अभिषेक कोठारी यांनी चर्चासत्र आयोजित केल्याबद्दल जळगाव एस. जी. एस. टी. डिपार्टमेंटचे आभार व्यक्त करीत सनदी लेखापाल हे शासन व करदाते यांच्यामधील दुवा असल्याचे सांगितले.

राजेसाहेब माने व एस. पी. दानी यांनी जी. एस. टी. अभय योजना सुरू झाल्यानंतरचे राज्यामधील हे सर्वात पहिले सत्र असल्याचे सांगितले. जी. एस. टी. बाबत कुणाला काही मार्गदर्शन हवे असल्यास त्यांनी संघटनेशी संपर्क साधण्याचे आवाहन उपस्थित सर्व सभासदांना केले.

सुभाष भवर यांनी अभय योजनेची ठळक माहिती करून देत ही योजना लघु उद्योजक तसेच विवादित दायित्व तसेच जुने खटले संपवण्यासाठी फायदेशीर ठरणार आहे, असे नमूद केले.

एम. एल. पाटील यांनी अभय योजनेचे महत्त्व अधोरेखित करत योजनेचा लाभ घेण्यासंबंधी प्रक्रिया व कर भरण्यासंबंधी मार्गदर्शन केले. तसेच महाराष्ट्र शासनाच्या या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्यात यावा, असे आवाहन उपस्थितांना केले. चर्चासत्राचे सूत्रसंचालन श्वेता दीक्षित यांनी, तर आभार सी. ए. हितेश आगीवाल यांनी मानले.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### आशा स्वयंसेविकांना बालविवाहमुक्त भारताची शपथ

**पारोळा** : तालुक्यातील मंगरूळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आशा स्वयंसेविकांच्या बैठकीदरम्यान आधार बहुउद्देशीय संस्थेतर्फे बालविवाहमुक्त भारताची शपथ देण्यात आली. अमळनेर येथील आधार बहुउद्देशीय संस्थेद्वारा एक्सेस टू जस्टीस फॉर चिल्ड्रन्स प्रोजेक्टनुसार बालविवाहमुक्त भारत या विषयावर शपथ देण्यात आली. याप्रसंगी तालुका समन्वयक जीवन मोरे यांनी मार्गदर्शन केले. तालुका आशा समन्वयिका दीपश्री पाटील यांच्यासह तालुक्यातील आशा स्वयंसेविका उपस्थित होत्या.



### पारोळ्यात आदर्श विद्यालयात बालदिन उत्साहात

**पारोळा** : येथील न्यू पीपल्स एज्युकेशन सोसायटी संचलित आदर्श माध्यमिक विद्यालयात देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती बालदिन म्हणून उत्साहात झाली. या वेळी वरिष्ठ शिक्षक डी. बी. पाटील यांनी प्रतिमापूजन केले. त्यांनी पंडित नेहरू यांनी आधुनिक भारताच्या निर्मितीसाठी दिलेले योगदान विशद केले. हर्षवर्धन सूर्यवंशी यांनी सूत्रसंचालन केले. एस. आर. पाटील, सी. एम. पाटील, शैलेश पाटील, उमेश विसावे, एकनाथ राठोड, मनीषा वसावे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

### जिल्हा जातप्रमाणपत्र पडताळणी समितीमार्फत प्रलंबित प्रकरणे निकालासाठी विशेष मोहीम

**जळगाव** : कोणत्याही अभ्यासक्रमाचा प्रवेशित विद्यार्थी जातवैधता प्रमाणपत्राअभावी प्रवेशापासून वंचित राहू नये, यासाठी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीमार्फत प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी विद्यार्थ्यांना त्रुटी पूर्ततेसाठी व तयार असलेले जातवैधता प्रमाणपत्र संबंधित विद्यार्थ्यांना समितीस्तरावरून निर्गमित करण्यासाठी समितीस्तरावर विशेष मोहीम शिबिर घेण्यात येत असल्याचे एन. एस. रायते यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

अर्जदार विद्यार्थी-पालक यांनी त्रुटींची पूर्तता करण्यासाठी दर मंगळवारी व बुधवारी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून आपल्या जाती दावा प्रकरणातील त्रुटी पूर्तता करून आपला प्रस्ताव निकाली काढून घ्यावा. ज्या प्रकरणामध्ये विद्यार्थ्यांनी अधिनियम २००० मधील कलम ८ अन्वये जाती दावा सिद्ध केला आहे, अशा प्रकरणांमध्ये त्यांच्या जातीची पडताळणी होऊन वैधतेचा निर्णय घेऊन जातवैधता प्रमाणपत्र तयार झालेले आहेत. अशा विद्यार्थ्यांना त्यांचे जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यासाठी समितीकडून संबंधित मोबाईलवर एसएमएसद्वारे कळविण्यात आलेले आहे. विद्यार्थ्यांनी वा पालकांनी या शिबिर कालावधीत स्वतः किंवा वडील, आई तसेच रक्ताच्या नात्यातील सख्खा भाऊ, बहीण, काका यांनी त्यांचे स्वतःचे टोकन पावतीसह ओळखपत्र दाखवून कार्यालयीन वेळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, मायादेवी मंदिरासमोर महाबळ जळगाव कार्यालयात उपस्थित राहून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे, असे आवाहन रायते यांनी केले आहे.

### सारजाई कुडे, बालकवी विद्यालयात मतदान जनजागृती संकल्प पत्र लेखन



**धरणगाव** : येथील सारजाई दामोदर कुडे व बालकवी ठोंबरे विद्यालयात विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृतीसाठी संकल्प पत्राचे लेखन केले. नागरिकांनी जास्तीत जास्त आपला मतदानाचा अधिकार बजवावा म्हणून शाळेतील विद्यार्थ्यांनी संकल्प पत्राचे लेखन केले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक एस. एस. पाटील व मुख्याध्यापक जीवन पाटील तसेच शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना वाय. डी. चिंचोरे यांनी मार्गदर्शन केले.

### इंदिरा गांधी विद्यालय,आदर्श विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित जवाहरलाल नेहरू यांना अभिवादन



**धरणगाव** : इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने १४ नोव्हेंबर रोजी भारताचे पहिले पंतप्रधान स्व. पं. जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिवस अर्थात बालदिन साजरा करण्यात आला. पंडित नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे सचिव सी. के. पाटील यांनी केले. या प्रसंगी संचालक भरत पाटील, शाळेच्या मुख्याध्यापिका एस. एस. पाटील, पर्यवेक्षक ए. एस. पाटील, आदर्श विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीपकुमार सोनवणे, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक बळवंत पाटील, शशिकांत पाटील, सर्व युनिटचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी उपस्थित होते.

### स्वीपअंतर्गत रिल्सद्वारे युवकांमध्ये मतदान जनजागृती

**जळगाव** : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत जळगाव विधानसभा मतदारसंघात मतदानाचा टक्का वाढावा म्हणून मतदान जनजागृती स्वीप कार्यक्रमाअंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. यात रिल्सद्वारे युवकांमध्ये मतदान जनजागृती, फलक लेखन, शहरातील प्रमुख चौकात पथनाट्य, शाळा व वॉर्डावॉर्डात रांगोळी स्पर्धा, असे अनेकविध उपक्रम बीएलओ व आशा सेविकांच्या सहयोगातून राबविण्यात येत आहेत.

याशिवाय बीएलओ व आशा वर्कर प्रत्येक घरापर्यंत पोहचून मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करीत असून मतदार यादीचा क्युआर कोड राष्ट्रीयीकृत तसेच अन्य सर्व बँक व शासकीय कार्यालयांमध्ये लावण्यात आलेले आहेत. आकाशवाणी, एफएम रेडीओ, लोकल केबल नेटवर्क आदी विविध मीडियांमार्फत जनजागृतीचे कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. सध्याच्या सोशल मीडियाच्या युगात तरुणांना मतदानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी रिल्सद्वारे मतदान जनजागृती करण्यात येत आहे. रिल्स स्पर्धा, पथनाट्यद्वारे जनजागृती, वासुदेव व पोतराजद्वारे विविध ठिकाणी तसेच रथ उत्सवात मतदान जनजागृती करण्यात येत आहे. दरम्यान नागरिकांनी कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदानाचे कर्तव्य बजवावे, असे आवाहन मनपा प्रशासनातर्फे सर्व नागरिकांना करण्यात आले आहे.

# जिल्ह्यात सीसीआयअंतर्गत कापूस खरेदीस चालना

## पाचोरा, पारोळा केंद्रांत प्रथम नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांचा सत्कार



**जळगाव** : सीसीआय अर्थात केंद्र शासनांतर्गत जळगाव जिल्ह्यात ११ कापूस खरेदी केंद्रांना मान्यता देण्यात आली आहे. त्यात पाचोरा आणि पारोळा केंद्रांत प्रथम नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांचा सत्कार करीत कापसाची खरेदी सुरू करण्यात आली.

पाचोरा येथील सीसीआय आणि कृषी उत्पन्न बाजार समितीअंतर्गत शहरातील गजानन जिनिंग प्रेसिंगमध्ये प्रती क्विंटल ७,५२० रुपये हमीदरानुसार कापूस खरेदी सुरू करण्यात आली. बाजार समितीचे सचिव बी. बी. बोरुडे व गजानन जिनिंग-प्रेसिंगचे संचालक प्रमोद सोनार यांच्या हस्ते काटापूजन झाले. नोंदणी करीत कापूस विक्रीसाठी आणलेले अंतुर्ली येथील शेतकरी राहुल पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

या वर्षी पावसामुळे काही ठिकाणी कापूस उत्पादकांचे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांनी नावनोंदणी करून हमीभावाने कापूस विक्रीस आणावा, त्यांना शासकीय दरात नियमाप्रमाणे परतावा देण्यात येणार आहे. सीसीआयअंतर्गत कापूस खरेदी सुरू झाल्याने शेतकऱ्यांत समाधान व्यक्त केले जात असून, कापसाची प्रतवारी निश्चित करताना फसवणूक वा अडवणूक होऊ नये, असेही शेतकऱ्यांनी सांगितले.

**गुणवत्तेनुसार कापसाला ७,४७१ रुपये दर**

कापूस उत्पादनातील आर्द्रता ८ टक्के असावी, तसेच सर्वसाधारणपणे २९ ते २९.४९ मिलिमीटर धाग्याची लांबी, सोबतच त्याची गुणवत्ता तपासणीनुसार कापसाची खरेदी केली जाणार आहे. चांगल्या प्रतीच्या कापूस उत्पादनाला आर्द्रता व गुणवत्तेनुसार ७,४७१ रुपये असा दर दिला जाणार आहे. यात 'बन्नी' आणि 'ब्रह्मा' या वाणांसाठी ७,४७१ रुपये, तर एचफोर वाणासाठी ७,४२१ रुपये असे दर आहेत.

**वाहतूक खर्चाची सुविधा मिळावी**

दिवाळीनंतर उशिरा का होईना, सीसीआयअंतर्गत हमीदरात कापूस खरेदी सुरू झाली, हे महत्त्वाचे. शेतकऱ्यांच्या दाराशी येऊन व्यापाऱ्यांकडून कापसाची खरेदी केली जाते. त्यामुळे भराई व वाहतूक खर्चात बचत होत असल्याने व्यापाऱ्यांकडे कापूस देणे परवडते. कापसाचा अल्प पेरा असलेल्या शेतकऱ्यांना कापूस खरेदी केंद्रात नेणे वाहतुकीच्या दृष्टीने परवडत नसल्याने शासनाने वाहतूक सुविधा सवलत दिल्यास सोयीचे होईल, असे शेतकरी वर्गामधून बोलले जात आहे.

**ठरावीक आर्द्रता व स्वच्छ कापसाची खरेदी**

कापूस खरेदी केंद्रात आणताना कापूस स्वच्छ असावा, त्यात कवडी, पत्ता, काडीकचरा, झाडांच्या वाळलेल्या पानांचे अवशेष नसावेत. उत्पादनातील आर्द्रता ठरावीक प्रमाणापेक्षा जास्त नसावी. शेतकऱ्यांनी कापूस विक्रीसाठी आणण्यापूर्वी खरेदी केंद्रात नोंदणी करणे आवश्यक आहे.

**- इंद्रप्रकाश लोढा (ग्रेडर, सीसीआय, पारोळा)**

----------

**७,५०० पेक्षा अधिक दर मिळणे अपेक्षित**

परिसरात बऱ्याच शेतकऱ्यांच्या कापसाचे उत्पादन चांगल्या प्रतीचे असते; परंतु काडीकचरा न लागता वेचणी व साठवण करणे अशक्य असते. त्यात थोडाफार नगण्य प्रमाणात कचरा असू शकतो. त्यामुळे नोंदणीनुसार कापूस खरेदी केंद्रात आणल्यानंतर दर्जा ठरविताना शेतकऱ्यांची दिशाभूल वा लूट होऊ नये. ७,५०० रुपयांपेक्षा अधिक दर मिळणे अपेक्षित आहे.

**- विनायक पाटील (शेतकरी, पाचोरा)**

**शेतकऱ्यांनी नोंदणी करणे गरजेचे**

नोंदणी करतेवेळी कापसाचा पेरा नोंद असलेला आजच्या तारखेचा सातबारा उतारा, आधार कार्ड, आधार लिंक असलेले बँकेचे पासबुक आदींच्या झेरॉक्स प्रती, मोबाइल क्रमांकासह नोंदणी करावी, नोंदणीनुसार मोबाइलवर संदेश आल्यानंतर कापूस सीसीआय केंद्रात आणावा.

**-बी. बी. बोरुडे (सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, पाचोरा)**

**चांगल्या दर्जाच्या उत्पादनाला योग्य मोबदला**

केंद्र शासनांतर्गत कापसासाठी शासकीय हमीभाव प्रती क्विंटल ७,५२० रुपये आहे. कापसाची प्रत चांगल्या दर्जाची असल्यास निर्धारित केलेल्या दरानुसार शेतकऱ्यांना मोबदला मिळणार आहे.

**- अनंत फुंडकर, (सीसीआय अधिकारी)**



## राज्य गुणवंत कर्मचारी पुरस्काराने चोरवडचे दिलीप महाजन सन्मानित

**तभा वृत्तसेवा**
**पारोळा, १४ नोव्हेंबर**

शहरातील रहिवासी व चोरवड येथील श्री दत्त माध्यमिक विद्यालयाचे प्रयोगशाळा साहाय्यक दिलीप महाजन यांना राज्यस्तरीय गुणवंत कर्मचारी नागरी पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले.

महात्मा ज्योतिराव फुले शैक्षणिक परिषदेतर्फे राज्यस्तरीय शैक्षणिक गुणवंत कर्मचाऱ्यांचा सत्कार सोहळा शुक्रवारी नाशिक येथे नुकताच झाला. सोहळ्यात जिल्ह्यासह राज्यातून कर्मचारी सहभागी झाले होते. सोहळ्यात दिलीप महाजन यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याची दखल घेत प्रदेशाध्यक्ष व्यंकटराव जाधव, प्रदेश उपाध्यक्ष प्रा. डॉ. सखाराम वाघमारे, प्रदेश मुख्य कोषाध्यक्ष गजेंद्र कानडे, प्रदेश कार्याध्यक्ष तथा प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील, प्रदेश सचिव तथा प्राचार्य गोपीनाथ सगर आदींच्या हस्ते त्यांना राज्यस्तरीय गुणवंत कर्मचारी नागरी मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल सहजीवन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी खासदार वसंतराव मोरे, दूध संघाचे संचालक पराग मोरे, माजी नगरसेवक, बाजार समितीचे संचालक रोहन मोरे, मुख्याध्यापक विनोद पाटील यांच्यासह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दिलीप महाजन यांचा गौरव केला.

## बद्रिनारायण रथोत्सवात मोगरी लावणाऱ्यांना विमाकवच

### बहादरपूरमध्ये मनोजालय फाऊंडेशनचा स्तुत्य उपक्रम



**असे आहेत अपघाती विम्याचे फायदे**

विम्याचे एकूण नऊ फायदे असून, त्यात अपघाती मृत्यू झाल्यास संबंधितांच्या कुटुंबीयांना दहा लाख रुपये, कायमस्वरूपी अंधत्व किंवा अपंगत्व आल्यास दहा लाख रुपये, अपघातामुळे अंतर्गत रुग्ण दवाखाना खर्च कॅशलेस साठ हजार, अपघातामुळे बाह्यरुग्ण दवाखाना खर्च कॅशलेस ३० हजार रुपये, दवाखान्यात दाखल असेपर्यंत दररोज एक हजार रुपये दहा दिवसांपर्यंत, मुलांच्या शिक्षणाचा खर्च एक लाख रुपये, कुटुंबाला दवाखाना प्रवासखर्च २५ हजार रुपये, अंत्यसंस्कारासाठी लागणारा खर्च पाच हजार रुपये आदींचा लाभ मिळेल.

**तभा वृत्तसेवा**
**पारोळा, १४ नोव्हेंबर**

तालुक्यातील बहादरपूर येथील प्रतिबद्रिनाथ धाम असलेल्या तीर्थक्षेत्र श्री बद्रिनारायण संस्थानच्या रथोत्सव मिरवणुकीत मोगरी लावणाऱ्या श्री स्वयंसेवकांचा दहा लाखांचा अपघाती विमा गुरुवारी (१४ नोव्हेंबर) मनोजालय फाउंडेशनच्या माध्यमातून काढण्यात आला.

गेल्या अनेक वर्षांपासून शिरसोदे-बहादरपूर गावांसाठी सामाजिक जाणिवेतून विविध उपक्रम राबविणाऱ्या मनोजालय फाऊंडेशनने मोगरी लावणाऱ्या स्वयंसेवकांना विम्याचे कवच दिले. फाऊंडेशनचे कार्य कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार संस्थानचे अध्यक्ष नारायण मिश्रा यांनी काढले.

विम्याचे प्रमाणपत्र राज्य समन्वय अधिकारी प्रवीण सुतार यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. स्वयंसेवकांना विम्याचे कवच देऊन समाजाकडून उतराई होण्याचा हा छोटासा प्रयत्न असल्याचे प्रवीण सुतार यांनी याप्रसंगी सांगितले.

या वेळी संस्थानचे अध्यक्ष नारायण मिश्रा, विजय मिस्तरी, उपमुख्य ट्रस्टी गुलाब पाटील, जिजाबराव पाटील, नीलेश बागूल, उपप्राचार्य संजय भावसार, प्रा. योगेश चौधरी, डॉ. विशाल बडगुजर, शांताराम सुतार, शरद पवार, परेश चौधरी, राजेंद्र बडगुजर यांच्यासह संस्थानचे पदाधिकारी व स्वयंसेवक उपस्थित होते.

या वेळी पोस्ट मास्तर अविनाश सोनवणे, योगेश पाटील, नीलेश पाटील, रोहित पाटील यांच्या मार्गदर्शनात विमा काढण्यात आला. विकी चौधरी, अनिकेत पाटील, मनोज चौधरी, जगदीश चौधरी, तुषार पाटील आदींनी सहकार्य केले.

## मतदानासाठी स्त्री आणि पुरुषांची स्वतंत्र रांग

### तृतीयपंथीयांना दोन्ही रांगात प्रवेश

**जळगाव** : जिल्ह्यात ११ विधानसभा मतदारसंघांमध्ये ३ हजार ६८३ मतदान केंद्रे असून निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार मतदारांसाठी आवश्यक सुविधांची पूर्तता करण्याची तयारी जिल्हा प्रशासनाकडून केली जात आहे.

दरम्यान, जिल्ह्यात ३६ लाखांहून अधिक महिला, पुरुष आणि १४४ तृतीयपंथी मतदार आहेत. विधानसभा मतदानासाठी केंद्रांवर पुरुष आणि महिलांसाठी स्वतंत्र रांगेची व्यवस्था केली असून तृतीयपंथी मतदारांना पुरुष आणि महिला या दोन्ही रांगांमधून प्रवेशासाठी मुभा राहणार आहे. मतदान केंद्रावर गर्दी असल्यास या मतदारांना अन्य घटकांसाठी असलेल्या रांगेतून प्रवेश देण्याचा निर्णय संबंधित मतदान केंद्राध्यक्षांकडून घेण्यात येईल, असे जिल्हा प्रशासनाने म्हटले आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार निवडणुकीत अधिकाधिक मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा यासाठी जिल्हा निवडणूक विभागाकडून मोठी मोहीम राबविण्यात आली आहे. मतदारांना समारंभ वाटावा, असे मतदान केंद्र साकारले जाणार आहे. तसेच महिला, युवा, दिव्यांग, गरोदर, स्तनदा महिला मतदारांसाठी त्यांना पाळणाघरापासून पाणी, स्वच्छतागृह, बैठक व्यवस्था, दिव्यांगांसाठी व्हीलचेअर, रॅम्प, अत्यावश्यक सुविधेंतर्गत रुग्णवाहिका, आरोग्य सेवांतर्गत परिचारिका, अंगणवाडी सेविका आदी अशा सोयीसुविधा निर्माण केल्या जात आहेत. वयोवृद्ध व दिव्यांग नागरिकांना घरून टपाली मतदानाची सोय केली आहे.

दरम्यान, मतदार नोंदणी करताना महिला, पुरुष आणि अन्य असे पर्याय असतात. त्यानुसार इतर संवर्गात तृतीयपंथी मतदारांसाठी नोंद केली जाते. परंतु मतदानासाठी केंद्रांवर आल्यानंतर महिला अथवा पुरुषांच्या रांगेत थांबले तर तेथील अन्य मतदार वेगळ्याच नजरेतून त्यांना न्याहाळत असतात. क्वचितप्रसंगी त्यांची चेष्टा होते. त्यामुळे मतदानासाठी तृतीयपंथीयांसाठी स्वतंत्र रांग बनविण्याची किंवा मतदान करण्यासाठी प्राधान्य देण्याचीही मागणी केली जात आहे.

जिल्ह्यात १८ लाख ८८ हजार ९८९ पुरुष, १७ लाख ८८ हजार ९७९ महिला तसेच १४४ तृतीयपंथी असे एकूण ३६ लाख ७८ हजार ११२ मतदार आहेत. यात गत मे महिन्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीदरम्यान १३४ तृतीयपंथी मतदारांपैकी १२४ (८० टक्के) मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. सद्यस्थितीत जळगाव जिल्ह्यात सर्वात जास्त भुसावळ ४०, जळगाव शहर ३४, चाळीसगाव ३०, एरंडोल १०, मुक्ताईनगर ८, जळगाव ग्रामीण ४, चोपडा ३, अमळनेर ३, रावेर २ आणि जामनेर १ असे एकूण १४४ तृतीयपंथी मतदारांची नोंद झाली आहे.

केंद्र तसेच राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार पुरुष, महिला, दिव्यांग, गर्भवती, स्तनदा, ज्येष्ठ, दिव्यांग मतदार नागरिकांसाठी मतदान केंद्रांवर आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करण्याचे निर्देश आहेत. त्यानुसारच मतदान केंद्रांवर व्यवस्था करण्यात येते.

**-अरविंद अंतुर्लीकर, निवडणूक उपजिल्हाधिकारी, जळगाव.**

## संविधान साक्षरता अभियानांतर्गत जळगाव ते दिल्ली सायकल प्रवास



**जळगाव** : संविधानविषयक साक्षरता देशभरात व्हावी या उद्देशाने येथील सामाजिक कार्यकर्ते तथा संविधान साक्षरता अभियानप्रमुख ॲड. मुकेश कुरील हे 'जळगाव ते दिल्ली' असा सायकल प्रवास करतात. त्यांच्या या उपक्रमाचे हे चौथे वर्ष आहे. १३ नोव्हेंबर रोजी सकाळी सात वाजता जळगाव रेल्वे स्थानकाजवळील डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांनी सायकल यात्रेस प्रारंभ केला.

मुकेश कुरील यांनी त्यांच्या प्रवासाची माहिती दिली. ते बऱ्हाणपूर, सनावद, महू, रतलाम, प्रतापगड, चित्तोडगड, भिलवाडा, अजमेर, जयपूर, पोटकुटली, गुरुग्राम इथे मुक्काम करून २५ नोव्हेंबर रोजी दिल्ली येथे राष्ट्रपतींना निवेदन देऊन सायकल यात्रा समाप्त करतील.

प्रसिद्ध साहित्यिक जयसिंग वाघ यांनी सांगितले की, देशाला संविधान प्रदान करायला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. संविधानाने आम्हाला माणूसपण, माणसाची प्रतिष्ठा, मानवी मूल्य, स्वाभिमान, समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता, स्त्री-पुरुष समानता दिली. त्यासाठी संविधान साक्षरता अभियान राबविणे गरजेचे आहे.

सुरवातीस बौद्ध भिक्खू विनय थेरो यांनी त्रीशरण, पंचशील म्हटले. सूत्रसंचालन आनंद सोनवणे यांनी, प्रास्ताविक हेमंत बिऱ्हाडे यांनी केले. नीलेश चौधरी, हरीश ढंडोरे यांची भाषणे झाली.

याप्रसंगी जळगाव सायक्लिस्ट, जळगावचे अध्यक्ष नीलेश चौधरी तसेच धर्मादाय उपायुक्त मोहन गाडे, साहाय्यक आयुक्त (जीएसटी) जयशंकर अय्यर, राम घोरपडे, सखाराम ठाकरे, राजू सोनवणे, राजू चव्हाण, महेंद्रसिंग पाटील, विनोद पाटील, कामिनी धांडे, स्वप्नील मराठे, राजू मराठे, सुभाष पवार, प्रदीप सोलंकी, दिलीप मालुसरे, जी. डी. पाटील, अनिल सरदार, उमाकांत महिराळ, ॲड. जीवन सपकाळे, ॲड. समाधान सपकाळे, मुकुंद बाविस्कर, हरिश्चंद्र सोनावणे आदी उपस्थित होते. अनेकांनी मुकेश कुरील यांचे स्वागत केले.

# धुळे जिल्ह्यात पाच मतदारसंघांत १,७५२ मतदान केंद्रे

## १८ लाख १६ हजार ८४९ मतदार बजावणार मतदानाचा हक्क

**धुळे** : जिल्ह्यात आतापर्यंत वेळोवेळी निवडणूक विभागांतर्गत मतदार नोंदणी अभियान राबविण्यात आले असून, १५ ऑक्टोबरअखेर जिल्ह्यात नऊ लाख ३० हजार २२६ पुरुष, तर आठ लाख ८६ हजार ५७३ महिला, तसेच ५० तृतीयपंथी, असे १८ लाख १६ हजार ८४९ मतदार आहेत.

साक्री मतदारसंघात १ लाख ८६ हजार ६९ पुरुष, एक लाख ७७ हजार ३७९ महिला, ७ तृतीयपंथी, असे ३ लाख ६३ हजार ४५५ मतदार आहेत. धुळे जिल्ह्यात सर्वाधिक ४०२ मतदान केंद्रे साक्री मतदारसंघात आहेत. धुळे ग्रामीण मतदारसंघात २ लाख ९ हजार ५०१ पुरुष, १ लाख ९७ हजार १०२ महिला, १ तृतीयपंथी, असे ४ लाख ६ हजार ६०४ मतदार असून ३८८ मतदान केंद्रे आहेत. धुळे शहर विधानसभा क्षेत्रांतर्गत १ लाख ८६ हजार ७११ पुरुष, १ लाख ७३ हजार ४७५ महिला, ३१ तृतीयपंथी, असे ३ लाख ६० हजार २१७ मतदार असून, २८८ मतदान केंद्रे आहेत. शिंदखेडा क्षेत्रात १ लाख ७२ हजार ५७४ पुरुष, १ लाख ६६ हजार ४८७ महिला, असे ३ लाख ३९ हजार ६१ मतदार असून, ३३८ मतदान केंद्रे आहेत. शिरपूर विधानसभेंतर्गत १ लाख ७५ हजार ३७१ पुरुष, १ लाख ७२ हजार १३० महिला, ११ तृतीयपंथी, असे तीन लाख ४७ हजार ५१२ मतदार असून ३३६ मतदान केंद्रे आहेत. धुळे जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदारसंघांसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून २३ नोव्हेंबर, २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे.

**साक्री मतदारसंघात ३४ मतदान केंद्रांची वाढ**

साक्री मतदारसंघात १६ लाख ७९ हजार ९४२ मतदार तर ३६८ मतदान केंद्रे आणि ९ उमेदवार निवडणूक रिंगणात असल्याने एकाच इव्हीएम यंत्राचा वापर झाला होता. या निवडणुकीत अपक्ष उमेदवार मंजुळा गावीत ७६ हजार १६६ मते मिळवून विजयी झाल्या होत्या. भाजपच्या उमेदवाराला ६८ हजार ९०१, तर काँग्रेसचे अहिरे यांना २५ हजार ३०२ मते मिळाल्याने ते पराभूत झाले होते. उर्वरित ६ उमेदवारांना १० हजारांपेक्षा अधिक मते मिळविता आली नाहीत, तर ४ हजार ११० मतदारांनी नोटाचा पर्याय निवडला होता. या वेळी साक्री मतदारसंघात ३ लाख ६३ हजार ४५५ मतदार असून मतदान केंद्रांमध्ये ३४ मतदान केंद्रांची भर पडली असून एकूण ४०२ मतदान केंद्रे आहेत.

**धुळे ग्रामीण मतदारसंघ**

२०१९ च्या निवडणुकीत ५ उमेदवारांनी निवडणूक लढविली होती. यात काँग्रेसचे उमेदवार कुणाल पाटील १ लाख २५ हजार ५७५ मते मिळवून विजयी झाले, तर भाजपा उमेदवाराला १ लाख ११ हजार ११ दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाल्याने ते पराभूत झाले होते. शिवाय २,२४८ मतदारांनी नोटाचा पर्याय निवडला होता. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४साठी धुळे ग्रामीण विधानसभा मतदारसंघात ३ लाख ७१ हजार ७४१ मतदार असून ३७२ मतदान केंद्रे आहेत. २०२४ च्या निवडणुकीसाठी बहुजन समाज पार्टी, इंडियन नॅशनल काँग्रेस, भारतीय जनता पार्टी, भारत आदिवासी पार्टी आणि अपक्ष असे १२ उमेदवार निवडणूक लढवित आहेत.

**धुळे शहर विधानसभा मतदारसंघ**

२०१९ मध्ये १० उमेदवार निवडणूक रिंगणात होते. यात एमआयएमचे शाह फारूक अन्वर यांना ४६ हजार ६७९ तर राजवर्धन कदमबांडे अपक्ष यांना ४३ हजार ३७२ तसेच लोकसंग्रामचे अनिल गोटे यांना ४२ हजार ४३२ मते मिळाली होती. सद्यस्थितीत धुळे शहर मतदारसंघात ३ लाख २० हजार ११७ मतदार असून २८६ मतदार केंद्रे आहेत. २०२४ विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टी, शिवसेना उबाठा गट, बहुजन समाज पार्टी, समाजवादी पार्टी, वंचित बहुजन आघाडी, एमआयएम आणि अन्य ३ अपक्ष असे ८ उमेदवार निवडणूक लढवित आहेत.

**शिंदखेडा विधानसभा मतदारसंघ**

२०१९ च्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत ७ उमेदवार होते. यात १ लाख १३ हजार ८०९ मते मिळवून भाजपाचे जयकुमार रावल हे विजयी झाले होते. या वेळी शिंदखेडा मतदारसंघात ३ लाख २६ हजार ३३ मतदार आहेत. भारतीय जनता पार्टी, (महाराष्ट्र नवनिर्माण सेना, नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, बहुजन समाज पार्टीसह अन्य अपक्ष असे १२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

शिरपूर विधानसभा मतदारसंघात २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीत ७ उमेदवार होते. यात भाजपाचे काशिनाथ वेचन पावरा हे १ लाख २० हजार ४०३ मते मिळवून विजयी झाले होते.

**साक्री मतदारसंघात लागणार अधिकचे इव्हीएम मशीन**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी साक्री मतदारसंघात इंडियन नॅशनल काँग्रेस, शिवसेना (शिंदे गट), बहुजन समाज पार्टी, महाराष्ट्र स्वराज्य पार्टी, पिझन्टस् अँड वर्कर्स पार्टी ऑफ इंडिया, भारत आदिवासी पार्टीसह अन्य अपक्ष असे एकूण १८ उमेदवार निवडणूक लढवत असून इव्हीएम मतदान यंत्रात १५ उमेदवार आणि एक नोटा अशा १६ उमेदवारांची मर्यादा आहे. त्यामुळे साक्री मतदारसंघातील ४०२ मतदान केंद्रांवर अधिकचे अतिरिक्त इव्हीएम मशीन लागणार आहेत.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### भुसावळ शहरातील दे.ना.भोळे महाविद्यालयाच्या पॉवर लिफ्टिंग खेळाडूची विभागीय स्पर्धेत निवड

**भुसावळ :** भुसावळ शहरातील दादासाहेब देविदास नामदेव भोळे महाविद्यालयातील खेळाडूंनी रावेर येथे जळगाव विभाग आंतर महाविद्यालयीन पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत पुरुष गटात ऋतिक मोरे याने ५२ किलोग्रॅम गटात द्वितीय तर राहुल रणधीर याने ९० किलो गटात प्रथम क्रमांक पटकावला. अमन गवळी याने १०५ किलो गटात द्वितीय तर महिला गटात सुजल महेंद्र शुक्लाने ७२ किलो गटात पॉवर लिफ्टींग व वेट लिफ्टिंगमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. त्याची कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आंतर विभागीय पॉवर लिफ्टींग स्पर्धेसाठी निवड झाली. यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजू फालक यांनी अभिनंदन करून सत्कार केला. यावेळी प्रा.डॉ.अनिल सावळे, प्रा.डॉ.जयश्री सरोदे, प्रा.डॉ.संजय चौधरी उपस्थित होते. या यशाबद्दल क्रीडा समिती सदस्य प्रा.एस.डी.चौधरी, प्रा.डॉ.जगदीश चव्हाण, सर्व प्राध्यापक वृंद शिक्षकेतर कर्मचारी वृंदांनी अभिनंदन केले.



### दसनूर गावात कार्तिक दिंडी सोहळ्यास ग्रामस्थांकडून उदंड प्रतिसाद

**सिंगनूर, ता.रावेर :** दसनूर गावात परंपरेप्रमाणे शरद पौर्णिमेपासून कार्तिक पौर्णिमेपर्यंत उमेश्वर महादेव मंदिरातून टाळ मृदंग आणि हरिनामाच्या गजरात सकाळी पाच वाजता भक्तिमय वातावरणात दिंडीस सुरुवात होऊन नगर प्रदक्षिण केली जाते. या दिंडी सोहळ्यास भाविक भक्तांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. गावातील पुरूष, महिला, ज्येष्ठ आणि बालमंडळी या सोहळ्यात आनंदाने सहभागी होत आहेत. मंदिर परिसर भक्तिरसात व्हाऊन निघत आहे. दसनूर येथील उमेश्वर महादेव मंदिर हे स्वयंभू शिवमंदिर आहे. कार्तिक स्नानानिमित्त दिंडीची परंपरा सुमारे दिडशे वर्षापासून गावात सुरू.आहे. उमेश्वर महादेव मंदिरातून दिंडीला सुरुवात होते. दिंडी फिरवून वातींचे संकलन केले जाते. दिंडी परत आल्यानंतर मंदिरात काकड आरती होते. दिंडीत अभंग, भुपाळ्या, आंधळे पांगळे, जोगी,वासुदेव,गवळणी संतांनी रचलेल्या या पारंपारिक रचना गायल्या जातात. दिंडीत सुमारे शंभरावर भाविक सहभागी होतात तर काकड आरतीसाठी मंदिरात सुमारे अडिचशे ते तीनशे महिला व पुरुष भाविकांची उपस्थिती राहते. यानिमित्ताने मंदिरावर आकर्षक रोषणाई करण्यात आली आहे. शिवाय दिवाळी निमित्ताने फटाक्यांच्या आतीषबाजीत दिंडीचे स्वागतही करण्यात आले. गावकरी सहभागी झाले होते.

### दगडी मनवेल गावातील विवाहितेचा सर्पदंशानंतर उपचारार्थ हलवताना मृत्यू

**यावल :** यावल तालुक्यातील दगडी मनवेल या गावातील ३० वर्षीय



विवाहिता गुरुवारी शेत शिवारात कापूस वेचणी करत असताना तिच्या उजव्या पायाला सापाने दंश केला. हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर तातडीने तिला उपचारार्थ यावल ग्रामीण रुग्णालयामध्ये आणण्यात आले. येथे उपचारादरम्यान महिलेचा मृत्यू झाला. याप्रकरणी यावल पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. दगडी मनवेल, ता.यावल गावातील रहिवासी नयना गणेश पाटील (३०) ही महिला गुरुवारी शेत-शिवारामध्ये कापूस वेचणी करीत असताना तिच्या उजव्या पायाला सापाने दंश केला. हा प्रकार निदर्शनास येताच तिला तातडीने उपचाराकरिता यावल येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये आणण्यात आले. या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी डॉ. तुषार सोनवणे, डॉ.शुभम, अधिपरिचारिका प्रियतमा पाटील, संजय जेधे, बापू महाजन आदींनी उपचार सुरू केले. उपचार सुरू असताना महिलेची प्रकृती खालावल्याने तातडीने येथून जळगाव जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात हलवण्याच्या सूचना करण्यात आल्या मात्र जळगाव येथे नेत असतानांच तिचा मृत्यू झाला. विवाहितेच्या मृत्यू प्रकरणी यावल पोलीस ठाण्यात गणेश रवींद्र पाटील यांनी दिलेल्या खबरीवरून अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. तपास पोलीस निरीक्षक प्रदीप ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार अर्जुन सोनवणे, मोहसीन खान, अलाउद्दीन तडवी करीत आहे. मयत महिलेच्या पश्चात सासू-सासरे, पती, मुलगा असा परिवार आहे. विवाहितेच्या मृत्यूमुळे गावातून हळहळ व्यक्त करण्यात आली.

### यावल शहरातील ग्लोबल इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये बाल दिवस साजरा

**यावल :** शहरातील ग्लोबल इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती बाल दिवस म्हणून साजरी करण्यात आली. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे फिरोज खान होते. त्यांच्या उपस्थितीत मुख्याध्यापक तथा युवा कवी नौशाद ब्यावली यांच्याहस्ते प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांना पंडीत नेहरू यांच्या जीवन कार्याची माहिती देण्यात आली. प्रसंगी शिक्षक हसीम गवळी, रूहूल अमीन खान, वाकार खान, शायेब खान, शबाना तडवी, रुखसार पटेल, नीलिमा तडवी, परवीन तडवी, हुमेरा खान, महेविश खान, महेवाश सय्यद, शबनम कच्ची आदी उपस्थित होते.



### भुसावळ शहरातील ताप्ती पब्लिक स्कूलमध्ये बालदिन उत्साहात साजरा

**भुसावळ :** शहरातील ताप्ती पब्लिक सीबीएसई इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये बुधवारी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी स्कूलच्या प्रिंसीपल नीना कटलर यांनी विद्यार्थी प्रतिनिधींचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. तर विद्यार्थी प्रतिनिधींनी प्रिंसीपल यांचे स्वागत केले. यावेळी विद्यार्थ्यांनी विवीध प्रकारचे वाद्य वाजवून विदयार्थ्यांनींनी स्वागतगीत सादर केले. स्कुल मधील शिक्षकांनी वेगवेगळे मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर करून विद्यार्थ्याचे मनोरंजन केले.स्कूलच्या प्रिन्सिपल नीना कटलर यांनी विद्यार्थ्यांना बालदिना विषयी माहिती सांगीतली. तसेच बालदिन का साजरा करतात हे देखील पटवून दिले. व बालदिनाचे महत्त्व सांगितले. तसेच त्यांनी स्कुल मधील शिक्षकांचे आभार मानले. यावेळी व्हॉइस प्रिन्सिपल मनप्रीत कौर, श्रद्धाली घुलेसह शिक्षक वर्ग उपस्थित होते.

## आमदार संजय सावकारेंना पुनश्च संधी मिळणार ! : कार्यकर्त्यांचा अतूट विश्वास

### भुसावळसह वरणगावातील प्रचार रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**भुसावळ :** भुसावळ विधानसभा निवडणुकीतील महायुतीचे उमेदवार आमदार संजय सावकारे हे सलग चौथ्यांदा निवडणूक रिंगणात असून या निवडणुकीत ते प्रचंड बहुतांनी विजयी होतील, असा विश्वास भुसावळ शहरात तसेच वरणगाव परिसरात गुरुवारी काढण्यात आलेल्या प्रचार रॅलीदरम्यान कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. ठिकठिकाणी महिलांनी आमदारांचे औक्षण करीत त्यांना आशीर्वाद दिले.

**वरणगाव परिसरात प्रचार रॅली**

गुरुवारी सकाळी आमदार संजय सावकारे यांची वरणगावातील रामपेठ भागात प्रचार रॅली निघाली. आमदारांनी विकासकामांसाठी कटीबद्ध असल्याची या वेळी ग्वाही दिली. या प्रचार रॅलीत आमदारांसह भुसावळचे उद्योजक व माजी नगरसेवक मनोजबियाणी भाजपाचे भुसावळ तालुकाध्यक्ष प्रशांत पाटील, दूध संघ संचालक अतुल झांबरे, गोलू पाटील, स्थानिक महायुतीतील नगरसेवक, पदाधिकारी, विविध समाजातील नागरिक व महायुतीतील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

**महिलांच्या सहभागाने निघालेल्या रॅलीने विजयाचा विश्वास**



**महिलांच्या प्रचार रॅलीला प्रतिसाद**

शहरातील संतोषी माता हॉलपासून सुरू झालेली प्रचार रॅली आनंद नगर, जामनेर रोड, ब्राह्मण संघ, सराफ बाजार, मरिमाता मंदिर, मॉर्डर्न रोड, जनता गॅलरी, बाजारपेठ पोलीस ठाणे, गांधी पुतळा, यावल रोड, प्रभाकर हॉलजवळ पोहोचल्यानंतर तिचा समारोप झाला. ढोल-ताशांच्या गजरातील या रॅलीने जनतेचे लक्ष वेधले.

भुसावळातील हजारो महिलांनी स्वयंस्फूर्तीने आमदारांच्या प्रचारार्थ शुक्रवारी सायंकाळी काढलेल्या रॅलीनंतर आमदार सावकारेच विजयी होतील, असा विश्वास रजनी सावकारे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला. गुरुवारी दुपारी चार वाजता हजारो महिलांच्या सहभागाने ढोल-ताशांच्या गजरात प्रचार रॅलीला संतोषी माता सभागृहापासून सुरूवात करण्यात आली.

**एक हजारांवर महिलांचा सहभाग**

प्रचार रॅलीत प्रतिष्ठा महिला मंडळाच्या अध्यक्षा रजनी संजय सावकारे, डॉ.मृणाल पाटील, डॉ. सुवर्णा गाढेकर, स्मिता फालक, वैशाली महाजन, कविता कोठारी, माजी नगरसेविका मीना लोणारी, डॉ. संगीता बियाणी, पिंकेथॉनच्या माधुरी गुजर, सुनीता पाचपांडे, अनिता महाजन, जयश्री लढे, ग्रामीण भागातील सरपंच, पदाधिकारी महिला, भाजपाच्या माजी नगरसेविका, दूध संघ संचालिका श्यामल झांबरे, माजी सभापती प्रीती पाटील, मनीषा पाटील, वंदना उन्हाळे आदींसह महिला उत्स्फूर्तपणे सहभागी झाल्या.



## नेतृत्व कसं हवं : अभ्यासू, शांत, संयमी की गुंडागर्दी, परंपरा जपणारं

### महायुतीचे उमेदवार अमोल जावळे : प्रचाराला प्रतिसाद

**यावल :** रावेर विधानसभा मतदारसंघात बाहेरून येऊन गुंडागर्दी करणारे आणि एकेकाळी हद्दपार झालेले काही लोक निवडणुकीत उतरले आहेत, तर दुसरे उमेदवार केवळ वडिलांची परंपरा सांगून कोणतेही स्वकर्तृत्व नसताना मते मागत आहेत. पण मी मतदारसंघाचा सखोल अभ्यास केला असून येथे कोणत्या विकासकामांची आवश्यकता आहे, याची मला जाण आहे. राज्यात महायुतीचेच सरकार येणार आहे, आणि माझा विजय निश्चित आहे. या विश्वासासह मी मतदारसंघात नव्या विकासाची मुहूर्तमेढ रोवणार आहे, असे महायुतीचे उमेदवार अमोल जावळे यांनी सांगितले. कठोरा, विरोदा, पिंपरूड आणि अन्य गावांमध्ये त्यांच्या प्रचार दौऱ्यादरम्यान नागरिकांनी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले.

**गावोगावी उत्स्फूर्त स्वागत**

प्रचारादरम्यान अमोल जावळे यांचे गावोगावी उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले आणि मोठ्या संख्येने युवा कार्यकर्ते प्रचारात सहभागी झाले. ज्येष्ठ मतदारांनी आशीर्वाद दिले. जावळे म्हणाले की, गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक आमदार होण्याची स्वप्ने पाहत आहेत, पण ती पूर्ण होणार नाहीत. जनता सुज्ञ आहे आणि केवळ परंपरेच्या नावावर मत मागणाऱ्यांनाही यश मिळणार नाही. मला एकदा संधी देऊन बघा, विकास काय असतो ते दाखवून देईन, असे त्यांनी सांगितले. रावेरच्या जनतेने इतिहासात कधीही आमदाराला पुन्हा निवडून दिले नाही, त्यामुळे या वेळी मतदारसंघात बदल होणार असून, जनतेची मला साथ मिळेल, हा आत्मविश्वास आहे, असे जावळे यांनी सांगितले.

**यांचा प्रचारात सहभाग**

प्रचारात हिरालाल चौधरी, हर्षल पाटील, उमेश पाटील, सविता भालेराव, जयश्री चौधरी, पुरोजित चौधरी, पांडुरंग सराफ, सागर कोळी, तेजस पाटील, योगराज बऱ्हाटे, शाम महाजन, भरत पाटील, विलास कोळी, रामा कोळी, पंकज मोरे, अक्षय चौधरी, अमोल वारके, चेतन राणे, प्रकाश चौधरी, सतीश चौधरी, वसीम पिंजारी, योसेफ चौधरी यांसह महायुतीचे पदाधिकारी, बूथ प्रमुख, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## यावलमध्ये ९७ हजारांच्या बनावट नोटांसह त्रिकूट जाळ्यात

**यावल :** शहरातील भुसावळ रस्त्यावर असलेल्या एका बियर शॉपीवर बुधवारी सायंकाळी बिअर घेण्यासाठी चौघे आल्यानंतर त्यांनी दिलेली पाचशे रुपयांची नोट बनावट असल्याचा संशय दुकानदाराला आल्यानंतर त्याने तातडीने पोलिसांना माहिती दिली. पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाल्यानंतर एक जण निसटण्यात यशस्वी झाला, तर तिघांना मात्र शिताफीने पकडण्यात यश आले. संशयितांकडून ९७ हजारांच्या बनावट नोटा जप्त करण्यात आल्या. याप्रकरणी यावल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. एक पसार संशयित मध्य प्रदेशचा असून त्याच्या शोधार्थ पथक रवाना करण्यात आले आहे.

शहरात भुसावळ रस्त्यावरील शेतकी संघाच्या व्यापारी संकुलात असलेल्या एका बियर शॉपीत बियर घेण्यासाठी श्रावण गंभीर महाजन (रेंभोटा, ता.रावेर), राजेंद्र मुरलीधर पाटील (अयोध्या नगर, जळगाव), निलेश सुरेश पाटील (डोणगाव, ता.धरणगाव) व मध्य प्रदेशातील एक अन्य असे चौघे आले. चौघांनी बियर घेतल्यानंतर ५०० रुपयांची नोट दिली. दरम्यान ती नोट नकली असल्याचे व्यावसायीकाच्या निदर्शनास आले. त्याने तातडीने पोलिसांना याबाबत माहिती दिली. घटनास्थळी पोलीस उपनिरीक्षक सोपान गोरे, सहायक फौजदार असलम खान, हवालदार अर्षद गवळी, न्याजोद्दीन तडवी, सांगळे असे पोलिसांचे पथक दाखल झाले. त्यांना पाहून त्या चौघांपैकी दोघांनी तेथून पळ काढला तर इतर दोघांना व्यावसायीकाने पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले तर पसार होण्याच्या बेतात असलेल्या तिसऱ्याला देखील पोलिसांनी पकडले. या तिघांकडून ९७ हजार रुपये दराच्या १९४ बनावट ५०० च्या नोटा जप्त करण्यात आल्या.

**चौथ्या संशयीताच्या मागावर पथक**

याप्रकरणी यावल पोलिसात चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या सर्व नकली नोटा भारतीय स्टेट बँकेच्या, यावल शाखेच्या व्यवस्थापकांकडे सोपवण्यात आल्या. तपास पोलीस निरीक्षक प्रदीप ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सोपान गोरे करीत आहे. दरम्यान, निवडणुकीच्या धामधूमीत चलनात आलेल्या बनावट नोटांमुळे व्यापाऱ्यांसह नागरिक मात्र आता चांगलेच धास्तावले आहेत.

## भुसावळातील वीज ग्राहक खंडीत पुरवठ्याने हैराण

**भुसावळ :** महावितरणकडून देखभाल दुरुस्तीचे काम पूर्ण करण्याचा दावा करण्यात आल्यानंतरही शहरातील ४० हजार ग्राहकांना दररोज खंडीत वीजपुरवठ्याचा त्रास सहन करावा लागत आहे. शनिवारी शहरातील उत्तर भागात दिवसभरात पाच ते सहा वेळा तर दक्षिण भागात दोन ते तीनवेळा वीजपुरवठा खंडीत झाला. रविवारीदेखील ही समस्या कायम होती. पावसाळा संपल्यानंतरही दररोज खंडीत वीजपुरवठ्याचा त्रास सहन करावा लागत आहे. शहरात गेल्या महिन्याभरापासून दररोज खंडित वीजपुरवठ्याचा प्रश्न वाढला आहे. प्रत्येक भागात दररोज एक ते दोनवेळा वीजपुरवठा खंडित होतो. अनेक भागाातही खंडीत वीजपुरवठ्याची समस्या वाढली आहे. ट्रान्सफार्मरवर चढलेल्या वेलींमुळे शॉर्टसर्किट होऊन वारंवार वीजपुरवठा खंडित होत आहे.

## डॉ.राजेश मानवतकर यांच्या विजयासाठी भुसावळात राष्ट्रवादी जोमाने झटणार !

### संतोष चौधरी : ताकद दाखवून चित्र बदलणार !

**तभा वृत्तसेवा**

**भुसावळ :** महाविकास आघाडीत



वाटा-घाटीत जागा काँग्रेसकडे आली असलीतरी जे उमेदवार राष्ट्रवादीकडे होते तेच शिवसेना-काँग्रेसकडे होते. त्यामुळे काँग्रेसकडे जागा असलीतरी मित्र पक्षाचा उमेदवार एकदिलाने व ताकदीने निवडून आणू, असे भुसावळचे माजी आमदार संतोष चौधरी यांनी सांगितले. भुसावळातील राष्ट्रीय महामार्गावरील राधाकृष्ण हॉटेलमध्ये गुरुवारी राष्ट्रवादी कार्यकर्त्यांचा मेळावा झाला. याप्रसंगी चौधरी यांनी कार्यकर्त्यांची भूमिका जाणून घेत डॉ.मानवतकर यांना पाठिंबा जाहीर केला. त्यांच्यासाठी भुसावळातील प्रचार सभांचा आखाडा गाजवून त्यांना निवडून आणू, असे माध्यमांशी बोलताना ते म्हणाले.

राष्ट्रवादीचे संघटन मजबूत असतानाही जागा काँग्रेसला का सुटली ? या प्रश्नावर चौधरी म्हणाले की, महाराष्ट्र वाचवण्यासाठी जागांची अदला-बदली झाली. मात्र राष्ट्रवादीत जे इच्छुक होते त्या इच्छुकांनी शिवसेना-काँग्रेसकडे उमेदवारी मागितली व वाटाघाटीत जागा काँग्रेसला आली. मात्र महाविकास आघाडी म्हणून आम्ही येथे काम करू. रावेरात आपले बंधू उभे असल्याने काही वेळ तेथे दिला. मात्र शहरात होणाऱ्या प्रचार सभांमध्ये आम्ही आमची ताकद दाखवून देऊ व दोन दिवसात भुसावळातील चित्र बदलेल, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला. शहराचा रखडलेला विकास व ठरावीक कंत्राटदार असलेल्या नगरसेवकांचा विकास झाल्याचा आरोप त्यांनी या वेळी करीत राज्याचा कौल महाविकास आघाडीला, असेल असेही त्यांनी सांगितले. पत्रपरिषदेला कृउबाचे माजी सभापती सचिन चौधरी, राष्ट्रवादीचे युवा जिल्हा उपाध्यक्ष जयेश चौधरी, माजी नगरसेवक उल्हास पगारे, हाजी सलीम पिंजारी, आशिक खान शेर खान, वाजीद खान (बुलढाणा), फिरोज शेख आदींची उपस्थिती होती.

### दीपनगर केंद्रात पक्षी सप्ताहानिमित्त माहितीपटाचे सादरीकरण

**भुसावळ :** महाराष्ट्र शासनातर्फे आयोजित ५ ते १५ नोव्हेंबर दरम्यानच्या पक्षी सप्ताहाच्या निमित्ताने दीपनगर औष्णिक केंद्रात पक्षी अभ्यासक तथा मानव संसाधन विभागाचे उपव्यवस्थापक भूषण पाठे यांनी पक्षी या विषयावर माहितीपट सादर केला. यासोबतच राज्यभरात विविध पाणवठ्यांवर काढलेल्या पक्षांचे फोटो व त्यांच्या भावनाविश्वाची अभ्यासपूर्ण माहिती दिली. मारुती चितमपल्ली यांचा वाढदिवस व स्व.सलीम अली यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासनातर्फे ५ ते १५ नोव्हेंबर पर्यंत पक्षी सप्ताह दरवर्षी साजरा करण्यात येतो. भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रात मुख्य अभियंता प्रफुल्ल भदाणे यांच्या मार्गदर्शनानुसार मानव संसाधन विभागाचे उपव्यवस्थापक तथा पक्षी अभ्यासक भूषण पाठे यांनी पक्षी या विषयावर माहितीपट सादर केला. त्यांनी तापी नदी परिसर, संत मुक्ताबाई मेहूण परिसर, श्री क्षेत्र चांगदेव परिसर तसेच परळी वैजनाथ व तिलारी, जि.कोल्हापूर त्याचप्रमाणे अप्पर वर्धा, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे स्वत: काढलेल्या पक्ष्यांच्या छायाचित्रांची माहिती दिली.

## किनगावात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**यावल :** यावल तालुक्यातील किनगाव येथील नेहरू विद्यालयात १९९४ मध्ये इयत्ता दहावीत शिक्षण घेणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा मोठ्या उत्साहात झाला. गेल्या चार वर्षांपासून विद्यार्थी जोडले गेले असून दरवर्षी दीपावलीनंतर स्नेहमेळावा घेतात. या स्नेहमेळाव्यातून गुरूजनांचा सन्मान करीत त्यांचे ऋण त्यांनी व्यक्त केले व मैत्री कायम जपण्याचे आवाहन करण्यात आले.

**नेहरू विद्यालयात मेळावा**

किनगाव येथील १९९४ मध्ये नेहरू विद्यालयात शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी २०२० मध्ये एक सोशल नेटवर्कचा एक ग्रुप तयार केला. या ग्रुपच्या माध्यमातून हळुवार सर्वच विद्यार्थी-विद्यार्थिनी जोडले गेले आणि नंतर मग आपण इयत्ता दहावीत असतांना शिक्षण घेतांना त्यावेळेचे आपल्या वर्गशिक्षकांसह सर्व शिक्षकवृंद यांच्याशी देखील संपर्क करण्यात आला. दरवर्षी हे सर्व माजी विद्यार्थी एक स्नेहमेळावा घेतात. यावर्षीदेखील रविवारी गावातील नेहरू विद्यालयात हा स्नेह मेळावा झाला. एकत्र आलेल्या वर्गमित्र मैत्रिणींनी त्यावेळच्या आपल्या सर्व शिक्षकांनादेखील आमंत्रण देऊन जुन्या आठवणींना उजाळा दिला. विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांसोबत असलेला ऋणानुबंध कायम ठेवत त्यांनादेखील या कार्यक्रमात बोलावून सन्मानीत केले.

**यांची मेळाव्यास उपस्थिती**

अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षक पी.जी.पाटील होते. त्याचबरोबर या विद्यार्थ्यांना घडवणारे व शिकवणारे बी.डी.देशमुख, आर.एस.पाटील, जी.एम. महाजन, पी.एन. सुरवाडे, जी.एस. साळुंके, एम.एस.पाटील, व्ही.एस.पाटील, एम.एस. पाटील डोणगावकर या शिक्षकांना माजी विद्यार्थ्यांनी सन्मानित करीत त्यांचे ऋण व्यक्त केले. प्रस्तावना नथ्थू महाजन यांनी तर सूत्रसंचालन डी. एस.सुरवाडे तर आभार रवींद्र ठाकुर यांनी मानले. यशस्वीतेसाठी समीर तडवी, वसंत सोनार, शब्बीर पटेल, जगदीश कोळी, अजीत तडवींसह सर्व माजी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

**सुसंस्कारीत विद्यार्थी हीच संपत्ती**

आपल्या भावना व्यक्त करतांना शिक्षकांनी सांगितले की, ज्ञानदानासोबतच संस्काराची शिदोरी धरून आजचे विद्यार्थी या ठिकाणी आम्ही घडवले हीच आमची खऱ्या अर्थाने कमाई व संपत्ती आहे. यावेळी राकेश वराडे, अमोल कुवरे, योगेश पाटील, ललिता पाटील या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. गुरूजनांनी विविध पदावर असलेल्या या विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



## संसाररूपी रथ सुरळीत चालवण्यासाठी वर-वधू ही दोन चाके गरजेची

### शास्त्री भक्तिस्वरूपदासजी : लेवा पाटीदार समाजाचा वधू-वर मेळावा

**तभा वृत्तसेवा**

**फैजपूर :** ज्याप्रमाणे रथाला सुरळीत चालण्यासाठी दोन चाकांची आवश्यकता असते. त्याचप्रमाणे संसाररूपी रथाला सुखरूप चालण्यासाठी वधू व वर अशा दोन चाकांची आवश्यकता असते. ते जर योग्य असतील तर त्यांचा संसार सुखाचा होतो, असे प्रतिपादन लेवा शुभमंगल संचलित लेवा पाटील समाजाच्या वधू-वर मेळाव्याच्या अध्यक्षीय स्थानावरून गुजरात येथील कोशिंद्रा गुरुकुलचे उपाध्यक्ष शास्त्री भक्तिस्वरूपदासजी यांनी प्रतिपादन केले. लेवा शुभमंगल संचलित लेवा पाटीदार समाजाचा वधू-वर मेळावा पाडव्याच्या शुभ दिनी आयोजक हर्षल जावळे यांच्या माध्यमातून फैजपूर येथील शुभदिव्य लॉनमध्ये पार पडला. या वेळी ते बोलत होते.

**यांची मेळाव्यास उपस्थिती**

प्रमुख पाहुणे म्हणून सहकार भारतीचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र नारखेडे, माजी नगराध्यक्ष पांडूरंग सराफ, माजी नगराध्यक्ष पी.के.चौधरी, शिक्षण प्रसारक मंडळ न्हावीचे उपाध्यक्ष अनिल लढे, प्राचार्य डॉ.व्ही.आर. पाटील, महाराष्ट्र लेवा पाटीदार समाजाचे अध्यक्ष अरुण बोरोले, पंचायत समितीचे माजी सभापती डॉ. नरेंद्र कोल्हे, सातपुडा विकास मंडळ पालचे सचिव अजित पाटील उपस्थित होते. आयोजक हर्षल जावळे यांनी प्रास्ताविकातून मेळाव्याचा उद्देश सांगितला. आमदार शिरीष चौधरी, नरेंद्र नारखेडे ,पांडुरंग सराफ, अरुण बोरोले यांनी वधू-वराने लग्नानंतर कशा प्रकारे संसार करावा याविषयी आपले मनोगतातून मार्गदर्शन केले. मेळाव्याला परिसरातील अनेक वधू-वर व पालक उपस्थित होते. मेळाव्यामुळे विवाह संस्थेला विवाह जुळण्याला नक्कीच गती मिळेल, अशी आशा मनोगतातून मान्यवरांनी व्यक्त केली.




**यशस्वीतेसाठी यांचे परिश्रम**

सूत्रसंचालन डॉ.मिलिंद पाटील व संध्या भोळे यांनी केले. यशस्वीतेसाठी अमोल जावळे, डॉ.व्ही.आर.चौधरी, कृषीभूषण नारायण (बापू) चौधरी, नरेंद्र चौधरी, विलास चौधरी, तेजपाल चौधरी, मनोज होले व सेवानिवृत्त मुख्याध्यापक ललित फिरके, हर्षल जावळे यांनी परिश्रम घेतले.

## दीपनगर प्रकल्पातील वीज संच पाच बॉयलर ट्यूब लिकेजमुळे बंद

### १२१० पैकी ६०० मेगावॅट विजेची निर्मिती

**भुसावळ :** दीपनगर औष्णिक केंद्रातील ५०० मेगावॅट क्षमतेचा संच क्रमांक पाच बॉयरल ट्यूब लिकेजमुळे बंद झाला आहे. यामुळे रब्बी हंगामासाठी वाढलेल्या वीजेच्या मागणीच्या काळातच पुरवठा कमी प्रमाणात होत आहे. दीपनगरातील २१० मेगावॅट क्षमतेच्या संच क्रमांक तीन आणि ५०० मेगावॅट क्षमतेच्या संच क्रमांक पाचमधून बुधवारी राज्याला ६०० मेगावॅट विजेचा पुरवठा झाला.

**ट्यूब लिकेजची डोकेदुखी**

राज्यातील बहुतांश शहरांच्या तापमानात घसरण झाली आहे. यामुळे विजेचा वापर कमी असला तरी कृषी क्षेत्रातून तो वाढत आहे. त्यातच दीपनगर औष्णिक वीज निर्मिती केंद्रातील ५०० मेगावॅटचा संच क्रमांक पाचचे बॉयरल ट्यूब लिकेजमुळे बंद झाला. यामुळे दीपनगर औष्णिक केंद्रातील वीज निर्मितीमध्ये घट झाली झाली आहे. सध्या दीपनगरातून केवळ ५० टक्के पीएलएफ गाठून वीज निर्मिती केली जात आहे. गेल्या उन्हाळ्यापूर्वी संच क्रमांक चारचे बॉयलर ट्यूब लिकेजचे सत्र सुरू असल्याने वार्षिक देखभाल दुरुस्ती करण्यात आली. यानंतर या संचात वारंवार होणारे बिघाड थांबले आहेत. संच पाचच्या बॉयलर ट्यूब लिकेज दुरुस्तीचे काम अल्पावधीत पूर्ण करून हा संच कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे. यानंतर वीज निर्मिती वाढेल, असा विश्वासही प्रशासनाने व्यक्त केला आहे.

दीपनगरातील संच क्रमांक पाचच्या वार्षिक देखभाल दुरुस्तीचे काम गेल्या पावसाळ्यातच करणे अपेक्षीत होते मात्र ते अद्यापही पूर्ण झाले नाही. वार्षिक देखभाल दुरुस्तीचे काम खोळंबल्याने बॉयलर ट्यूब लिकेज होण्याचे प्रमाण आगामी काळात पुन्हा वाढण्याची भीती आहे.